
# शब्द रुची

जून २०१४

मूल्य १० रुपये

४०



**ग्रंथाली** द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई-४०००१६ ● दूरध्वनी : २४३०६६२४/२४२१६०५० ● granthali01@gmail.com

ग्रं था ली

## तसा मी.. असा मी... बाळ खरे



शंकराचार्यांचा नातू असलेल्या बाळासाहेबांच्या पोतडीत असलेले वेगवेगळे आणि अविश्वसनीय अनुभव प्रांजळपणे मांडलेले आत्मकथन...

**मूल्य २५० रु. सवलतीत १६० रु.**

## माझ्या काळजाची गोष्ट सुनीता संगवई





ही कहाणी आहे आधुनिक काळातील, 'ऱ्हुमॅटिक हार्ट डिसिज' या एखाद्याला होणाऱ्या दुर्धर रोगावर चालू असलेले ॲलोपॅथी उपचार सोडून, फक्त निसर्गोपचार करून जीवदान मिळवणाऱ्या एका वीस वर्षांच्या मुलीची!

**मूल्य २५० रु. सवलतीत १६० रु.**

ग्रं था ली


## मंदिर-शिल्पे डॉ. माया पाटील




मराठवाड्यातील उस्मानाबाद, लातूर या भागांत मंदिर-शिल्पांचे प्राचीन वैभव आहे. त्याची चित्रांसह सर्वंकष माहिती देणारा हा ग्रंथ.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

## लेणी महाराष्ट्राची डॉ. दाऊद दळवी




महाराष्ट्रातील लेणीवैभव मोठे आहे. या लेण्यांचा माहिती-चित्रे व नकाशे मांडणारा हा संग्राह्य दस्तावेज आहे.

**मूल्य १२०० रु. सवलतीत ७५० रु.**


## *डॉ. नरेंद्र जाधव अनुवादित आणि संपादित पुस्तके*

ग्रं था ली





**बोल महामानवाचे** (एक ते तीन खंड)
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ५०० मर्मभेदी भाषणे**
१. आत्मनिवेदन आणि मार्गदर्शन; २. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, कायदा-संविधान; ३. राजकीय

**जनाआवृत्ती संच मूल्य १२०० रु.**
**सवलतीत ८०० रु.**




**प्रज्ञासूर्य डॉ. आंबेडकर**
समग्र वैचारिक चरित्र

**मूल्य ७५० रु.**
**सवलतीत ६०० रु.**




**प्रज्ञा महामानवाची** (भाग १ ते ४)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समग्र लेखनकार्य
१. राजकीय, २. अर्थशास्त्रीय व समाजशास्त्रीय लेखन, ३. मानववंशशास्त्रीय लेखन, ४. बुद्ध आणि त्याचा धम्म

**जनाआवृत्ती संच मूल्य ८५० रु.**
**सवलतीत ५०० रु.**

**टपाल खर्च प्रत्येकी ५० रु.**

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

शब्द रुची

**जून २०१४, वर्ष दुसरे**
**अंक दुसरा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **प्रभाकर वाईरकर**
आतील मांडणी : **सतीश खानविलकर**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**शब्द रुची/पुस्तक वितरण – महेश गोरेगांवकर**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.**

## संपादकीय...

अखेर गंगेत कमळ न्हालं. अनेकांच्या 'आड'वाणीची पंचाईत झाली. रा.स्व. संघाची मात्र क(म)ळी खुलली. गंगाआरती झाली. अर्थात, त्यांनाही इतक्या मोठ्या विजयाची अपेक्षा नव्हती. तशी ती बाळांपासून कुमारांपर्यंत, नवमतदारांपासून अनेक वर्षं मतदान करणाऱ्यांपर्यंत आणि प्री-पोल, पोस्ट-पोल सर्व्हेक्षणवाल्यांनाही नव्हती. अबू आझमींच्या वेडगळ विधानाप्रमाणे आता कुणाकुणाचा डीएनए तपासायचा? 'इथे फक्त राणे फॅक्टर चालतो' हा दुराभिमान कोसळला. कुणाची 'औकात' दिसलीच नाही. 'पाणी तोडणाऱ्यांच्या' तोंडचं पाणी पळालं. जनतेनं 'अर्धी चड्डी'वाल्यांच्या हातात देश दिला आणि अब की बार.. 'शरद पवार...' अशी स्वप्नं मातीमोल झाली. तिसरी म्हणण्यासारखी आघाडीच उरली नाही. 'आप'चं बाळ (अण्णांचा हनुमान) सूर्य गिळायला निघालं, तर 'भाकप'नं 'भाजप'ला थोडी झुंज दिली. नाही म्हणायला, जयललिता आणि ममता यांच्यावरची 'माया' आटली नाही, तर नवीन पटनाईक यांच्याबद्दलची भावना 'मुलायम' राहिली.

मोदींना टार्गेट करताना आधीच्या सरकारला आपल्या 'विकासा'ची चिंताच वाटली नाही. काँग्रेसची संख्या तर विरोधी पक्षनेतेपद मिळण्याइतक्याही सन्मानाची नाही. त्यांचे पूर्ण बाराच वाजले. महाराष्ट्रात त्यांच्यापेक्षा दोननं जास्त आलेल्या राष्ट्रवादीचं घड्याळ तसंही दहाच्या पुढचा आकडा दाखवत नाही. त्यांना ते चोवीस तासांचं घेतलं असतं तर बरं झालं असतं असं वाटत असावं; शिवाय ते काँग्रेसच्या हाताला बांधण्यातील 'राष्ट्रवादा'ची 'सोय'ही फळली नाही. काँग्रेसचे राज्यात दोनच शिलदार आले, त्यातही एक 'आदर्श' अशोक चव्हाण निवडून आले, हा त्यांच्या दहा वर्षांच्या कार्यकाळाला मिळालेला काव्यगत न्यायच आहे. प्रादेशिक पक्ष आणि जात-भाषा अस्मितेचं राजकारण यापुढे कायमच संयुक्त सरकार आणण्यास भाग पाडेल हा १९८९ पासून दृढ झालेला समज खोटा ठरतोय हे या निवडणुकीचं एक फलित म्हणायला हवं. स्थिर सरकारचं महत्त्व लोकांना पटलंय असा अर्थ यातून निघतोय का, माहीत नाही, पण तसं घडत असल्यास ते स्वीकारार्ह ठरणार आहे.

हे अचंबित करणारे निकाल विकासासाठी, काँग्रेस आघाडीच्या नाकर्तेपणामुळे, भाजपाच्या जोरकस प्रचारतंत्रामुळे, 'आप'च्या घुसळणीमुळे किंवा वाढत्या मतदारांमुळे... कशाहीमुळे असले तरी या देशातल्या तमाम मतदात्यांनी साऱ्याच ठोकताळ्यांना 'उल्लू बनाविंग' करत आपला हिसका दाखवला आहे.

महाराष्ट्रातील निवडणुका तोंडावर आल्या आहेत. एकूणच, येणाऱ्या सरकारांना हा इशारा आहे, की यापुढे 'नो उल्लू बनाविंग!'

**– अरुण जोशी**

# निवडणुका समालोचन आणि प्रत्यक्ष (Live) व्यंगचित्रं...

**प्रभाकर वाईरकर,** व्यंगचित्रकार

**क्षणात** संतत पडणाऱ्या जलधारा, क्षणात आकाश फाटल्याप्रमाणे कोसळणारा पाऊस तर क्षणात अचानक पसरलेली कोवळ्या उन्हाची चादर, भयानक घोंघावणारे वादळी वारे... अशा क्षणार्धात बदलणाऱ्या निसर्गाच्या आविष्कारावर एखाद्या निष्णात सृजनशील कवीला कविता करायला सांगितले व त्याच बदलत्या कवितांवर एखाद्या तरबेज संगीतकाराला त्यातल्या बदलत्या शब्दांवर सुरांचा साज लेऊन वेगवेगळ्या चाली लावायला सांगितल्यावर जी संभ्रमित वा वादळाच्या तडाख्यात अडकलेल्या नावाड्यासारखी अवस्था होईल तशीच काहीशी अवस्था माझीही झाली...

''वाईरकर, १६ मे रोजी निवडणुकांचे निकाल जाहीर होणार आहेत. २००९ मध्ये विधानसभेच्या निकालाच्या वेळी तुम्ही ज्याप्रमाणे व्यंगचित्रं चितारली त्याचप्रमाणे याही वेळी आपण तो प्रयोग करूया. सकाळी आठ ते अकरापर्यंत आम्हाला वेळ द्या...'' इति आयबीएन-लोकमत वाहिनीचे संपादक निखील वागळे. आणि माझीही अवस्था त्या कवीप्रमाणेच झाली. मी 'हो' म्हटले.


एखाद्या व्यक्तीचे कॅरिकेचर करणे आणि एखाद्या विषयावर तात्काळ व्यंगचित्र करणे यामध्ये जमीन-अस्मानाचा फरक आहे.

१६ मे रोजी मतमोजणी सुरू झाली. स्टुडिओतील टीव्हीच्या स्क्रीनवर निकालांचे आकडे 'फ्लॅश' होऊ लागले. माझ्यासोबत राजकीय विश्लेषक व निखील वागळे यांचे सवाल-जबाब चालू झाले.

मतमोजणी सुरू होण्यापूर्वीची राजकीय परिस्थिती काय आहे व त्याबद्दल माझे विचार काय आहेत हे दर्शवणारे व्यंगचित्र त्यावेळी मी तयार केले. वागळेंनी ते प्रेक्षकांना दाखवत असताना समोर बसलेल्या राजकीय विश्लेषकाची त्यावर प्रतिक्रिया विचारली व त्यातून चर्चेला मूर्त रूप यायला लागले. सुरुवातीस जो मी दबावाखाली होतो, तो काही प्रमाणात पहिले व्यंगचित्र तयार झाल्यावर मोकळा व्हायला लागलो... स्क्रीनवरचे आकडे सेकंदा-सेकंदाला बदलत होते.

जरी एक्झिट पोलनुसार भारतीय जनता पार्टी जिंकणार होती असे असले तरीही त्यापूर्वीचे एक्झिट पोलचे अंदाज चुकले होते त्यामुळे त्यांच्यावर भरवसा नसल्याने आपण प्रत्यक्ष जे घडेल त्यावर पूर्ण प्रयत्नांनी व्यंगचित्रे करावीत याची खूणगाठ मनात बांधून मी स्टुडिओत बसलो होतो. बदलणाऱ्या निकालाप्रमाणे काही क्षणांत कल्पना तयार करणे तेवढे सोपे नव्हते. जरी २००९चा अनुभव असला तरीही... बदलत्या राजकीय परिस्थितीप्रमाणे माझी










व्यंगचित्रे तयार होऊ लागली. कसले तरी बळ अंगात येत होते.

एनडीए आणि युपीएच्या आकड्यांमध्ये जास्त फरक दिसत नव्हता. मनात नरेंद्र मोदींची अवस्था काय असेल हा विचार आला. ताबडतोब मोदी स्वत:वर वैतागले असून डोक्याचे केस ओढताहेत असे व्यंगचित्र तयार झाले. वागळेंनी ते चित्र स्क्रीनवर दाखवले. आमच्या मीडियावर आपला विश्वास नाही का? आमचे एक्झिट पोल तुम्हाला पटत नाहीत का? असे त्यांनी मला विचारताच माझे उत्तर होते, समोर जे दिसते तेच खरे माझ्यासाठी, कारण व्यंगचित्र हे सत्यावर आधारीत असायला पाहिजे.

निवडणुकीच्या प्रचाराचा धुरळा मागील दोन महिने धुळवडीसारखा उडत होता. नेत्यांची भाषणे, त्यांचे एकदुसऱ्यावर घडवलेले टीकेचे 'अलंकार' यामधून काही मिळते का व्यंगचित्र करायला याचा विचार सुरू झाला आणि राहुल गांधींचे 'टॉफी' मॉडेल, नरेंद्र मोदींवर टीका करणारे वाक्य आठवले व त्यावर मी






व्यंगचित्र बनवले. पुन्हा त्या व्यंगचित्रावर स्टुडिओत चर्चा सुरू झाली. परंतु काँग्रेसचे प्रतिनिधी काँग्रेस पराभवाकडे 'घोडदौड' करत आहे हे मानायला तयार नव्हते. वागळेंची टीका-टिप्पणी सुरू होती.

केजरीवाल नरेंद्र मोदींपेक्षा पुष्कळ मतांनी मागे आहेत असा 'फ्लॅश' चमकला. ताबडतोब व्यंगचित्र तयार. नरेंद्र मोदी 'झाडू'ने केजरीवालरूपी कचरा साफ करताहेत असे दर्शवले. पुन्हा चर्चा... 'आम' आदमी पक्षाचे प्रतिनिधी प्रतिक्रिया देत नव्हते, पुन्हा पुन्हा विचारल्यावरही... व्यंगचित्र त्यांना आवडले होते... केजरीवालांचा निर्णय चुकीचा कसा होता हे मी मांडले... निकाल पटापट बदलत होते आणि युपीए पराभवाच्या जवळ पोहोचत होती. नरेंद्र मोदींची अवाढव्य प्रतिमा व त्यांच्या पायाजवळून सोनिया गांधी व राहुल गांधी पळ काढताहेत असे दर्शवले. कॅप्शन




'विराट दर्शन'. काँग्रेसचे प्रतिनिधी तरीही पराभव मान्य करत नव्हते, पण त्यांची व्यंगचित्राला मनातून सहमती होती.

अशा सादरीकरणाने काय साध्य झाले हा प्रश्न मनात येणारच. 'हजारो शब्दांत जे सांगता येत नाही ते एका व्यंगचित्रातून सांगता येते' हाच विचार हा प्रयोग करताना होता. समोर दिसणारे आकडे व काही व्यक्तींचे विचार ऐकत असताना व्यंगात्मक टीका-टिप्पणी व्यंगचित्रातून पाहणे हे प्रेक्षकांना नेहमीच भावते व त्याचा त्यांच्या मनावर अधिक 'दृश्य' परिणाम होतो. समोर घडत असलेला प्रसंग व त्यावर व्यंगचित्र तयार होत आहे ही कल्पनाच प्रेक्षकांना अचंबित करते. पुन्हा पुन्हा पाहावीशी, डोळ्यांनी चाखावीशी वाटते. व्यंगचित्रकारासाठी हे एक मोठे आव्हान असते, बुद्धीला आणि चित्रकारीला. विषयाबद्दल कोणतीही भूमिका ठरलेली नसतानाही समोर घडणाऱ्या प्रसंगावर- स्वत:ला अलिप्त ठेवून - प्रसंगानुसार व्यंगचित्र तयार करणे व तेही लाइव्ह हजारो प्रेक्षकांच्या समोर! म्हणजे आजवर जे काही त्या क्षेत्रात काम केले त्याचे मूल्यमापन वा अत्यानंदच! यावेळी मी प्रथमच रंगीत चित्रे तयार केली. रंगीत चित्रे करायची हे ठरवले नव्हते. परंतु एकंदर स्टुडिओतल्या वातावरणाने हुरूप वाढवला आणि ब्रश रंगात घोळू लागला. आपल्या आवडत्या पक्षाचा (सर्व सृजनांचा एकतरी आवडता राजकीय पक्ष असतो, कितीही त्याचा त्यांनी इन्कार केला तरीही) पराभव वा विजय होत असताना अलिप्त राहून योग्य सुसंवादी व्यंगचित्र तयार करणे आव्हानच असते आणि म्हणूनच निखील वागळे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मी एवढेच म्हणालो, ''समोरच्या स्क्रीनवर जे दिसतंय, तेच माझी व्यंगचित्रं बोलताहेत.''

मनाशी एकच खूणगाठ बांधली, काहीही झाले तरी घरून व्यंगचित्रे तयार करून नेऊन दाखवायची नाहीत की जुनी चित्रेही दाखवायची नाहीत. तसे करणे म्हणजे प्रेक्षकांची (Live कार्यक्रम) प्रतारणा केल्यासारखे झाले असते.

प्रशांत कुलकर्णी, विवेक मेहेत्रे व विकास सबनीस यांनीही व्यंगचित्रांचा आस्वाद प्रेक्षकांना घ्यायची संधी दिली. परंतु त्यांना पाहण्याची संधी मला मिळाली नसल्याने त्यांच्यासंबंधी लिहिणे योग्य होणार नाही.


**- प्रभाकर वाईरकर**
कावेरी, बी-४०५, वाकोला ब्रीज,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५
भ्रमणध्वनी : ९८२०५४३०८९
prabhakarwairkar@rediffmail.com

# पटक्याखालचा अंधार

## उन्मत्त शासन व प्रशासन

### डॉ. अनंत पां. लाभसेटवार

**आपली** लोकशाही आभासी व सरकार लोकविन्मुख हे सर्वज्ञात आहे. एखाद्या मंत्र्यांना पत्र लिहा. सर्वसाधारण नागरिकाला त्यांच्याकडून उत्तर मिळण्याची सुतराम शक्यता नसते. आपल्या नोकरशहांची आणि मंत्रिमहोदयांची ही उन्मत्त वागणूक आता जागतिक पातळीवर सांडली असून आंतरराष्ट्रीय संस्थांना कस्पटासमान समजणं हा त्यांच्या आचारसंहितेचा भाग झाला आहे. देशाची प्रतिमा डागाळली जाते व जग आपल्याकडे निषिद्ध दृष्टीनं बघतं याची या नतद्रष्टांना पर्वा नसते. त्यामुळे भारताच्या प्रतिष्ठेवर शिंतोडे उडाले आहेत याविषयी ते अनभिज्ञ असतात. धान्य असूनही कुपोषण असलेल्या, कोळसा व बुद्धी असूनही ती आयात करणाऱ्या भारताकडे जग अगोदरच कावीळ झालेल्या दृष्टीनं बघतं. मग त्यात उन्मत्तपणाची व उर्मटपणाची भर पडली की आपली प्रतिमा कशी कलंकित होते याविषयी प्रजा मात्र अंधारात असते.

या विषयीची अनेक उदाहरणं अलिकडे उघडकीस आली. आपली वर्तमानपत्रं नुसती चाळली तरी याचा अंदाज येतो. या पृथगात्म बातम्यांचा समन्वय केला की जे भयानक चित्र उभं राहतं ते बघून अंगाचा तिळपापड होतो.

भारत हा औषधशास्त्रात एक अग्रणी देश समजला जातो. औषधं शोधून काढण्यात आपण बरेच मागे असलो तरी रसायनशास्त्रीय कौशल्य वापरून त्याची प्रतिकृती बनवण्यात आपला हातखंडा आहे. अशा जीवदान देणाऱ्या औषधांचे बौद्धिक हक्क त्यांचा शोध लावणाऱ्या औषध कंपन्यांच्या हाती असतात. ती आपण उलट-अभियांत्रिकीचं (Reverse engineering) तंत्र वापरून बनवू शकत असलो तरी ती बाजारात विकता येत नाहीत. तरीही या नैपुण्याचे दोन फायदे होतात. एक म्हणजे, ही औषधं बनवण्यास जी रसायनं लागतात त्याची निर्मिती करून त्यांची निर्यात करण्यात व त्यापासून महत्त्वाचं परदेशी चलन मिळवण्यात भारताचा दुसरा नंबर लागतो. कॅनडाचा पहिला नंबर आहे. ही बाजारपेठ २०१३ मध्ये २९.३ अब्ज डॉलरची होती. तिचा ४० टक्के हिस्सा भारतानं पटकावला. ही एक भूषणावह गोष्ट आहे.

या क्षेत्रात आपली रॅनबॅक्सी (Ranbaxy) नावाची कंपनी प्रसिद्ध आहे. तिचा इतिहास चारित्र्यवान नाही. ती भारतातली सर्वात मोठी औषधकंपनी असून आपली उत्पादनं १२५ देशांत निर्यात करते. २००४-२००५ मध्ये कंपनीचं उज्ज्वल भवितव्य ओळखून डायची (Diachi) नावाच्या जपानी कंपनीनं एकूण ४.६ अब्ज मोजून रॅनबॅक्सीचा ५१ टक्के हिस्सा विकत घेतला व कंपनी ताब्यात घेतली. या व्यवहारात रॅनबॅक्सीनं फुगलेला नफा दाखवून जपानी कंपनीला फसवलं असा आरोप केला होता.

डायची कंपनीनं रॅनबॅक्सीच्या व्यवस्थापनार्थ भारतीय अधिकारीच ठेवले. सत्याशी असलेलं त्यांचं शत्रुत्व पुन्हा उघडकीस आलं. दोन कर्मचाऱ्यांनी २००४-२००५मध्ये कंपनी खोट्या चोपड्या ठेवते म्हणून स्फोट केला. कंपनीचा सर्वात मोठा ग्राहक अमेरिका असल्यामुळे त्या देशाचं राष्ट्रीय औषध नियामक प्रशासन (Federal Drug Administration, FDA) एकदम जागृत झालं. त्यावेळी त्यांचे १२ निरीक्षक दिल्लीत कायमचे असत. आता त्यांची संख्या १९ वर गेली. या निरीक्षकांनी सखोल परीक्षण करून बनावट प्रक्रियेतील अनेक उणिवा उघडकीस आणल्या. प्रक्रियेच्या प्रत्येक अवस्थेची एका वहीत रीतसर नोंद करावी लागते. अनेक नोंदी काल्पनिक व खोट्या होत्या असं आढळून आलं. शिवाय कारखान्यातील स्वच्छतेविषयी प्रश्नचिन्ह उभं राहिलं. FDAनं लगेच कंपनीच्या उत्पादनांवर बंधनं घातली. त्यामुळे तिच्या पोटावर पाय पडला. रॅनबॅक्सीनं आपल्या चुका मान्य करून २०१३ मध्ये ५०० दशलक्ष डॉलर (३० अब्ज रुपये) दंड भरला व चुका दुरुस्त करण्याचं कबूल केलं. परंतु अगदी अलिकडच्या परिक्षणात FDAला सर्व जैसे थे असं आढळलं. औषधांच्या गोळ्यांत काच व मानवी केस सापडले. त्यांना तेलाचे डागही पडले होते. औषधकंपन्यांना स्वच्छतेच्या बाबतीत नेहमी दक्ष राहावं लागतं. शौचालयात गेल्यावर साबण वापरून हात धुण्याची पद्धत जगभर आहे. पण रॅनबॅक्सी याविषयी सुसंस्कृत नाही असं आढळून आलं. हा अक्षम्य गुन्हा होता. FDA नं लगेच कंपनीच्या चार कारखान्यांवर जानेवारी २०१४ मध्ये बहिष्कार घातला.

हे बघून रॅनबॅक्सीनं हात टेकले व आपल्या सरकारकडे धाव घेतली. FDAच्या आयुक्त मार्गारेट हॅमर्ग फेब्रुवारी २०१४ मध्ये दिल्लीत होत्या. त्यावेळी आपल्या बाबूंनी भारतीय कंपन्यांना लक्ष्य केलं म्हणून त्यांच्यावर आग पाखडली. ती अनाठायी होती

हे त्यांच्या ध्यानीमनीही नव्हतं. स्वच्छतेच्या प्राथमिक नियमांचं उल्लंघन करणं, गोळ्यांत भेसळ नसणं आणि सर्व नोंद खरी असणं हे निकष अवाजवी आहेत असं कुणीच म्हणणार नाही. म्हणून अंतर्मुख होऊन आत्मसंशोधन करण्याऐवजी आपली लंगडी बाजू खरी आहे असे ढोल पिटणाऱ्या आपल्या बाबूंची ही छातीपीट हास्यास्पद वाटते.

अमेरिकेचे प्रशासकीय सेवा अधिकारी परदेशी दबावाखाली वाकत नाहीत. ते कायद्याचं पालन करतात. या लढाईत नुकसान कुणाचं होणार? अर्थातच आपलं. अमेरिका ही रसायनं कॅनडामधून आयात करू शकते. तसंच चीन मदतीस धावून येण्यास तयार आहे. परंतु परदेशी चलनाचा महत्त्वाचा स्रोत व अथक प्रयत्न करून देशाला मिळालेलं अभिमानास्पद स्थान आपले बाबू गमावण्यास तयार आहेत! खरं म्हणजे या साध्या गोष्टीत दुरुस्ती करून आंतरराष्ट्रीय प्रमाण (Standard) पाळण्याचं कर्तव्य आपल्या भारतीय औषध नियामक संघटनेचं (Central Drug Standard Organization). औषधांचा दर्जा ठरवण्याचं काम या संस्थेचं. पण भारतातल्या अनेक संस्थांप्रमाणे हीही लाचखोरीसाठी व कर्तव्यच्युतपणासाठी प्रसिद्ध आहे. म्हणजे कंपनीनं पैसे देऊन निकृष्ट औषधं मान्य करून घेतली असं २०१२ च्या संशोधनानंतर आढळून आलं. असं असूनही कुणाला शिक्षा झाली नाही की कुठला नोकरशहा पदच्युत करण्यात आला नाही. त्यामुळे तिची विश्वासार्हता धुळीस मिळाली. एक म्हणजे, त्या नियामक संस्थेत पुरेसे प्रशिक्षित अधिकारी नाहीत व जे आहेत ते अपात्र असल्याचं आढळून आलं. या संस्थेनं आपलं कर्तव्य बजावलं असतं तर परदेशी नियामक संस्थांना अशी टोकाची पावलं उचलावी लागली नसती.

परंतु आपल्या बाबूंना तर्कशास्त्र कळत नाही. देशातला औषधांचा बादशहा म्हणजे ड्रग कंट्रोलर (Drug Controller). त्यांचं नाव जी.एन. सिंग. या उच्चपदस्थ अधिकाऱ्यानं फेब्रुवारी २०१४ मध्ये दिल्लीत जाहीर केलं की आम्ही अमेरिकेचे नियम पाळणार नाही व FDAचे आरोप बिनबुडाचे आहेत. म्हणजे गोळ्यांत काच व केस यांची भेसळ असणं व खोट्या चोपड्या ठेवणं त्यांना मान्य होतं. अशा आडमुठ्या वागणुकीनं कुणाच्या प्रतिष्ठेला डाग पडणार? अर्थातच भारताच्या.

देशाला परदेशी चलन मिळवून देशाबाहेर भारताचा झेंडा फडफडवणाऱ्या कंपन्यांत सुधारणा करून त्या निर्यातपात्र करण्याऐवजी आपण दोष निदर्शनास आणणाऱ्यांशीच भांडतो. अशा कंपन्यांचं कौतुक करण्याऐवजी आपण त्यांना निषिद्ध समजतो. असा उर्मटपणा इतर देशांत आढळत नाही. याचा अर्थ इतर देशांतले उद्योजक नैतिकदृष्ट्या आपल्या उद्योजकांपेक्षा तसूभर चांगले असतात असा नव्हे. सर्वांमध्येच कमीअधिक प्रमाणात नैतिक दौर्बल्य सापडतं. पण अशावेळी देशाचं हित अग्रणी ठेवणं आवश्यक असतं.

याचं एक उदाहरण पुरे होईल. १९८५च्या सुमारास IBM या प्रख्यात कंपनीनं पर्सनल कम्प्युटर लोकप्रिय केला होता. पण लवकरच हा उद्योग तोट्यात जाऊ लागला. म्हणून कंपनीनं तो विकण्यास काढला. चीनमधल्या लिनोवा (Lenova) नावाच्या एका बीजावस्थेत असलेल्या व कुणी न ऐकलेल्या कंपनीनं तो विकत घेतला. अर्थातच या व्यवहारात कंपनीला चिनी सरकारची मदत झाली असावी. पण महत्त्वाचं म्हणजे, खरेदी केल्यावर चीनच्या तत्कालीन पंतप्रधानांनी लिनोवाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला फोन करून त्याचं कौतुक केलं व म्हटलं की चीनला जागतिक पातळीवर नेण्याची जबाबदारी तुमच्यासारख्या उद्योजकांच्या हातात आहे. ही प्रवृत्ती आपल्या देशात सापडते का? आज लिनोवा ही कंपनी जगातील सर्वात मोठी वैयक्तिक संगणक बनवणारी संस्था म्हणून ओळखली जाते. तिची उत्पादनं भारतात मिळतात. आपल्या शासनाचा उर्मटपणा व चीनची स्वागतशीलता यातला हा फरक लक्षणीय आहे.

निर्लज्ज वागणूक देऊन देशाचा जागतिक पातळीवर अपमान करणारी दुसरी संस्था म्हणजे नागरी हवाई वाहतूक महासंचालनालय. ती DGCA (Director General of Civil Aviation) म्हणून देशात ओळखली जाते. तिचं मुख्य कर्तव्य म्हणजे देशातील वायुसेवा सुरक्षित आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची ठेवणं. पण देशातले हवाईअड्डे आता जागतिक पातळीचे असले तरी वायुसेवा नियंत्रण त्या लायकीचं नाही, असं अमेरिकेच्या वायुसेवा प्रशासनानं जानेवारी २०१४ मध्ये जाहीर केलं. फेडरल एव्हिएशन अॅडमिनिस्ट्रेशनचे (FAA) नियम सर्व जग पाळतं कारण तिचा प्रशासकीय दर्जा अव्वल दर्जाचा समजण्यात येतो. त्यामुळे FAA जेव्हा म्हणते की प्रवाशांना पाण्याची बाटली आत नेण्यास बंदी आहे तेव्हा सर्व देश तसंच करतात. त्यामुळे या प्रतिष्ठित संस्थेनं जेव्हा भारतातलं वायुसेवा नियंत्रण जागतिक लायकीचं नसून प्रवाशांना सुरक्षित नाही असं म्हटलं, व विशेष म्हणजे या उणिवा पाकिस्तानमध्ये सापडल्या नाहीत, तेव्हा हा अवमान अजूनच धारदार झाला आणि आपले बाबू तळपत्या तलवारीची भाषा बोलू लागले. यावरून आपलं शासन व प्रशासन कसं वस्त्रहीन आहे हे जगाला कळलं.

या बाबूंच्या डोक्यावर नागरी वायुसेवा मंत्री अजितसिंग. ते एकेकाळी अमेरिकेत IBM चे संगणक विकत. त्यांनी बाबूंनी लिहून दिलेलं वाचलं आणि पुढील दहाएक आठवड्यांत सर्व चुका दुरुस्त केल्या जाऊन आपलं वायुसेवा नियंत्रण जागतिक पातळीचं होईल अशी घोषणा केली. ती केवळ रंगसफेदी आहे हे कळायला जनतेला मार्ग नव्हता.

वस्तुस्थिती कितीतरी गंभीर आहे. FAAनं म्हटलं होतं की वाहतूक संचालनालयात पुरेसे व पुरेशा गुणवत्तेचे अधिकारी नाहीत. जे आहेत ते नालायक म्हणजे लायकी नसलेले आहेत. हा आरोप पूर्वी औषध नियामक प्रशासनानं (FDA) केलेल्या टीकेपेक्षा वेगळा नव्हता. भरती करताना गुणवत्तेतर निकष वापरल्याची किंवा वशिला लावल्याची ही पावती. नवीन सपात्र व गुणवत्ताधारक अधिकारी नेमून त्यांना तांत्रिक प्रशिक्षण देण्यास महिने नव्हे तर वर्षं लागतात. हे सत्य शासनानं जनतेपासून लपवून ठेवलं.

पण तोपर्यंत जनता धोक्यात येते त्याचं काय? म्हणजे आपली

विमानं सुरक्षित आहेत, पण विमानतळावरील मनोऱ्यात बसून उतरवण्याचं किंवा उड्डाण घेण्याचं, वैमानिकांना आदेश देणारं जाळं (Network) आंतरराष्ट्रीय लायकीचं नसेल तर नुसती अवाढव्य व आधुनिक विमानतळं बांधण्यात काय अर्थ? वायुसेवेला लागणाऱ्या पायाभूत सुविधा सुरक्षिततेच्या दृष्टीनं जास्त महत्त्वाच्या.

भारतीय जनतेवर या त्रुटीचे फारसे परिणाम होणार नाहीत कारण आपण मुळातच मरणाला भीत नाही. म्हणूनच तर पाकिस्तानच्या अण्वस्त्रांच्या छायेत राहूनही आपण काळजीमुक्त वागतो. पण आंतरराष्ट्रीय प्रवासी तेवढे निडर नसतात. एकदा राजस्थानच्या दौऱ्यात आम्ही पाकिस्तानच्या सरहद्दीजवळ असलेल्या जेसलमेर या उंटांच्या गावी गेलो. ते शहर पाकिस्तानच्या तोफांच्या पल्ल्यात आहे असं कळताच आमच्या गटातले परदेशी पाहुणे प्राणभयानं घाबरले. मरणाविषयी ते एवढे संवेदनाशील असताना ते आपल्या दोषी वायुसेवा नियंत्रणाचा स्वीकार कसा करणार? FAAच्या महाजालावरील संकेतस्थळावरून त्यांना ही कुप्रसिद्धी कळणारच. त्यांना आकर्षित करून परदेशी चलन मिळवण्यासाठी आपण जाहिरातींवर अमाप पैसा खर्च करतो. अमेरिकेतल्या अनेक मासिकांत मी इनक्रेडिबल इंडियाच्या (Incredible India) सुंदर व आकर्षक जाहिराती बघितल्या आहेत. इथल्या दूरदर्शनवर जेव्हा त्या जाहिराती दिसतात तेव्हा त्यांचं मधुर व श्रवणीय संगीत भारताची अस्मिता जगाला दाखवतात. आपण पर्यटनक्षेत्राला एवढं महत्त्व देतो की त्यासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन केलं. असं अमेरिकन शासनात देखील नाही. परंतु आपली वायुसेवा धोक्याची असली तर त्यांना ताजमहाल काय कामाचा?

या अवनत स्थितीचे दुसरेही परिणाम उद्भवतात. सध्या आपली राष्ट्रीयीकृत वायुसेवा कंपनी (एअर इंडिया) व जेट एअरवेज अमेरिकेत येतात. पण अतिरिक्त वायुसेवा कंपन्यांना आता ही परवानगी मिळणार नाही. शिवाय या प्रस्थापित भारतीय कंपन्यांना या देशात विस्तारीकरण करता येणार नाही.

आपली एअर इंडिया गेल्या काही वर्षांपासून आर्थिक दृष्ट्या विपन्नावस्थेत आहे. सरकारी अनुदानावर ती कशीबशी जगते. प्रवाशांची निष्ठा वाढवून सांख्यिक वृद्धी करण्यासाठी एअर इंडियानं एका आंतरराष्ट्रीय गटात समाविष्ट होण्यासाठी अर्ज केला आहे. त्यामुळे त्या गटातील कुठल्याही विमानानं प्रवास केला तरी प्रवाशांना श्रेयांक माईल्स (Frequent Flyer Miles) मिळू शकतात. परिणामी निष्ठावंत प्रवाशांची संख्या वाढते. पण आता आपलं वायुसेवा नियंत्रण आंतरराष्ट्रीय दर्जाचं नसलेलं आढळून आल्यामुळे एअर इंडियाच्या अर्जावर परिणाम होईल असं म्हणतात.

अशी आणीबाणीची वेळ येईपर्यंत आपले बाबू का थांबले? आपल्या खालावलेल्या परिस्थितीचे इशारे त्यांना देण्यात आले होते, तिकडे त्यांनी दुर्लक्ष का केलं? त्यांच्या गलथानपणामुळे देशाची प्रतिमा काळवंडली व आपलं नुकसान झालं त्याचं काय? महत्त्वाचं म्हणजे, जे प्रशासकीय सेवा अधिकारी याला कारणीभूत आहेत त्यांना नारळ का देण्यात आला नाही? आपल्या शासनपद्धतीत तसं करता येत नाही म्हणा. कारण बेरोजगारीपासून त्यांना संविधानात्मक अभय मिळालं आहे. पण त्यांना कमीत कमी वठणीवर तरी आणायला नको काय? यातून मंत्रीमहोदयांना वगळता येत नाही.

आता तिसरं क्षेत्र बघा. नुकतेच आंतरराष्ट्रीय हिवाळी सामने (Winter Olympics) सोची, रशिया इथे संपन्न झाले. त्यात जगातल्या ८८ देशांनी भाग घेतला. पहिल्या दिवशी (फेब्रुवारी ७, २०१४) सर्व राष्ट्रांनी शानदार परेडमध्ये भाग घेतला. देशविशेष गणवेश चढवून, मान वर करून आणि छाती फुगवून प्रत्येक देशानं आपआपले राष्ट्रीय ध्वज जगाला दाखवले. जगातल्या ७ अब्ज लोकांमधल्या ३ अब्ज जनतेला ते बघण्यास मिळाले. पण त्यात आपला तिरंगा कुणाला दिसला का? मुळीच नाही. आपल्या देशातल्या फक्त ३ क्रीडापटूंना ऑलिपिंकचा ध्वज घेऊन मिरवणुकीत भाग घ्यावा लागला.


अशी लांच्छनास्पद परिस्थिती कशी उद्भवली? लाचखोरी व राजकारण. भारताच्या क्रीडाक्षेत्रात जेवढं राजकारण आहे तेवढं ते राजकारणातही नाही असं म्हणतात. भारतीय ऑलिपिंक समिती स्वायत्त नसून अधिकाऱ्यांच्या निवडणुकीत राजकारणी ढवळाढवळ करतात व लाचखोर अधिकारी नेमले जातात म्हणून आंतरराष्ट्रीय ऑलिपिंक समितीनं आपल्या देशावर बहिष्कार घातला आणि आपल्या जागतिक प्रतिमेवर शिंतोडे उडाले. सुरेश कलमाडी भारतीय समितीवर अनेक वर्षं होते. ते जामीनावर कारावासातून बाहेर पडले. त्यानंतर ललित भानोट नावाच्या गृहस्थाची महासचिव म्हणून नेमणूक झाली. राष्ट्रकुल सामन्यात भ्रष्टाचार केला म्हणून त्यांनी १० महिने गजाआड काढले. अशी नक्षत्र समितीवर नेमल्यामुळे आंतरराष्ट्रीय ऑलिपिंक समितीनं इशारे दिले. तुम्ही आम्हाला विद्वत्ता शिकवणारे कोण म्हणून आपल्या उर्मट अधिकाऱ्यांनी आंतरराष्ट्रीय समितीला धुडकावून दिलं. हे काजव्यानं सूर्यावर थुंकण्यासारखं होतं. त्या समितीनं डिसेंबर २०१२ मध्ये भारतावर बहिष्कार घातला व भारत अनाथ झाला.

शेवटी जेव्हा आंतरराष्ट्रीय समितीच्या अटी मान्य कराव्या लागल्या व लाचखोर अधिकाऱ्यांची गच्छंती करण्यात आली तेव्हा फेब्रुवारी ९, २०१४ रोजी बंधनं उठवण्यात आली आणि भारताचा ध्वज सोचीमधल्या निरोपाच्या परेडमध्ये फडफडला. तो कार्यक्रम कुणी बघितला नाही कारण त्यावेळी जगाचं लक्ष दुसरीकडे होतं!

आंतरराष्ट्रीय पातळीवर जी देशाची नालस्ती झाली ती केवळ शासनाच्या व प्रशासनाच्या उर्मट वागणुकीमुळेच ना? या आडमुठ्या व लाचखोर वागणुकीला आणि देशाला कलंकित करणाऱ्यांना कुठली शिक्षा झाली का? मुळीच नाही. त्यांच्या नोकऱ्या व बँक खाती शाबूत आहेत.

राष्ट्रकुल सामन्यांत जगासमोर आपण जी लक्तरं टांगली तो याचाच प्रकार. सामने तोंडाशी आले तरी खेळाडूंना राहण्याच्या जागांचं बांधकाम संपलं नव्हतं. ते मुदतीत संपलं नाही म्हणून

## प्रकाशनाच्या वाटेवर
# रवींद्र शोभणे यांची नवी बृहद्‌कादंबरी...




इंदिरा गांधींची नृशंस हत्या ते राजीव गांधींचा भीषण शेवट या राजकीय घटनांच्या दरम्यान आपल्या समाजात काय काय घडत होतं ?... माणसामाणसातील नातेसंबंधांतील दुरावा... राजकीय माणसांमधील जीवघेणी सत्तास्पर्धा आणि त्या सत्तास्पर्धेत होणारी अवघ्या मूल्यांची होळी... सामाजिक क्षेत्रात येऊ पाहणारा कोरडेपणा... शिक्षणाच्या नावावर होऊ पाहणारी धंदेवाईक स्पर्धा... शिक्षणसम्राटांचा उदय... कलेच्या प्रांततला आटत जाणारा भावनिक ओलावा... तकलादू यशासाठी केली जाणारी घृणास्पद तडजोड... आणि या सगळ्यातून माणसांचं कोसळणं, उद्‌ध्वस्त होणं, पुन्हा उठून उभं राहणं आणि अवतीभवती होऊ पाहणारी पडझड, मूल्यांची होळी उघड्या डोळ्यांनी पाहण्याची त्याच्या वाट्याला आलेली हताशा...

माणसाचं आणि काळाचं नातं जोडत मोठ्या कालपटावरील वाचकांना हलवून सोडणारी, अंतर्मुख करणारी, जीवनदर्शनाचा प्रचंड आवाका आपल्या कवेत घेणारी बृहद्‌कादंबरी...

पडघम या गाजलेल्या, जाणकारांनी वाखाणलेल्या कादंबरीचा पुढील भाग

पृष्ठसंख्या : ७२८ + १६
मूल्य रु. ६००/-

मॅजेस्टिक
पब्लिशिंग हाऊस

आपली आवडती पुस्तके मागविण्यासाठी
Click करा-
www.majesticonthenet.com या साईटवर
Customer care No. 022-65666755

प्रमुख विक्रेते : मॅजेस्टिक बुक स्टॉल। गिरगाव । पुणे । मो. ९९२२३४४०८१
मॅजेस्टिक बुक डेपो। ठाणे (प.), दूरध्वनी : २५३७६८६५
मॅजेस्टिक ग्रंथदालन । शिवाजी मंदिर, दूरध्वनी : ९८२२२०२३९

आंतरराष्ट्रीय समितीनं अनेक पत्रं लिहिली, इशारे दिले व प्रत्यक्ष भेटी घेऊन आपल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांचे कान उघडले. पण काही फायदा झाला नाही. शेवटपर्यंत रहिवासी जागा तयार झाल्या नव्हत्या. ज्या झाल्या त्या नवीन असूनही स्वच्छतेच्या बाबतीत कनिष्ठ प्रकारच्या होत्या. ही त्रुटी निदर्शनास आणल्यावर आपल्या बाबूंनी उर्मटपणाचं हत्यार उपसलं. तो म्हणाले, ''तुमच्या व आमच्या स्वच्छतेच्या व्याख्येत फरक आहे. आमच्या दृष्टीनं हे गलिच्छ नाही.'' तो अधिकारी कमी गुण मिळूनही सवलतीच्या दरात प्रशासकीय सेवा अधिकाऱ्याची परीक्षा पास झाला असावा. नाहीतर त्याला माहीत असतं, की स्वच्छतेचे मापदंड देशपरत्वे बदलत नाहीत.

या उर्मट वागणुकीत लाचखोरीची भर पडल्यावर जे स्फोटक मिश्रण तयार झालं ते बघून भारताला २०२८ मध्येच नव्हे तर भविष्यात कधीही आंतरराष्ट्रीय सामने आयोजित करण्याचा मान मिळणार नाही. पण या अपमानाची आमच्या शासनाला व प्रशासनाला पर्वा नाही.

काही वर्षांपूर्वी आपल्या उन्मत्तपणानं उच्चांक गाठला. अमेरिकेत उच्चभ्रू प्रकारच्या जीवनोपयोगी वस्तू विकणाऱ्या शृंखला दुकानांची मोठी कंपनी म्हणजे मेसीज (Macy's). ती मध्यम व उच्चतम वर्गीयांची सेवा करते. निम्नस्तरीयांसाठी वॉलमार्ट आहे. तर या कंपनीनं भारतात वस्त्रं बनवून घेण्याचा करार एका दिल्लीस्थित कंपनीशी केला. आपल्या देशात वस्त्रोद्योग एकेकाळी फार मोठा असे. पण आपल्या हलगर्जीपणामुळे व बेफिकिरीमुळे या क्षेत्रात हल्ली आपण मागे पडलो. बुटुकला बांगलादेश आपल्या पुढे गेला. अशा काररनाम्यात मानवी हक्कांचं उल्लंघन होणार नाही अशी अट असते. म्हणजे बालमजूर वापरण्यावर सक्त बंदी असते. हे नियम राबवण्यासाठी कंपनी आपले निरीक्षक घोषणा न करता कारखान्यात पाठवते. असं जगभर करण्यात येतं. म्हणजे भारत त्याला अपवाद नाही. एका धाडीमध्ये मेसीजच्या निरीक्षकांना बालमजूर काम करताना दिसले. कंपनीनं ताबडतोब करार रद्द करून काम दुसऱ्या देशात स्थलांतरीत केलं. आपल्या देशातही बालमजूर वापरण्याविरुद्ध कायदे आहेत. तरीही ते सर्वत्र काम करताना दिसतात. वर्तमानपत्रांचं वितरण किंवा सर्वसामान्य उपाहारगृहात टेबलं व बश्या साफ करणारा अद्याप मिसरूड न फुटलेला पोऱ्याच असतो. पण आपलं सरकार तिकडे दुर्लक्ष करतं. पोटापाण्याच्या प्रश्नापुढे कायदा नत होतो.

परंतु बहुद्देशीय कंपन्यांना हे स्वातंत्र्य नसतं. त्यांना हे कायदे काटेकोरपणे पाळावे लागतात. वॉलमार्टला एक दुकान उघडण्यास ५२ दाखले लागले. ते सर्व कंपनीच्या भारतस्थित प्रतिनिधीनं एका वर्षात मिळवले. ज्या देशात न्याय मिळायला उभं आयुष्य अपुरं ठरतं त्या देशात ही जादू कशी घडली? अर्थातच खिरापत वाटून. पण अमेरिकेत या विरुद्ध कायदे आहेत. म्हणून अमेरिकन सरकारनं वॉलमार्टला कोर्टात ओढलं. पण ही लाचखोरी आपल्या बाबूंच्या लक्षात आली नाही हे विशेष. कारण खिरापतीचे लाभार्थी या बाबूंच्या जातीचे व त्यांच्यावरचे राजकारणी होते. याबाबतीत जगात व भारतात एक मोठा फरक आहे. जग कायदे हे पाळण्यासाठी, तर आपण मुरड घालण्यासाठी असतात असं समजतो. प्रत्येक कायदा व दाखला लाच उकळण्याची संधी, हा सिद्धांत आपल्या देशात प्रस्थापित झाला आहे. एकीकडे कल्याणकारी धोरण व दुसरीकडे भ्रष्टाचारी मरण.

मेसीजनं तडकाफडकी घेतलेला निर्णय तत्कालीन व्यापारमंत्री कमलनाथ यांच्या कानावर पडला आणि त्यांनी कुणाला दोष दिला म्हणता? कुणीतरी या गैरप्रकाराची माहिती गुप्तपणे मेसीजला दिली, म्हणून त्यामागे कुणाचं तरी कारस्थान आहे असा निष्कर्ष त्यांनी काढला. पण भारतीय कंपनीनं कायदेभंग केला म्हणून त्यांनी 'ब्र' काढला नाही. या कुकृत्यामुळे हजारो मजुरांच्या पोटावर पाय पडला. देशाच्या चारित्र्याला डाग लागला आणि देशाची विश्वासार्हता ढळली याविषयी कुणाला कळवळा वाटला नाही. त्याऐवजी त्यांनी मेसीजवर खापर फोडलं. भारतीय कंपनीनं बालमजूर कायदा मोडला म्हणून तिला वठणीवर आणण्याचं सत्ताकर्त्यांना सुचलं नाही.

आता चीनमध्ये असं झाल्यावर त्या देशानं काय केलं हे बघा. चीन हा एक मोठा निर्यातप्रधान देश आहे. याबाबतीत जानेवारी २०१४ मध्ये तो अमेरिकेच्या पुढे गेला. आपला निर्यात माल उत्तम दर्जाचा, स्वस्त व भेसळमुक्त असावा म्हणून तो रात्रंदिवस झटतो. या स्वच्छ प्रतिमेला कलंक लागू नये म्हणून चीन दक्ष असतो. एकदा दंतमंजन निर्यात करणाऱ्या कंपनीच्या उत्पादनात अमेरिकन ग्राहकांना लाकडाचा भुसा आहे असं आढळून आलं. हे ऐकून चिनी शासनानं एकदम चौकशी केली. आपल्या नतद्रष्ट मंत्र्यांप्रमाणे ते भुंकले नाहीत. उत्पादन खरोखरीच सदोष असल्याचं आढळून आलं आणि कारखान्याच्या मालकाला अटक करण्यात आली. कोर्टात तो दोषी सापडला व त्याला फाशीची शिक्षा देण्यात आली. आपल्याला ती अतिशयोक्ती वाटत असली तरी त्यामागचं उद्दिष्ट जगाला कळलं. स्त्रीला जसं आपलं शील महत्त्वाचं तसंच देशाला आपली जागतिक प्रतिमा जपून ठेवण्यात महात्म्य वाटतं. त्यामुळे चीनची विश्वासार्हता वाढली व प्रतिमा उजळली.

असं का? याचं उत्तर ड्रेझी व अमर्त्य सेन यांच्या नवीन पुस्तकात सापडतं. ते म्हणतात, 'आपल्या देशात कुठेच उत्तरदायित्व सापडत नाही. त्यामुळे कोण कशाला कारणीभूत आहे हे हेतूपूर्वक झाकून ठेवण्यात येतं. चूक झाली तर जबाबदार व शिक्षापात्र कोण हे कळण्यास मार्ग नसतो. अशा परिस्थितीत सुधारणा करणं अशक्यच.'

उत्तरदायित्वाच्या भावनेची जोपासना केली तर एवढे बाबू व राजकारणी गजाआड करावे लागतील की देशाची कारावासक्षमता कमी पडेल.

**– डॉ. अनंत पां. लाभसेटवार**
2 Second Street, Unit # 2001,
Jersey City, N.J. 07302
lalalabh@aol.com

विज्ञान विलोल

# साथींच्या संकटाचे सावट


**सुधीर थत्ते**



**सध्या** अतिशय सहजपणे मात करता येत असलेल्या साध्या-साध्या साथीच्या रोगांमध्येही भविष्यात मोठ्या प्रमाणावर लोक बळी पडण्याची भीती जागतिक आरोग्यसंघटनेने आपल्या अलिकडच्या अहवालात व्यक्त केली आहे. विविध रोगांवर मात करणारी वेगवेगळी प्रतिजैविके (अँटिबायोटिक्स) झपाट्याने निष्प्रभ होऊ लागल्यामुळे हा धोका निर्माण झाला आहे. हजारो वर्षे मानवाला सतावणाऱ्या विविध रोगांच्या साथींच्या त्रासातून मुक्त होण्याचा मानवाने गेली काही दशके उपभोगलेला आनंद मावळणार की काय, अशी चिंता वैद्यकक्षेत्रातल्या तज्ज्ञांना भेडसावू लागली आहे. ही केवळ विकसनशील देशांचीच समस्या नसून जगातल्या विकसित देशांपासून अविकसित देशांपर्यंत एकूण एकशेचौदा देशांना या प्रश्नाने ग्रासले आहे, असे या अहवालात म्हटले आहे. (उरलेल्या ऐंशी देशांमध्ये ही समस्या नाही असे नसून त्यांच्याकडे याविषयीची माहितीच उपलब्ध नसल्यामुळे त्यांना हवी ती आकडेवारी देता आलेली नाही! प्रत्यक्षात, सर्वच एकशेचौऱ्याण्णव देशांमध्ये ही समस्या असणारच, असे वैद्यकतज्ज्ञांचे म्हणणे आहे.)

जखमेत पू होणे (सेप्सिस), रक्तप्रवाहातून होणारा जंतूसंसर्ग, न्यूमोनिया, अतिसार (डायरिया), मूत्रमार्गाचा जंतूसंसर्ग, क्षय, परमा (गनोरिया) यांसारख्या अनेक रोगांचे जंतू प्रतिजैविकांना दाद देईनासे होत आहेत. शेवटचा 'हमखास उपाय' मानली जाणारी अनेक प्रतिजैविके जगभरात आता निष्प्रभ ठरत आहेत. रुग्णालयात होणारा आतड्याचा जंतूसंसर्ग, रक्तप्रवाहातून होणारा जंतूसंसर्ग, न्यूमोनिया तसेच, अतिदक्षता विभागात किंवा नवजात अर्भकांना होणाऱ्या विविध जंतूसंसर्गांवर कार्बापेनेम ही प्रतिजैविके 'हुकमी इलाज' मानली जात असत. त्याचप्रमाणे, मूत्रमार्गाच्या जंतूसंसर्गावर फ्लुओरोक्विनॉलोन वर्गातली प्रतिजैविके आणि परम्यावर वापरली जाणारी सेफॅलोस्पोरीन वर्गातली प्रतिजैविके ही आजवर 'रामबाण उपाय' मानली जायची. पण रोगजंतूंमध्ये प्रतिजैविकरोध (अँटिबायोटिक्स रेझिस्टन्स) निर्माण झाल्यामुळे ही सर्व प्रतिजैविके निरुपयोगी ठरत आहेत. क्षयाचे काही वाण (स्टेन्स) तर असे आहेत की ते कोणत्याच प्रतिजैविकाला दाद देईनासे झाले आहेत.

अनिर्बंध पसरणाऱ्या साथी या मानवजातीला नवीन नाहीत. किंबहुना, मानव या पृथ्वीतलावर निर्माण होण्याच्या कितीतरी आधीपासून रोगकारक जंतू पृथ्वीवर हजर होते. वनस्पती स्वतःचे अन्न स्वतःच बनवू शकत असल्या तरी अन्य सजीव हे परावलंबीच असतात. त्यामुळे 'जीवो जीवस्य जीवनम्' या न्यायाप्रमाणे ते इतरांवरच आपली गुजराण करतात. याचाच एक भाग म्हणून विविध प्राण्यांना जंतू रोगग्रस्त करतात. सूक्ष्म आकारामुळे जंतूंना दोन फायदे होतात. एक म्हणजे ते सहजपणे दिसत नाहीत. हरणाला वाघ दिसला तर ते पळू शकते, पण न दिसणाऱ्या रोगजंतूंपासून ते पळण्याचा प्रश्नच



उद्भवत नाही. या सूक्ष्म आकारामुळेच 'रोग कशामुळे होतात' याचा मानवाला हजारो वर्षे पत्ताच नव्हता! सूक्ष्म आकाराचा दुसरा फायदा म्हणजे, त्यामुळे प्राण्यांच्या शरीरातली जैविक साधनसामग्री (रिसोर्स) वापरून जंतू स्वतःची संख्या फारच झपाट्याने वाढवू शकतात आणि सहजपणे एका प्राण्याकडून दुसऱ्या प्राण्याकडे जाऊ शकतात. यामुळे जंतू झपाट्याने पसरून रोगाची साथ निर्माण होते. सर्वसाधारणपणे प्राण्यांचा वावर मर्यादित क्षेत्रात राहत असल्यामुळे साथी या विशिष्ट क्षेत्रापुरत्या मर्यादित राहत. पण दूरवर स्थलांतर करणाऱ्या प्राण्यांमुळे साथी दूरवरही पसरतात. व्यापारामुळे मानवप्राण्याचा जगभर संचार सुरू झाल्यानंतर साथींना जगद्व्यापीसाथींचे (पॅनडेमिक) स्वरूप येऊ लागले आणि त्यात कित्येकदा जगातली निम्म्याहून जास्त लोकसंख्या मृत्युमुखी पडू लागली.

अर्थात, जंतू आणि प्राणी यांच्यातला हा सामना काही एकतर्फी नव्हता. जंतूंच्या विरोधात प्राण्यांच्या शरीरात प्रतिरक्षासंस्था (इम्युन सिस्टिम) विकसित होत गेली. जंतूंवर प्रतिहल्ले करणाऱ्या प्रतिरक्षापेशींपासून रसायनांपर्यंत विविध गोष्टी या संस्थेअंतर्गत विकसित होत गेल्या. याचमुळे कोणत्याही साथीत काही प्राणी जंतूंना पुरून उरायचे. वाचलेल्या या प्राण्यांपासूनच पुढच्या पिढ्या निर्माण व्हायच्या.

'ब्लॅक-डेथ' नावाने ओळखल्या जाणाऱ्या चौदाव्या शतकातल्या प्लेगच्या साथीत मृत्युमुखी पडलेल्या आणि त्यानंतर काही काळाने लंडनमध्ये पुरण्यात आलेल्या सहाशे व्यक्तींच्या अवशेषांचा अलिकडेच तुलनात्मक अभ्यास केल्यावर दक्षिण कॅरोलिना विद्यापीठाच्या शेरॉन डे-विट्ट आणि त्यांच्या सहकाऱ्यांना असे आढळले आहे की साथीमधून शिल्लक राहिलेल्या लोकांच्या वंशजांचे आरोग्य साथीपूर्वीच्या लोकांपेक्षा कितीतरी अधिक चांगले होते. असे होण्याचे मुख्य कारण हे आहे, की प्रत्येक साथ ही एक 'जैव-चाळणी' म्हणूनही काम करते. साथीपूर्वीच्या अनुकूल परिस्थितीत, उत्तम आरोग्य असणाऱ्या व्यक्तींप्रमाणे वाईट आरोग्य असणाऱ्या व्यक्तीही सहजपणे जगू शकतात. किंबहुना आधीच्या अशा अनुकूल परिस्थितीमुळेच लंडन आणि आसपासच्या भागातली लोकसंख्या बरीच वाढली होती. पण ब्लॅक-डेथचा फेरा येताच वाईट आरोग्य असणाऱ्या व्यक्ती मोठ्या संख्येने बळी पडल्या. याउलट, ब्लॅक-डेथच्या तडाख्यातून वाचलेल्यांमध्ये उत्तम आरोग्य असणाऱ्या व्यक्तींची बहुसंख्या होती. पुढच्या पिढ्या या त्यांच्या वंशातल्या होत्या. त्यांना उत्तम आरोग्यास अनुकूल असे जनुक अनुवांशिक वारशाने मोठ्या प्रमाणात मिळाले होते. परिणामी, साथीनंतरच्या लोकांचे आरोग्य अधिक चांगले असल्याचे पुरावे त्यांच्या अवशेषांमध्ये आढळले.

जंतूंच्या विरोधात प्राणी विविध खाद्यान्नांचाही वापर करताना दिसतात. मानवाने ही प्रक्रिया अधिक पद्धतशीर बनवून त्यातून वैद्यकशास्त्र जन्माला घातले. आयुर्वेद, युनानी, तिब्ब, झाँग यी (चिनी वैद्यकपद्धती), सिद्ध, समगुणचिकित्सा (होमिओपॅथी) आणि विषमचिकित्सा (ॲलोपॅथी) अशा अनेक वैद्यकपद्धती जगभरात जन्माला आल्या. त्यांच्यामुळे मानवाला आपले आरोग्य अधिक चांगले राखण्यास आणि रोगांचे दुष्परिणाम कमी होण्यास मदत झाली.

'जंतूंमुळे साथीचे रोग होतात,' या लुई पाश्चर यांच्या शोधामुळे रोगांचे मूळ सापडले. मग शास्त्रज्ञांनी विविध रोगांचे जंतू शोधण्याचा सपाटा लावला. जंतूंपासून लस बनवण्यात येऊ लागल्यावर लशी टोचून विविध रोगांच्या साथी नियंत्रणात आणणे शक्य होऊ लागले. अलेक्झांडर फ्लेमिंग यांनी पेनिसिलीनच्या रूपाने पहिले प्रतिजैविक शोधून काढल्यावर जंतूंचा प्रतिकार करण्याचे एक फार मोठे हत्यार मानवाला उपलब्ध झाले. प्रयोगशाळांमधून वेगवेगळी प्रतिजैविके संशोधकांनी शोधून काढली. मग बरेचसे रोग योग्य ती प्रतिजैविके वापरून बरे करणे शक्य होऊ लागले. आणि अनेक सहस्रकांच्या प्रतीक्षेनंतर मानवाला रोगमुक्तीचा आनंदमार्ग उपलब्ध झाला.

अर्थात, मानवालाही जंतूंबरोबरचा सामना एकतर्फी जिंकणे शक्य नव्हते. ज्याप्रमाणे प्रत्येक साथ ही एक जैव-चाळणी होती त्याप्रमाणे प्रत्येक प्रतिजैविक हीही एक जैव-चाळणी असते. आश्चर्य म्हणजे, प्रतिजैविकांच्या शोधाआधीही काही जंतूंकडे असे जनुक होते की यामुळे ते प्रतिजैविकांनाही पुरून उरू शकतील! फ्रान्समधल्या आय मार्सेल विद्यापीठाच्या क्रिस्तेल देस्न्यू आणि त्यांच्या सहकाऱ्यांना बेल्जियममधल्या सातशे वर्षांपूर्वीच्या शौचालयाचे उत्खनन करताना सापडलेल्या जंतूंमध्ये प्रतिजैविकांवर

मात करणारे असे जनुक असल्याचे आढळले. त्या काळी मानवाला प्रतिजैविके सापडलेली नव्हती, तरीही ते जनुक जंतूंमध्ये हजर होते. मानवाने जंतूंविरुद्ध प्रतिजैविके वापरायला सुरुवात करताच, त्यामुळे बहुसंख्य जंतू नष्ट झाले तरी ज्यांच्यात असे प्रतिजैविकरोधी जनुक होते ते प्रतिजैविकांच्या माऱ्यातूनही शिल्लक राहिले. जंतूंच्या पुढच्या पिढ्या त्यांच्यापासून निर्माण झाल्यामुळे त्या पुढच्या पिढ्यांमध्येही प्रतिजैविकरोधी जनुक संक्रमित झाले होते. अशा रीतीने हळुहळू प्रतिजैविकाला दाद न देणाऱ्या जंतूंची संख्या वाढू लागली.

दरम्यान मानवही एकाच जंतूवर लागू पडणारी वेगवेगळी प्रतिजैविके शोधत होता. त्यामुळे एक प्रतिजैविक लागू पडत नसेल तर दुसरे प्रतिजैविक वापरण्याचा पर्याय उपलब्ध होत गेला. एका प्रतिजैविकरोधी जनुकाने जंतू सुसज्ज झाले तरी दुसऱ्या प्रतिजैविकाने त्या जंतूंना नष्ट करणे शक्य व्हायचे. काही वेळा तर प्रतिजैविकरोधावर मात करण्यासाठी एकाच वेळी अनेक प्रतिजैविकांचा मारा करण्यात येऊ लागला. त्यामुळे कोणाच्या तरी कोंबड्याने रोगमुक्तीचा सूर्य उगवत राहिला!



पण लवकरच या सूर्यालाही ग्रहण लागले. त्याला कारण होते जंतूंचा एक गुण. मानवाप्रमाणेच जंतूही 'एकमेकां साह्य करू। अवघे धरू सुपंथ।' हे ब्रीद पाळतात. ज्या जंतूंकडे प्रतिजैविकरोधी जनुक नसतील असे जंतू जर प्रतिजैविकरोधी जनुक असणाऱ्या जंतूंच्या सान्निध्यात आले तर प्रतिजैविकरोधी जनुकाची एक प्रत बनवून त्यांना ती दिली जाते! त्यामुळे एकाच वेळी अनेक प्रतिजैविकांचा मारा केला तरी, त्यातल्या प्रत्येक प्रतिजैविकावर मात करणारा जनुक काही थोड्याशाच जंतूंकडे असला तरी, उरलेल्या जंतूंकडेही त्या जनुकाची प्रत अल्पावधीत उपलब्ध होते. त्यामुळे लवकरच ते सगळेच जंतू त्यातल्या कोणत्याच प्रतिजैविकाला दाद देईनासे होऊ लागतात!

अर्थात, विज्ञानभयकथांमध्ये काही वेळा दाखवतात त्याप्रमाणे, प्रतिजैविकांना दाद न देणाऱ्या रोगजंतूंच्या साथींमुळे पृथ्वीवरची मानवजात आता संपुष्टात येणार, असा याचा अर्थ नव्हे. प्रतिजैविके प्रभावी असतानासुद्धा दर चारजणांपैकी एकजण जंतूंमुळे संसर्गजन्य रोग होऊन मरत असे. याउलट, पूर्वीच्या अत्यंत भयानक अशा साथींमध्येही दर चार जणांपैकी एकजण जंतूंमुळे होणाऱ्या संसर्गजन्य रोगावर मात करून जिवंत राहत असे. त्यामुळे मानवजात नक्कीच शिल्लक राहील. पण प्रतिजैविके निष्प्रभ झाल्यामुळे रोगांच्या साथी पुन्हा थैमान घालू लागल्या तर मानवजातीच्या जीवनावर मात्र प्रचंड मोठा आघात होईल.

पहिला दुष्परिणाम म्हणजे, एकीकडे जगाची लोकसंख्या घटू लागेल, आणि त्याच वेळी दुसरीकडे कुटुंबनियोजनाची संकल्पना मोडीत काढावी लागेल. आज 'हम दो, हमारे दो' या घोषणेप्रमाणे दोनच मुले जन्माला घातली तरी वंश पुढे चालू राहण्यासाठी ते पुरेसे ठरते. पण प्रतिजैविकरोधामुळे ही दोनच मुले साथीनंतर आपला वंश चालू ठेवण्याला शिल्लक राहतील याची शाश्वती नसल्याने होतील तितकी मुले होऊ देण्याच्या पर्यायाकडे लोकांना अपरिहार्यपणे वळावे लागेल. यातली बरीच मुले जिवंत राहिली तर लोकांना आर्थिक समस्यांना तोड द्यावे लागेल. त्यामुळे एका टोकाला निर्वंश आणि दुसऱ्या टोकाला हलाखीचे दरिद्री जीवन अशा कात्रीत बहुसंख्य लोक सापडतील. आज ऐहिक सुखसमृद्धीने भरलेले जीवन जगण्याची सवय असणाऱ्यांना ही गोष्ट खूपच अवघड वाटेल.

याखेरीज इतरही अनेक दुष्परिणामांचा धोका आहे. अशाश्वततेमुळे लोक तात्कालिक विचार करू लागतील. असहाय्यतेच्या जाणिवेतून धार्मिकतेत वाढ होऊ शकेल. कोणावर तरी खापर फोडण्याच्या प्रवृत्तीतून धर्मांधता किंवा वंशवाद उफाळून येऊ शकेल. किंबहुना, पूर्वीच्या साथींच्या काळातला इतिहास पाहिला तर संभाव्य धोके प्रकर्षाने जाणवतात. मध्ययुगात युरोपातल्या प्लेगच्या साथींच्या काळात, मरणाऱ्यांना मदत करण्याऐवजी लुटण्याचे प्रकार वाढल्याची नोंद आहे. युरोपात ज्यू, फ्रायर (रोमन कॅथलिकांचा एक उपगट), रोमानी (भारतीय वंशाचा युरोपात स्थलांतरित झालेला गट), कुष्ठरोगी, प्रचंड प्रमाणात तारुण्यपीटिका असणाऱ्या व्यक्ती, परदेशी व्यक्ती, भिकारी आणि यात्रेकरू यांच्यावर साथींचे संकट 'घेऊन' आल्याबद्दल हल्ले करण्यात आल्याच्या नोंदी आहेत. मेन्झ, स्ट्रॉस्बर्ग आणि कोलन या शहरांमध्ये राहणाऱ्या सर्व ज्यूंची 'साथींना जबाबदार असल्याबद्दल' हत्या करण्यात आली होती.

मात्र, या सर्व गोष्टी अपरिहार्य आहेत असे नाही. मानवाने प्रतिजैविकांचा वापर टळला तर प्रतिजैविकाला रोधक असे जनुक नसणाऱ्या जंतूंची संख्या वाढू लागते. उपयोग न राहिल्यामुळे प्रतिजैविकरोधाचे जनुक जंतूंमध्ये पसरणे थांबते. पुरेसा काळ एखादे प्रतिजैविक वापरले नाही तर ते प्रतिजैविक त्या रोगावर पुन्हा लागू पडू लागते असे आढळते ते याचमुळे!

पण प्रतिजैविकरोधाचे दुष्परिणाम टाळण्यासाठी मानवजातीला अनेक पावले ताबडतोबीने उचलावी लागतील. पहिली गोष्ट म्हणजे प्रतिजैविकांचा वापर अत्यंत संयमाने करावा लागेल. गरज नसताना एक किंवा अनेक प्रतिजैविके देणे डॉक्टरांनी टाळायला हवे. लक्षणे कमी झाल्यावरही दिलेल्या प्रतिजैविकांचा कोर्स रुग्णांनी निष्ठेने

पुरा करायला हवा. रुग्णालयांमधली स्वच्छता वाढवायला हवी म्हणजे रुग्णालयात होणाऱ्या जंतूसंसर्गांसाठी भरमसाठ प्रतिजैविके देण्याची गरज राहणार नाही. आजारी नसणाऱ्या गुरांना (प्रामुख्याने पाश्चिमात्य देशांमध्ये) व्यापारी फायद्यासाठी प्रतिजैविके देतात, ते बंद करायला हवे. रुग्णांनी अन्य उपायांनी आजार टाळण्यावर भर द्यायला हवा. उदाहरणार्थ, सर्दी-खोकला झाल्यावर घाईने प्रतिजैविके घेण्यापेक्षा गरम हळद-दूध, पारंपरिक काढे किंवा वाफाऱ्यांसारख्या उपायांनी सर्दी-खोकला नाहीसा करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. या गोष्टींमुळे जंतूंमध्ये प्रतिजैविकरोध निर्माण होण्याचे प्रमाण कमी होईल.

प्रतिजैविकांना पर्याय शोधण्यासाठी जगभरात पद्धतशीरपणे तातडीने प्रयत्न सुरू करावे लागतील. अलिकडेच क्युबातल्या फिनले संशोधन संस्थेचे गुस्ताव्हो ब्राखो आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जंतूंपासून समगुणचिकित्सा पद्धती (होमिओपॅथी) वापरून, विरलीकरणाने (डायल्युशन) औषध तयार करून लेप्टोस्पायरॉसिसची (लेप्टोस्पायरा प्रकारातील जंतूंमुळे होणारा डोकेदुखी, स्नायुदुखी, ताप, फुप्फुसांमधून रक्तस्राव आणि मेंदू तसेच पाठीच्या कण्याला सूज आणि दाह निर्माण करणारा गंभीर आजार) साथ नियंत्रणात आणण्यात यश मिळवले होते. विरलीकरणाने बनवलेले औषध सहजपणे स्वस्तात लाखो लोकांना उपलब्ध करून देता येते. पण अशा औषधांमधून भरमसाठ नफा कमावणे शक्य नसल्याने अशा संशोधनाला आर्थिक मदत करायला औषधनिर्माण कंपन्या फारशा उत्सुक नसतात. जागतिक आरोग्य संस्थेसारख्या संघटनांनी अशा पर्यायी चिकित्सापद्धतींवरील संशोधनाला पैसा उपलब्ध करून द्यायला हवा. बेलारूसमधल्या क्षयरोग संशोधन संस्थेचे अलेक्सांद्र स्क्राहीन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी रुग्णाच्या शरीरातल्या प्रतिरक्षापेशी शरीराबाहेर वाढवून, त्या रुग्णाच्या शरीरात परत टोचण्याचे तंत्र वापरून, कोणत्याही औषधाला दाद न देणाऱ्या क्षयाच्या जंतूंचा नायनाट करून रुग्णांना बरे करण्यात यश मिळवले आहे. भविष्यात असे प्रयोग अन्य जंतूंवरही करण्यात येणार आहेत. जंतूंच्या विरोधात आपल्याच शरीरातल्या प्रतिरक्षापेशी वापरण्याचा हा मार्ग अतिशय सुरक्षित आहे. प्रतिरक्षापेशी शरीराबाहेर कमी खर्चात वाढवण्याचा पर्याय उपलब्ध करून देणे हे यापुढचे मोठे आव्हान आहे.

सध्या प्रतिजैविकरोधाची नुसती सुरुवात झाली आहे. योग्य ती पावले वेळीच उचलली नाहीत तर साध्यासाध्या रोगांच्या जगद्व्यापीसाथी मानवजातीला त्रस्त-ग्रस्त करून सोडतील. या धोक्याकडे गंभीरपणाने लक्ष देऊन त्वरित ठोस कृती केली तरच मानवजातीवरचे हे साथींच्या संकटाचे सावट नाहीसे करण्यात आपण भविष्यकाळात यशस्वी होऊ शकू.

**– सुधीर थत्ते**
फ्लॅट नं. ११३, टॉवर ए ६, गोदरेज गार्डन एन्क्लेव्ह,
पिरोजशानगर, विक्रोळी (पूर्व), मुंबई ४००० ०७९
भ्रमणध्वनी ९९८७५८८५८३
sudhirthattey@yahoo.com

**वैश्विक उपचार**
**चाकोरीबाहेरी विचार**

**विपिन मेहता**
अनुवाद : **विजया बापट, संपादन : अपर्णा वेलणकर**




'मनोरचना बदला, जग बदला' असे सांगणारे विपिन मेहता त्यांच्या 'वैश्विक उपचार' (ग्लोबल हिलिंग) या ग्रंथत्रयीपैकी या पहिल्या ग्रंथात, नकारात्मक संकोचित मनोरचनेचे सकारात्मक विधायक मानसिक रचनेत 'परिवर्तन' घडवण्यासाठी अध्यात्मशास्त्र कसे लागू करता येईल हे आपल्याला दाखवून, ते आपला प्रवास सुरू करून देतात आणि आपल्या पसंतीचे वास्तव निर्माण करण्यासाठी, त्याची बांधणी करण्यासाठी व ते प्रत्यक्षात आणण्यासाठी आध्यात्मिक साधने आपल्या हाती देतात आणि ते करताना आपले बाह्य जड जग अंतिमत: आपल्या आंतरिक जगाचे प्रतिबिंब कसे आहे ते दाखवतात.

**मूल्य १८० रुपये ● सवलतीत ११० रुपये**

**ग्रं था ली**

# सांस्कृतिक विकासाचा नवा उठाव

**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**

**विदर्भ** हा महाराष्ट्रातला असा एकमेव प्रदेश आहे ज्याचा उल्लेख अतिप्राचीन काळापासून 'विदर्भ' याच नावाने होत आला आहे. हा उल्लेखही ज्या कारणांसाठी होत आला ती कारणेही सांस्कृतिक असून प्राचीन काळापासूनच वैदर्भीय रीती तसेच 'वच्छोमी रीती' ही विदर्भाच्या संस्कृतीसाठी उल्लेखली गेलेली शैली व विदर्भ ही 'सारस्वती जन्मभूः' राहिलेली आहे. प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत सातत्याने उल्लेखला जाणारा सांस्कृतिक व सांस्कृतिक दृष्ट्या एवढा समृद्ध भूभाग महाराष्ट्रात दुसरा नाही. त्या सोबतच अकराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत म्हणजे मराठी भाषा, साहित्य-संस्कृती यांच्या समृद्धी व भरभराटीच्याही काळात, सुमारे सातशे वर्षे मराठी वाङ्मयाची, भाषेची, संस्कृतीची दिशा ठरवण्याचे, त्याला आकार देण्याचे सूत्रधारपद महावैदर्भीयांकडेच होते. तसेच, ज्योतिर्विद्या, शिल्पविद्या, गणित, संगीत, नाटक, हस्तकला, लोककला, नागरविद्या, जानपदविद्या, वस्त्रोद्योग, हस्तोद्योग अशा कितीतरी संस्कृतिसंबद्ध बाबतीत विदर्भ ही अग्रेसर भूमी राहिली आहे. भाषा साहित्य, नाटक, कला, संस्कृतीची वेगवेगळी अंगे, पर्यावरण, उपजीविका, ज्ञान, अर्थव्यवहार व त्या आधारे संस्कृतिआधारित संपत्ती निर्माण करणारी संस्कृतीची व्यापक व सर्वसमावेशक अशी व्याख्या जपलेलाच हा भूभाग राहिलेला आहे. सांस्कृतिक दृष्ट्या त्यामुळेच विदर्भाचे वेगळेपण व श्रेष्ठत्व हे प्राचीन ऐतिहासिक सत्य असल्यानेच बापूजी अण्यांनी या सांस्कृतिक वैशिष्ट्यांच्या जतनासाठी व तिच्या आधुनिक विकासासाठीच फाजल अली कमिशनसमोर विदर्भ वेगळा राखण्याची कैफियत मांडली होती. ती राजकीय सत्ताकारणाची कैफियत नव्हती.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धापासून, म्हणजे केवळ दोनशे वर्षांपूर्वीपासूनच विदर्भातले हे सारे सांस्कृतिक उत्थानाचे केंद्र मुंबई-पुण्याकडे हलले व ते देखील ब्रिटिश राज्यानंतर. वऱ्हाड-नागपूरची भाषा आणि संस्कृती ही त्यानंतर निम्न दर्जाची आणि मागास ठरवली जाऊ लागली. कारण आधुनिक शिक्षणव्यवस्थेत ब्रिटिश राज्यातील शालेय पाठ्यपुस्तके आणि संस्कृतीचे एकूण व्याकरणच मुंबई-पुण्याकडील विद्वानांकडून रचले जाऊन ते इकडे आयात होऊ लागले. त्यामुळे सारा वैदर्भीय संस्कृतीव्यवहारच दुय्यम नागरिकत्वाच्या दर्जाचा होऊन बसला. त्यातूनच आजचे सारे वैदर्भीय न्यूनगंड व तथाकथित भाषिक-सांस्कृतिक मागासलेपण लादले गेले आहे.

मात्र गेल्या सात-आठ दशकांपासून वैदर्भीयांच्या नवसांस्कृतिक उठावाने आपली जी ठसठशीत मुद्रा साहित्य आणि संस्कृतीच्या क्षेत्रावर उमटवली आहे तिची गौरवास्पद दखल घेण्याची, ती जपण्याची, तिच्या वृद्धीची दृष्टी व इच्छाशक्ती इथल्या राजकीय नेतृत्वाच्या आणि तथाकथित सांस्कृतिक नेतृत्वाच्या व आपापल्या नेतृत्वाखालील छोट्या टोळ्या व कळपापर्यंतच तेवढा सांस्कृतिक व्यवहार व जाण संकुचित करू बघणाऱ्यांजवळ उरलेली नाही.

या पार्श्वभूमीवर नव्या सांस्कृतिक संस्थात्मक पुनर्रचनेची व नव्या व्यापक सांस्कृतिक उठावाची जी नितांत गरज निर्माण झाली ती भागवणारी यंत्रणा म्हणूनच 'महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडी'अंतर्गत 'विदर्भ सांस्कृतिक आघाडी'सारखी चळवळ उभी राहिली आहे. या चळवळीने महाराष्ट्राच्या एकांगी व तुटपुंज्या, वगळले गेले त्यांना अधिकच वगळून, दूर सारून तयार केलेल्या व ज्याची अंमलबजावणी देखील शून्य असलेल्या तथाकथित सांस्कृतिक धोरणाची चिकित्सा करून; विदर्भाचा सांस्कृतिक अनुशेष भरून काढण्यात ते कसे पूर्णतः कुचकामी आहे हे दाखवून दिले आहे.

संस्कृती म्हणजे केवळ नाच, गाणे, वेशभूषा, केशभूषा, विविध मनोरंजनाचे कार्यक्रम आणि व्यासपीठीय सादरीकरणात्मक कार्य नव्हे. संस्कृती ही मानवी जीवनाची समग्र प्रातिनिधिक अशी अवस्था व व्यवस्था आहे. साहित्य, भाषा, कला हा संस्कृतीचा अत्यल्प असा एक व्यवहार आहे, एकमेव नव्हे.

संस्कृती ही एक समग्र, सर्वसमावेशक व विविध परस्परसंबद्ध घटकांची मिळून असणारी वीण आहे आणि त्यातून अर्थकारण राजकारण, समाजकारण, सत्ताकारण, वर्चस्वकारण, संस्थाकारण अशा बाबी वगळून चालणार नाहीत.

संकृतिअध्ययन, 'कल्चरल स्टडीज' नावाच्या ज्ञानशाखेने जगभरच संस्कृतीबद्दलचे नव-भान, ज्ञान व त्याचे प्रत्यक्ष उपयोजन याचे कार्य केले आहे. त्याची पुसटशीही जाण आणि भान अद्यापही

आपल्याकडचे राज्यकर्ते, प्रशासन, निर्णयकर्ते, अधिकारी, विकासयंत्रणा, साहित्य-संस्कृती क्षेत्रातील संस्था, कार्यकर्ते, विद्वान व विचारवंत यांनादेखील आलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. संस्कृती, सांस्कृतिक विकास, सांस्कृतिक उन्नयन, सांस्कृतिक उत्थान या बाबी त्यामुळेच अद्यापही आपल्याकडे विकासाच्या प्रक्रियेचा; त्यातही आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचा महत्त्वाचा भागच समजल्या जात नाहीत.

संस्कृतीचे क्षेत्र हे त्यामुळे अद्यापही शिस्तीने, व्यावसायिक गांभीर्याने व व्रतस्थपणे कार्य करणाऱ्यांचे क्षेत्र झालेले नसून ते केवळ फावला वेळ घालवण्यासाठीचे, तसा वेळ घालवणाऱ्या हौशींचे वा या क्षेत्राच्या आधारे आपले कळप, टोळ्या, गट उभारून आपले नेतृत्व, सत्ताकारण व वर्चस्व टिकवू बघणाऱ्यांचे तेवढे क्षेत्र प्रामुख्याने अधिक होऊ दिले गेले आहे.

संस्कृती हे आपले वर्चस्व टिकवू इच्छिणाऱ्या वृत्ती व व्यवस्थांच्या राजकारणाचे नेहमीच प्रभावी क्षेत्र राहिले आहे. ते धर्मनिरपेक्ष नव्हे तर धर्म आणि ईश्वरसापेक्षच कसे राखले जाईल हेच बघितले गेले आहे. सांस्कृतिक विकास हा त्यामुळे धर्म व ईश्वरसंबद्ध कार्य व संस्थात्मकता याच्याच विकासाशी जोडून बघितला जातो. संस्कृती व सांस्कृतिक विकास हा त्यामुळे अद्यापही आपल्या जिल्हास्तरापासून राज्य व राष्ट्रीय स्तरापर्यंत, नियोजन मंडळे व यंत्रणा, प्रशासन व अधिकारी यांच्या पातळ्यांवर, त्यासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्याच्या अग्रक्रमाचा विषयच झालेला नाही.

विकासाच्या संकल्पनेत संस्कृती व संस्कृतिक्षेत्राचा अंतर्भावच स्वतंत्रपणे केला जात नसल्याने एखाद्या भूभागाच्या आर्थिक विकासात, संपत्ती निर्माण करण्यात, रोजगार व स्वयंरोजगार निर्मितीत, कायदा व सुव्यवस्था यावरील भार व खर्च कमी करण्यात, समाज सहिष्णू व विवेकी राखण्यात संस्कृतीच्या व्यापक व सर्वसमावेशी क्षेत्राचे महत्त्व आणि योगदानच स्वतंत्रपणे लक्षात घेतले जात नाही.

ते तसे घेतले जावे व या सर्व बाबींकडे लक्ष वेधले जावे यासाठीच गेल्या काही वर्षांपासून आम्ही 'महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडी'मार्फत चालवलेल्या नवसांस्कृतिक उठावाला आता आता कुठे अल्पसे का होईना पण यश प्राप्त होऊ लागले आहे. त्याचा पहिला दृश्य परिणाम म्हणजे १९८४ साली 'विदर्भ वैधानिक विकास मंडळ' स्थापन होऊनही संस्कृती हा विषय या मंडळाच्या अग्रक्रमाचा विषय म्हणून त्यांच्या दप्तरी यंदा प्रथमच नोंदला गेला आहे. 'विदर्भाचा संस्कृतिआधारित विकास' यासाठी प्रथमच महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या निर्देशानुसार एक उपसमिती स्थापली गेली आहे.

महाराष्ट्रातल्या साऱ्याच प्रदेशांतल्या साऱ्याच वैधानिक विकास मंडळांनी संस्कृती या संकल्पनेचा अशा रीतीने विकासकार्याचा स्वतंत्रपणे भाग करावा यासाठी महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडी प्रयत्नशील आहे. संस्कृतीचे क्षेत्र हे आज जगभरच छोट्या छोट्या राष्ट्रांमधून, राज्यांमधून, शहरांमधून, आर्थिक विकासाचे, स्वयंरोजगाराचे व सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या वाढीचे क्षेत्र म्हणून



वेगाने विकास पावत असताना महाराष्ट्र हे राज्य व त्याचे विदर्भासारखे सांस्कृतिक दृष्ट्या संपन्न भूभाग मात्र त्यापासून अनभिज्ञ राहावेत व राखले जावेत हे आपल्या साऱ्यांचेच घोर असे अज्ञान व सामूहिक अपयश आहे.

या अपयशाचे रूपांतर आता तरी यशप्राप्तीत करूया. त्यासाठी राज्यपालांनी सांगितल्यावरून नेमल्या गेलेल्या उपसमितीच्या निमित्ताने प्रथम नागविदर्भाच्या सांस्कृतिक उत्थानाच्या दृष्टीने आपण प्रत्यक्षात काय काय करू शकतो हे बघितले पाहिजे. उदाहरणादाखल विदर्भ वैधानिक विकास मंडळाच्या उपसमितीमार्फत प्रस्तुत लेखकाने जो कृतिपर कार्यक्रम सुचवला आहे तो बघितला पाहिजे. तो बघण्याआधी जगभर या दृष्टीने काय चालले आहे ते अगोदर जाणून घेतले पाहिजे.

संस्कृती व संस्कृतिआधारित विकासाची संकल्पना ही आज विकासासाठी वाहक समजली जाते आहे. सकल राष्ट्रीय उत्पन्नात संस्कृतीचे क्षेत्र मोठी भर घालत आहे.

त्यासाठी 'सांस्कृतिक अर्थव्यवस्था' असा शब्दप्रयोगच आता प्रचारात आणला गेला आहे. त्या अंतर्गत :

- भौतिक संसाधने व संस्थात्मक संसाधने, तंत्रज्ञानात्मक संसाधने उभारणे;
- संस्कृतिक्षेत्राच्या विकासाची, संशोधनाची प्रशिक्षणे आयोजित करणे;
- या क्षेत्रासाठी भांडवली गुंतवणूक व यथायोग्य आर्थिक साधनांची उभारणी करणे;
- त्या दृष्टीने नियोजन व नियम तयार करणे;

या प्राथमिक गरजा भागवल्या जाणे आवश्यक आहे.

युनेस्कोने त्यासाठी 'वर्ल्ड फोरम ऑन कल्चर अँड कल्चरल इंडस्ट्रीज' निर्माण केलेली आहे. विकासाच्या संकल्पनेत संस्कृति-संकल्पनेचा जो समावेश आज होत नाही तो व्हावा आणि त्यासाठी नियोजनयंत्रणा, निर्णयकर्ते, राज्यकर्ते, प्रशासन, अधिकारी हे संस्कृतिसाक्षर व्हावेत असे प्रयत्न केले जात आहेत.

स्पेनमध्ये संस्कृतीक्षेत्राला विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे स्थान दिले गेले असून वार्षिक ९५ दशलक्ष अमेरिकन डॉलर एवढी रक्कम त्यावर खर्च केली जाते. खाजगी क्षेत्रालाही या कामाला लावले गेले आहे.

फ्रान्समध्ये संस्कृतिक्षेत्राचे अर्थकारण ८ टक्के वार्षिक वाढ दाखवते आहे. नफा कमावून देण्याचे तसेच परकीय चलन कमावण्याचे संस्कृती हे क्षेत्र अन्य उद्योगांप्रमाणेच विकसनशील क्षेत्र असल्याने त्यासाठी संस्कृतिविषयक अभिरुची असणारा सांस्कृतिक वृत्तीचा ग्राहक व सांस्कृतिक क्षेत्रातील वस्तूंचा व्यापार निर्माण करण्याचे कार्य केले जाते आहे. फ्रान्समधल्या स्थानिक कला, संस्कृती व या क्षेत्रातले कलावंत, कारागीर इत्यादींसाठी जगभरात संधी निर्माण करण्याचे प्रयत्न फ्रान्सचे संबंधित मंत्रालय करते. सार्वजनिक इमारतींच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकात १ टक्का एवढी रक्कम त्यासाठीच्या कलावस्तू विकत घेण्यासाठी ठेवली जाते. फ्रान्समध्ये संस्कृतिविषयक क्षेत्रासाठी स्वतंत्र गुंतवणूक निधीच उभारला जातो. १२ वर्षांपर्यंत या क्षेत्रासाठी एकूण रकमेच्या अर्ध्याची हमी घेणारा निधीदेखील तयार करण्यात आला आहे.

लाओस व कंबोडियासारख्या राष्ट्रांत संस्कृतिविषयक दृष्टिकोन हा विकासार्थ पायाभूत मानला जातो.

रिपब्लिक ऑफ बेनिनने तर सामाजिक व आर्थिक वास्तवापासून संस्कृतिआधारित अर्थकारण वेगळे न करण्याचेच धोरण स्वीकारले आहे. अनेक राष्ट्रांमध्ये अजूनही 'संस्कृतिसंबद्ध विकास' ही संकल्पना म्हणूनही स्वीकारली जाणे बाकी आहे. बेनिनमध्ये संस्कृतिविषयक व सांस्कृतिक वारसाविषयक स्वतंत्र निधी स्थापण्यात आला आहे. सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यासाठी तो उपलब्ध करून दिला जातो. साधने, संसाधने, सोयी, सवलती देतानाच कलावंतांसाठी आरोग्यविम्याची सोयही केली जाण्याचे तिथे चालले आहे. त्या निधीचे स्वरूप केवळ सामाजिक वा धर्मादाय नसून एकूण विकासधोरणांतर्गत हा निधी आणला गेला आहे.

संस्कृतीचे क्षेत्र मेक्सिकोसारख्या राष्ट्रात सकल उत्पन्नाच्या ६ टक्के, बुएनो एआर्स प्रांतात ७ टक्के आणि पॅराग्वेमध्ये १ टक्का एवढी भर घालते आहे.

युरोपीयन विकास आयोगाच्या मते ब्राझील, रशिया, भारत, चीन अशा राष्ट्रांमध्ये तर संस्कृतीच्या क्षेत्रविकासासाठी फार अल्पशा अशा निधीची गरज आहे.

ब्राझीलमध्ये संस्कृतिसंबद्ध क्षेत्रातील गुंतवणुकीवर १०० टक्के करसवलत दिली जाते.

रशिया व चीनमध्ये राष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील संस्कृतिसंबद्ध क्षेत्राचा वाटा अतिशय महत्त्वाचा व मोठा आहे. १० वर्षांपूर्वीच्या चीनच्या अहवालानुसार ९० लक्ष लोकांना ३ लक्ष ४६ हजार संस्कृतिसंबद्ध उद्योगांमध्ये रोजगार लाभलेला होता. २००८ मध्ये सकल उत्पन्नात ८ टक्केच वाढ होती मात्र संस्कृतिक्षेत्रातील उद्योजकतावाढीचा दर १० टक्के होता. त्याच वर्षी संस्कृतिविषयक मनोरंजन व सादरीकरणात्मक कलेच्या क्षेत्रात २००७ च्या तुलनेत १६ टक्के वाढ झालेली होती. चीनमध्ये संस्कृतिक्षेत्राला राज्याचा उदार आश्रय लाभला असून २६ प्रादेशिक सरकारांनी सांस्कृतिक उद्योजकतेच्या विकासासाठी विशेष निधी तयार केला आहे.

कॅनडामध्ये १ लाख ४० हजार लोक एकट्या क्युबेकमध्ये दरवर्षी या क्षेत्रातून १० कोटी कॅनेडियन डॉलरची संपत्ती निर्माण करतात.

फ्रान्समधील ताज्या अध्ययनानुसार संस्कृतिसंबद्ध क्षेत्रातील व्यापाराचा अन्य कितीतरी वस्तूंच्या उलाढालीवर मोठा परिणाम पडत असतो. या क्षेत्रातील १० टक्के वाढ ही अन्य पारंपरिक उद्योगक्षेत्रातील व्यापारात ३.२५ टक्के ते ४.२५ टक्के वाढ घडवून आणणारा परिणाम साधते.

फ्रान्सच्या एका राजदूताच्या मते भारतासारख्या राष्ट्रात, जिथे संस्कृती ही खोलवर मुळे रुजलेले क्षेत्र आहे तिथे, हे क्षेत्र ही



भारताची विकासाची मोठी साधनसामुग्री ठरू शकते. सांस्कृतिक क्षेत्राच्या विकासासाठी राज्याची भूमिका ही पायाभूत महत्त्वाची असून संस्कृतिविषयक हक्क, अधिकार आणि स्वामित्व म्हणजे काय हे निश्चितपणे ठरवणे आवश्यक आहे. त्याच्या मते, संस्कृती ही विकासाला शुद्ध रक्तपुरवठा करणारे हृदय समजली गेली पाहिजे. संस्कृतिक्षेत्राला पैसा देणे म्हणजे लोक आणि समाज बळकट करून समतोल असा सामाजिक-आर्थिक विकास साधणे होय.

नेदरलँडमध्ये कला आणि विज्ञानाच्या क्षेत्रात राज्याने हस्तक्षेप न करणे हा त्यांच्या सांस्कृतिक धोरणाचा भाग केला गेला असून संस्कृतिसंबद्ध क्षेत्राची त्यांनी फार सुस्पष्ट अशी व्याख्या केली आहे. त्यानुसार सांस्कृतिक वारसा, ज्यात वस्तुसंग्रहालये, ऐतिहासिक-प्राचीन स्थळे, इमारती, शिल्पे, उत्खनने येतात. माध्यमे, ज्यात भाषा, साहित्य, प्रक्षेपण, मुद्रित व श्राव्य, दृक्‌श्राव्य माध्यमे, ग्रंथालये येतात. कला, ज्यात दृश्यकला, आरेखनकला, वास्तुकला, सिनेमा, सादरीकरणात्मक कला येतात. कलाक्षेत्र, ज्यात सृजनात्मक कला, सादरीकरणात्मक कला, रंगभूमी, संगीत, सर्कस, सिनेमा, स्मारके, वास्तू व शिल्पकला, उपयोजित व अन्य कला आदी विविध स्थळे व पायाभूत साधनसामुग्री, निर्माते, प्रतिष्ठाने, अन्य सांस्कृतिक संस्था येतात. हौशी क्षेत्र, ज्यात अव्यावसायिक कलावंत व कलाक्षेत्र येत नाही आणि प्रादेशिक, स्थानिक संस्कृती अशा बाबींचा संस्कृतिसंबद्ध क्षेत्राच्या व्याख्येत समावेश त्यांनी केला आहे. हीच व्याख्या थोड्याफार फरकाने वा भर घालून सर्वत्रच लागू पडते. नेदरलँडची संस्कृतिसंबद्ध योजना दर चार वर्षांची तयार केली जाते. शासनाने स्वतःच अनेक प्रतिष्ठाने त्याअंतर्गत उभारली आहेत. मोठ्या प्रमाणावरील अनुदाने त्यासाठी दिली जातात. 'आर्टिस्ट इन रेसिडन्स' नावाच्या एका योजनेंतर्गत एकाच वर्षी २० हजार कलावंतांना अनुदानित केले गेले. २००९ मध्ये त्यांनी सादरीकरणात्मक कलांच्या कार्यासाठी व त्याच्या विपणनासाठी (मार्केटिंग) राष्ट्रीय निधीच स्थापन केला आहे.

ॲमस्टरडॅमच्या केवळ एका नगरपालिकेने 'ॲमस्टरडॅम २०१५' या शीर्षकाचा दूरदृष्टीचा संस्कृतिसंबद्ध कार्यक्रमच आखला. ज्यात सर्व संबंधित, सर्जनशील उद्योजकता, वारसासंबद्ध बाबी, 'संस्कृतीनगरी' व आंतरराष्ट्रीय पातळीवर या साऱ्याचे दर्शन घडवण्याचे धोरण आखले. तिथे गृहनिर्माणधोरण हे संस्कृतीशी जोडण्यात आले. या शहराने कलावंतांसाठी आकर्षक अशा निवासी सोयींसह कार्य होत राहणे हे उद्दिष्टच बाळगले. ३० वेगवेगळ्या ठिकाणी ६५० जागा संस्कृतीसाठी 'ब्रिडिंग प्लेसेस'-'संस्कृति-प्रजनन' योजना म्हणून त्यांनी राखून ठेवल्या. १९८९ च्या व्हॅन पफलिन सर्वेक्षणातून असे दिसते की सादरीकरणात्मक आणि सृजनात्मक कलाक्षेत्राने ८९०३ लोकांना रोजगारसंधी लाभून १०० दशलक्ष युरो एवढी प्राप्ती झाली. ३१४३ लोकांना वितरण व प्रदर्शनक्षेत्रात रोजगार लाभून ८० दशलक्ष युरो त्यातून आले, २०३७ लोकांना अन्य साहाय्यक संस्थांमध्ये काम मिळून त्यांनी ४९ दशलक्ष युरो उभे केले. २००२ च्या आकडेवारीनुसार ४ टक्के स्थानिक रोजगार व ९ टक्के व्यवसाय म्हणजे ५५९२ व्यवसायकेंद्रे ही केवळ संस्कृतिसंबद्ध क्षेत्राशी निगडित होती. २००५ मध्ये

संस्कृतिसंबद्ध क्षेत्रात २८१५० लोकांना रोजगार होता. संस्कृतिसंबद्ध विकासाने ॲमस्टरडॅमच्या अर्थव्यवस्थेला मोठा हातभार लावून २००२ मध्ये एकूण रोजगाराच्या ७ टक्के म्हणजे ३२५०० रोजगार उपलब्ध करून दिले. ताज्या सर्वेक्षणानुसार ॲमस्टरडॅमच्या पर्यटनासाठी आलेले ४० टक्के डच व ६० ते ७० टक्के अन्य परदेशी पर्यटक हे केवळ कलासंबद्ध सांस्कृतिक पर्यटनासाठी आलेले होते. येथे १५ टक्के विद्यापीठीय विद्यार्थी हे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या संस्कृती-विद्याविषयक शाखेचे आहेत. नेदरलँडच्या एनडोव्हेनमध्ये ३० हजार लोक सृजनात्मक उद्योजकतेत गुंतले असून या भागातील एकूण रोजगाराच्या ८ टक्के हा रोजगार आहे.

स्कॉटलंडमध्ये संस्कृतिसंबद्ध क्षेत्रात १ लक्ष लोकांना रोजगार असून ७५०० दशलक्ष युरो हे या क्षेत्राचे उत्पन्न सकल उत्पन्नाच्या ४ टक्के एवढे आहे. सरासरी १० टक्के वार्षिक वाढ त्यात अपेक्षित आहे. स्कॉटिश कल्चरल कौन्सिलने ५ लक्ष ७० हजार युरो एवढी गुंतवणूकवाढ केवळ नाट्यगृह उभारणीसाठी मंजूर केली आहे. १ लक्ष ९३५ हजार दशलक्ष युरो एवढा 'ट्रान्स्फॉर्मेशन' निधी उभारला गेला आहे. भांडवली बजेटव्यतिरिक्त संस्कृतिसंबद्ध क्षेत्रासाठीची तरतूद इथे महसूलाच्या ३.८ टक्के एवढी ठरवली गेली आहे. २००३-२००४ या वर्षी या क्षेत्राने १२२ दशलक्ष युरो कमावून दिले आहेत. किनबर्गमधला ९ टक्के कामकरीवर्ग हा एकट्या सांस्कृतिक पर्यटन व्यवसायातच आहे.

इंग्लंडमध्ये एकट्या मँचेस्टरमध्ये या क्षेत्रात २२ हजार ५८५ लोक ४००० व्यवसायकेंद्रांतून काम करतात. ९३५ दशलक्ष युरो ते कमावून देतात. ते सकल उत्पन्नाच्या ३.५ टक्के अूसन अप्रत्यक्षरीत्या १६८५ दशलक्ष वेगळे कमावले जातातच.

उपरोक्त सगळी आकडेवारी ही युनेस्कोच्या पॅरिस येथील २०१० या वर्षीच्या केवळ एका संबंधित परिषदेच्या अहवालातून प्राप्त झालेली या क्षेत्राची जगभरातली एक झलक तेवढी आहे.

संस्कृती, संस्कृतिसंबद्ध विकास व सांस्कृतिक क्षेत्राचे उत्थान हा केवळ हौशी वा छंदिष्ट, नादिष्ट वा उगाच वेळ घालवणाऱ्या लोकांचे अनुत्पादक व विकासाशी, उत्पन्नवाढीशी, संपत्ती-निर्माणाशी संबंधित नसणारे व केवळ त्यावर निरर्थक खर्च तेवढा करायला लावणारे क्षेत्र असल्याचा भ्रम व तसेच बाळगले गेलेले अज्ञान उपरोक्त पार्श्वभूमीवर अगोदर दूर सारले जाणे अतिशय आवश्यक आहे.

संस्कृती, संस्कृतिसंबद्ध विकास व सांस्कृतिक उत्थानाचा संबंध जोवर अशा रीतीने समजून घेतला जाणार नाही तोवर शासनाचे, राज्यकर्त्यांचे, नियोजनयंत्रणांचे व प्रत्यक्ष या क्षेत्रातील कार्यकर्त्यांचेही उद्‌बोधनच होणार नाही. ते झाले नाही तर आमच्यासारखी मंडळी संस्कृती व संस्कृतिसंबद्ध विकासासाठी ४०-४० वर्षे कंठशोष का करतात, सांस्कृतिक आघाडी का उभारतात, शासनाकडे मागण्या का लावून धरतात त्याचे गांभीर्यही लक्षात येणार नाही.

ते लक्षात यावे म्हणूनच, उपरोक्त पार्श्वभूमीवर 'महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडी'ने लावून धरलेल्या मागण्या ही विदर्भाच्या संस्कृतिआधारित विकासाच्या उपसमितीच्या बैठकीसमोर प्रस्तुत लेखकाने सादर केलेली पहिलीच, अधिकृतता लाभलेली, संक्षिप्त रूपरेषा आहे हे समजून घेतले पाहिजे.

या रूपरेषेनुसार नाग-विदर्भातील संस्कृतिआधारित विकासासाठी सर्वप्रथम संस्कृतिसंबद्ध क्षेत्राची व्याख्या निश्चित करायला हवी. विदर्भाची सांस्कृतिक वैशिष्ट्ये व वेगळेपण सुनिश्चित करायला हवे. विदर्भात संस्कृतिसंबद्ध क्षेत्रांपैकी कोणकोणती क्षेत्रे अशी ठरवता येतील की ज्यात रोजगारनिर्मिती, उपजीविकेच्या संधी व प्रादेशिक अर्थकारणाचा विकास साधता येईल याचा विचार करून ती सुनिश्चित करावी लागतील. ज्यायोगे संस्कृतिसंबद्ध कला-कौशल्ये, कारागिरी, क्षमता यात वाढ करता येईल. अशा सांस्कृतिक उद्योजकतेचा, उद्योजकांचा, संस्थांचा, व्यक्तींचा शोध घेऊन व नसतील तेथे उभारून व प्रशिक्षित करून हे कार्य करणे आवश्यक आहे. प्रादेशिक आर्थिक विकासाशी संस्कृतिक्षेत्राचे एकात्म असे नाते जोडून 'संस्कृती' ही विकासाची साधनसामुग्री म्हणून मान्य


ग्रं था ली




मूल्य २५० रुपये
सवलतीत १५० रुपये

## एका शिक्षिकेची शिदोरी
**सुधा देसाई**

शालेय जीवन हे केवळ ज्ञान मिळवणारं नसतं. घर, समाज यांच्या जोडीला शाळा हे संस्कारांचं पीठ असतं. ज्ञानदानासह विद्यार्थ्यांना समजून घेऊन जेव्हा शिक्षक त्यांना जीवनशिक्षणही देतात तेव्हा ते विद्यार्थ्यांच्या जन्मभराच्या आदराची व्यक्ती होतात. असे घडवलेले विद्यार्थी जगात कुठेही वास्तव्य करत असले तरी त्यांच्या मन:पटलावर शिक्षकांचं ऋण अबाधित राहतं. विद्यार्थी-शिक्षक जिव्हाळा वृद्धिंगत होतो. हा ऋणानुबंध, हा आदर ही त्या शिक्षकाची शिदोरी होते. जीवनप्रवासाला समृद्ध करणारी. अशीच शिदोरी सुधा देसाईंनी मिळवली. त्यांच्या शिक्षकीपेशातील प्रवासाचं त्यांनी केलेलं हे चित्रण वाचणाऱ्याच्या मनात त्यांच्याबद्दल आदरभावना निर्माण करतं...

करावी लागेल, तशी जाण सर्व संबंधितांमध्ये निर्माण करावी लागेल.

त्यासाठी विविध कला, कौशल्ये, कारागिरी, संस्कृतिसंबद्ध अन्य क्षेत्रे यातील संबंधित संस्था, व्यक्ती तसेच शासन, प्रशासन, यांची एक प्रशिक्षित फळीच उभारावी लागेल. त्यासाठी सर्व संबंधितांना यथायोग्य शिबीर, कार्यशाळा, प्रशिक्षणे याद्वारा शिक्षित-प्रशिक्षित करावे लागेल.

वैदर्भीय संस्कृती व संस्कृतिसंबद्ध क्षेत्रांच्या संदर्भात विविधांगी, विविध आयामी सर्वेक्षणे, संशोधने करून घ्यावी लागतील. विदर्भातील पारंपरिक कला, आधुनिक कला, तंत्रज्ञानाधारित कला या साऱ्याशी संबंधित विदर्भातील अद्यापही केवळ हौशी व छंदाच्याच पातळीवर असणारे विश्व, सादरीकरणात्मक कलेत असणाऱ्या व्यक्ती, कलावंत, संस्था, संस्कृतिसंबद्ध वस्तू निर्मिणारे कलावंत, कारागीर अशा साऱ्यांचा शोध घेऊन, त्यांच्या व्यावसायिक विकासाचे निश्चित प्रकल्प उभे करावे लागतील.

हे सर्व करण्यासाठी मुळात आजवर या क्षेत्राकडे अक्षम्य दुर्लक्ष करण्याची जी वृत्ती कायम आहे ती संपवून व केवळ या क्षेत्रातले नेते म्हणून व त्यांचे उपनेते म्हणून मिरवण्याची हौस बाळगणाऱ्यांच्या हातून सांस्कृतिक, संस्थात्मक व्यवहार काढून घेऊन, तो गांभीर्याने वरील प्रकारचा विचार करण्याची क्षमता, सामर्थ्य व दृष्टी असलेल्यांकडे प्रथम कसा सोपवला जाईल हे बघितले जाणे आवश्यक आहे. असे झाल्याशिवाय या क्षेत्राच्या विकासासाठी लागणारी इच्छाशक्तीच उपलब्ध होणार नाही.

अशी इच्छाशक्ती निर्माण झाल्यास सर्वप्रथम संस्कृतिसंबद्ध क्षेत्राचा दर्जा व गुणवत्ता वाढीस लागेल. ती तशी वाढीस लागण्यासाठी व या क्षेत्राला दर्जेदार, कलात्मक व व्यावसायिक शिस्त लागावी यासाठी सर्वप्रथम काही किमान आवश्यक अशा मूलभूत स्वरूपाच्या संस्थात्मक यंत्रणा उभाराव्या लागतील. त्यात-

- राष्ट्रीय नाट्य विद्यालयाची शाखा नाग-विदर्भात त्वरित स्थापली जाणे;

- फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूटची शाखा नाग-विदर्भात स्थापली जाणे;

- 'नाट्य-नगरी'ची स्थापना करणे;

- नॅशनल बुक ट्रस्टचे उपविभागीय केंद्र नागपुरात स्थापले जाणे;

- संस्कृतिसंबद्ध सर्वच क्षेत्रांच्या विकासासाठी, विदर्भातील सर्व महानगर, नगरपालिका, जिल्हा नियोजनमंडळे, जिल्हा परिषदा अशा यंत्रणांच्या वार्षिक अंदाजपत्रकांमध्ये स्वतंत्र तरतूद करण्याचा दबाव निर्माण करणे;

- सांस्कृतिक बाबींशी संबंधित सर्वप्रकारच्या शासन-निधीची विदर्भासाठी विभागीय स्तरावर तरतूद करून मागणे;

- विदर्भाच्या संस्कृतिआधारित विकासासाठी 'विदर्भ सांस्कृतिक विकास महामंडळ' स्थापन करणे;

- जिल्हा व तालुका पातळीवर २०० ते ३०० आसनक्षमतेची नाट्यगृहे/सभागृहे तातडीने उभारली जाणे व ती सर्व प्रकारच्या सादरीकरणात्मक प्रयोगांसाठी अत्यल्प दरात उपलब्ध करून दिली जाणे;

अशा अत्यंत आवश्यक किमान व प्राथमिक सोयी उपलब्ध करून घ्याव्या लागतील. 'विदर्भ सांस्कृतिक आघाडी'ची स्थापनाच हे सर्व व्हावे, केले जावे यासाठी दबाव वाढवण्याच्या हेतूने आम्ही केली आहे.

प्रत्येक जिल्ह्याच्या पातळीवरील संस्कृतिसंबद्ध क्षेत्रातील सर्व सांस्कृतिक संस्थाची 'जिल्हा सांस्कृतिक आघाडी' स्थापन करून त्या त्या जिल्ह्याच्या पातळीवर या आघाडीने या कार्याचा पाठपुरावा करणे व विदर्भाच्या पातळीवर सर्व जिल्हा आघाड्यांच्या प्रतिनिधींच्या 'विदर्भ सांस्कृतिक आघाडी'ने हेच कार्य विदर्भ पातळीवर करणे अपेक्षित आहे.

तूर्तास नागपूर, वर्धा आणि बुलडाणा या तीन जिल्ह्यांत अशा जिल्हा सांस्कृतिक आघाड्या स्थापल्या गेल्या आहेत. इतर जिल्ह्यांसाठी हे कार्य करू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांचा शोध सुरू आहे.

ही संकल्पना विदर्भापुरती मर्यादित उरलेली नसून महाराष्ट्राच्या प्रत्येक विभागातच ती राबवली जात आहे. पश्चिम महाराष्ट्रातही 'पश्चिम महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडी' स्थापली गेली आहे. 'उत्तर महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडी', 'मराठवाडा सांस्कृतिक आघाडी' देखील नियोजित आहे. सुमारे दोनशे सांस्कृतिक संस्थांची ही 'महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडी' आज झाली आहे.

या सोबतच, प्रत्येक विभागीय पातळीवर 'विभागीय सांस्कृतिक परिषदा' स्वतंत्र नोंदणीकृत संस्था म्हणून स्थापल्या जात आहेत. केवळ विदर्भाच्याच नव्हे तर एकूण महाराष्ट्राच्या संस्कृतिसंबद्ध क्षेत्राची संस्थात्मक पुनर्रचना व सांस्कृतिक विकासाच्या अंगाने पुनर्निर्माणाची ही चळवळ असून तिचा प्रभाव महाराष्ट्राबाहेरही कर्नाटक, गोव्यात पडतो आहे. उत्तरेतल्या सहा छोट्या राज्यांतही हा विचार सांस्कृतिक क्षेत्रात पसरला असून, नजीकच्या काळात त्या राज्यांतही अशा सांस्कृतिक विकासाच्या आघाड्या व परिषदा आम्ही उभारत आहोत. एकूणच, संस्कृतिसंबद्ध व संस्कृतिआधारित विकास आणि परिवर्तनाचा हा विचार देशभरच एका वेगळ्या रचनात्मक चळवळीच्या स्वरूपात स्वीकारला जातो आहे.

हा नवा रचनात्मक सांस्कृतिक उठाव आहे. तो प्रत्यक्ष कृतिपर कार्यक्रमही आहे. जनांचा हा प्रवाह आहे. या प्रवाहात जो जो या जाणिवेने येईल तो आपला या नात्याने त्याचे स्वागत आहे.

**- डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**
१०५, संकल्प सहनिवास, ४०, खरे टाऊन,
धरमपेठ, नागपूर ४४००१०
भ्रमणध्वनी : ९९६०४९३६२२
shripadbhalchandra@gmail.com

# नवीन मौज प्रकाशने

रंगवाटेचा वारकरी **अरुण काकडे** यांचे आत्मचरित्र म्हणजे प्रायोगिक रंगभूमीचा जणू आरसाच. अकृत्रिम भाषेने नटलेल्या या आत्मचरित्रात अनेक दुर्मिळ छायाचित्रांचा समावेश आहे.

**अमका : अरुण काकडे**

२६८ पृष्ठे + ८ पृष्ठे मोठा आकार पुठ्ठा बांधणी किंमत ४०० रुपये

निजामशाहीच्या अस्ताचे साक्षीदार, तसेच या मुस्लीम राजवटीलाही मानवी चेहरा देणाऱ्या काही व्यक्तींची तसेच अन्य कर्त्याधर्त्यांची सहृदयतेने रेखाटलेली व्यक्तिचित्रे

**संस्थानी माणसं : नरेंद्र चपळगावकर**

१६० पृष्ठे किंमत २०० रुपये

कालातीत आशयाच्या समृद्ध नाटकाचं सहजसोप्या भाषेत केलेले भाषांतर. नाट्यप्रेमी, नाट्यधर्मी आणि कलाकारांसोबतच सामान्य नाट्यप्रेमींनाही नाटकाकडं पाहण्याचा एक समग्र अर्थपूर्ण दृष्टिकोन देणारं पुस्तक

**मृच्छकटिकम् अर्थात मातीच्या गाड्याचं प्रकरण : राजीव नाईक**

संस्कृत नाट्यपाठ : शुद्रक भाषांतर व भाष्य : राजीव नाईक १२२ पृष्ठे किंमत १२५ रुपये

लंपनच्या भावविश्वात वाचकांना गुंतवून टाकणाऱ्या लेखकाच्या ललित लेखांचे भावस्पर्शी लेणे

**चांदण्याचा रस्ता : प्रकाश नारायण संत**

९६ पृष्ठे + ८ रंगीत पृष्ठे किंमत १२५ रुपये

अपू नावाचा लहान मुलगा, थोरली बहीण दुर्गा, सर्वजया, छोटी मोठी कामे करून जगणारा, जगविणारा पिता हरिहर यांची हृदयस्पर्शी कथा. रे यांच्या जगप्रसिद्ध पथेर पांचाली या चित्रपटाची मूळ कादंबरी

**पथेर पांचाली : विभूतिभूषण वंद्योपाध्याय अनुवाद: नीलिमा भावे**

२५६ पृष्ठे किंमत २५० रुपये

तांबोळींची कविता मानवाच्या अंगभूत दुर्बलतेचा, असहायतेचा, अनिकेतत्वाचा आणि परात्मभावाचा वेध घेते. त्यांची कविता वाचताना आपण आपल्याच जगण्याची कहाणी वाचत असल्याचा प्रत्यय येतो.–सुधीर रसाळ

**जन्मझुला : लक्ष्मीकांत तांबोळी**

९८ पृष्ठे किंमत १२५ रुपये

**मौज प्रकाशन गृह**, गोरेगांवकर लेन, मुंबई ४००००४ दूरध्वनी: २३८७ १०५० इमेल: moujprakashan@gmail.com

# सोलापूर विद्यापीठाचा पुरातत्त्वशास्त्र विभाग

**भारत गजेंद्रगडकर**

**पुरातत्त्वशास्त्र** हा एक नेहमीच्या पठडीपेक्षा खूप वेगळा विषय आहे. महाराष्ट्रात हा विषय केवळ तीन विद्यापीठांत पदव्युत्तर अभ्यासक्रमात शिकवला जातो. यापैकी पहिले आहे ते शंभर वर्षांपेक्षा जास्त परंपरा असलेले डेक्कन कॉलेज पुणे, दुसरे आहे नागपूरचे नागपूर विद्यापीठ व तिसरे आहे सोलापूरचे सोलापूर विद्यापीठ.

या सोलापूर विद्यापीठाचा प्रारंभ आधी कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र म्हणून १९८४ मध्ये झाला. त्यानंतर जुलै १९९७ मध्ये स्वतंत्र विद्यापीठ म्हणून या विद्यापीठाला मान्यता मिळाली. २००८ सालापासून प्रा. गजानन भिडे यांनी पुरातत्त्वशास्त्र (archeology) हा स्वतंत्र विषय प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्त्वशास्त्र या स्वरूपात सुरू केला. या तीन विद्यापीठांत आणि अन्य विद्यापीठांत फरक म्हणजे, अन्य सर्व विद्यापीठांत भारतीय प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक इतिहास एवढेच अध्ययनक्षेत्र असते.

सोलापूर विद्यापीठात हा विषय सुरू केला, तेव्हा शिकवणारे प्रा. रवी जाधव हे एकमेव होते. बाकीचे सर्व व्याख्याते पाहुणे म्हणून बाहेरून बोलवावे लागत असत. त्यानंतर २००८ सालापासून डॉ. माया पाटील आणि प्रा. कांतीकुमार पाटील हे शिकवायला आले. आता त्यांना प्रा. प्रभाकर कोळेकर व प्रा. लक्ष्मी पवारही



उत्खननाच्या वेळी डॉ. माया पाटील



सामील आहेत.


पुरातत्त्वशास्त्रात प्राचीन भारताचा इतिहास, पुरातत्त्वशास्त्राची ओळख, उत्खननशास्त्र आणि त्याचे प्रात्यक्षिक, प्राचीन करण आणि वास्तुशास्त्र - प्राचीन भारतीय मूर्तिशास्त्र, नाणकशास्त्र, पुराभिलेखविद्या, संग्रहालयशास्त्र, पर्यटनशास्त्र, संशोधनपद्धती, पुरातत्त्वशास्त्रात संगणकाचा वापर, प्रागैतिहास आणि इतिहासपूर्व कालखंड, लेखन आणि जनसंपर्ककला, डेझर्टेशन कसे करावे इत्यादी शिकवले जाते. कोणत्याही शाखेच्या पदवीधराला चाचणी प्रवेशपरीक्षेच्या गुणावर इथे प्रवेश घेता येतो. दोन वर्षांचा हा संपूर्ण अभ्यासक्रम ४ सेमिस्टरमध्ये पूर्ण केला जातो. या विद्यापीठात या विषयाशिवाय पदव्युत्तर पर्यटन आणि संग्रहालयशास्त्रातील पदविका अभ्यासक्रमही शिकवण्याची सोय आहे.

पुरातत्त्वशास्त्राच्या अभ्यासात प्राचीन कालखंड, मानवाचे अस्तित्व याचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. प्राचीन मानवी जीवन, मानवाने निर्माण केलेल्या कलात्मक आणि इतर वस्तू आणि वास्तू, मानवाची संस्कृती या सर्वांचा अभ्यास केला जातो. उत्खननाचे काम करताना जागेचे सर्वेक्षण कसे करायचे, प्रत्यक्ष उत्खनन कसे करतात याचे प्रात्यक्षिक दाखवले जाते. त्याचसोबत, सापडलेल्या अवशेषांचा व वस्तूंचा कालखंड काढणे, त्याच्या वैज्ञानिक पद्धती, वस्तू स्वच्छ करून जतन कशा करायच्या हेही शिकवले जाते.

सोलापूर विद्यापीठात डॉ. माया पाटील २००८ मध्ये रुजू झाल्या. माया पाटील यांचे माहेर उस्मानाबदचे. येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात त्यांनी इंग्रजी साहित्य, इतिहास आणि समाजशास्त्र या विषयात १९८६ मध्ये पदवी प्राप्त केली. परीक्षेचा निकाल आणि लग्न एकाच दिवशी झाले. त्यांचे पती डॉ. जगदीश पाटील जिल्हाधिकारी असल्याने; दरम्यान त्यांच्या बदल्या वर्धा-चंद्रपूर इथे झाल्या. तिथे डॉ. पाटील यांनी छोटे मोठे कोर्स पूर्ण केले पण त्यात त्यांचे मन रमत नव्हते. शाळेत असताना इथल्या पुरातन लेण्या, नागनाथमंदिर परिसर यात त्यांना जास्त रस होता. नागपूरमधील- वास्तव्यात त्यांनी - १९९१ ते १९९३ या काळात नागपूर विद्यापीठातून एम.ए. केले. त्याच काळात आपल्या आवडीच्या खगोलशास्त्रातील दोन छोटे अभ्यासक्रमही पूर्ण केले. लातूर वास्तव्यात त्यांनी पीएच.डी. पदवी घेतली. त्यात त्यांना डॉ. देगलूरकर आणि डॉ. गौरी लाड यांचे मार्गदर्शन लाभले. या काळातच डॉ. जगदीश पाटील यांची बदली मुंबईला झाल्याने, वास्तव्य मुंबईत तर डेक्कन कॉलेजमध्ये पीएच.डी.चे कार्य व त्यासाठी काम लातूर व उस्मानाबाद भूकंपग्रस्त भागांत अशी त्यांची फरपट झाली.

डॉ. माया पाटील यांनी ज्या मंदिरस्थापत्य आणि मूर्तिशिल्पे यांच्या अभ्यासावर पीएच.डी.साठी प्रबंध लिहिला होता त्यावर आधारित त्यांचे 'मंदिर-शिल्पे' हे पुस्तक 'ग्रंथाली'ने नुकतेच प्रकाशित केले आहे. त्यामध्ये मंदिरांचा आणि मूर्तींच्या विश्लेषणात्मक

विचार करताना; संस्कृती ज्या ज्या अंगाने फुलते त्या त्या अंगाना आत्मसात करण्याचे सामंजस्य येथील लोकांनी कसे अंगिकारले होते याचाही त्यांनी अभ्यास केला आहे. अगदी प्रारंभीच्या तेर येथील मंदिरापासून कल्याणी चालुक्य आणि यादवकालीन वेगवेगळया स्थापत्यशैलींतील मंदिराचा विचार करून द्राविडशैली, नागरशैली येथे कशी एकत्र नांदत होती याचा विचार त्यांनी मांडला आहे.




''डॉ. माया पाटील यांनी केवळ मंदिरस्थापत्याचाच विचार आणि विवेचन केलेले नसून मंदिरातील मूर्तींचाही विचार केला आहे. पाश्चात्य लेखक असतील किंवा या क्षेत्रातील अग्रणी संशोधक डॉ. अ.वि. नाईक असतील, त्यांनी मंदिराशी निगडित अशा मूर्तींचा फारसा विचार केलेला नव्हता. मंदिराचा अभ्यास करताना त्याच्याशी संबंधित असलेल्या मूर्तींचाही विचार करणे आवश्यक असते. कारण मूर्ती या धर्म, तत्त्वज्ञान, लोकरीती आणि लोकजीवन यांच्यासंबंधी माहिती देणारे प्रमुख व महत्त्वाचे साधन आहे,'' असे प्रतिपादन पुरातत्त्वखात्याचे ज्येष्ठ अभ्यासक व डेक्कन कॉलेजचे (अभिमत विद्यापीठ, पुणे) कुलपती डॉ. गो.बं. देगलूरकर यांनी या पुस्तकाच्या प्रस्तावनेत केले आहे. डॉ. माया पाटील यांनी लातूर आणि उस्मानाबाद जिल्ह्यांतील विशेषत: भूकंपग्रस्त भागातील मंदिरांचाही अभ्यास करताना प्रामुख्याने हिंदुकला आणि वास्तुकलेचा अभ्यास केला आहे.

डेक्कन कॉलेजच्या सहकार्याने डॉ. माया पाटील व त्यांच्या सहकारी, विद्यार्थांनी वाकाव इथले उत्खनन नुकतेच केले. हे गाव सीना नदीच्या अगदी काठाला आहे. गुंडेश्वर शिवमंदिराच्या मागे हे उत्खननस्थळ होते. हे त्यांचे पहिलेच उत्खनन होते. उत्खनन हे पुरातत्त्वशास्त्राचे प्रमुख अंग आहे. उत्खननाची पद्धत अत्यंत शास्त्रीय असते. प्रत्यक्ष सर्वेक्षणातून प्रथम जागा निवडली जाते. ज्या ठिकाणी प्राचीन वसाहतीचे पुरावे मोठ्या प्रमाणावर आढळतात तसेच एकाच ठिकाणी अनेकदा वसाहती होऊन गेल्या अशी जागा सामान्यत: निवडली जाते. त्या जागेच्या विशेष माहितीसाठी एक चाचणी खड्डा (Trial Tranch) घेतला जातो. खड्ड्याद्वारे साधारणपणे कल्पना येते. उत्खननाचे अनेक प्रकार आहेत. त्यापैकी आयाताकार (Horizontal), उत्सेध (Vertical), दफनभूमीचे उत्खनन (Excavation of Cenetery), यामध्ये Quadrant excavation या पद्धतीचाही समावेश होतो.

एखाद्या मोठ्या नगराचे उत्खनन करायचे झाल्यास आयाताकार उत्खननच करावे लागते. तरच त्या नगरीची संपूर्ण माहिती मिळू शकते. तेथे तटबंदी होती का इथपासून रस्ते, घरे, पाण्याची व्यवस्था, सांडपाण्याचा निचरा ही सर्व माहिती मिळते. सिंधू संस्कृतीच्या काही नगरांत रस्त्याच्या कडेला स्तंभ होते आणि संध्याकाळी तेथे तेलाचे दिवे लावले जात याचे पुरावेही हाती आले आहेत.

ज्या सोलापूर शहरात हे सोलापूर विद्यापीठ आहे त्याचे नाव सोलापूर पडले, कारण प्राचीन काळी १६ पुरांचे म्हणजे १६ गावांचे मिळून हे शहर बनले अशी अख्यायिका आहे. सोलापूर किल्ल्यामधील कपिलसिद्ध मल्लिकार्जुन मंदिर, कुडलसंगमचे हरिहरेश्वर व संगमेश्वर, माळशिरसचे सोमेश्वर, नागवसूरचे मल्लिकार्जुन, नातेपुतेचे महादेवमंदिर, वेळापूरचे हरकेश्वर, शिवाय बीबीदारफळ, कंदलगाव, निंबर्गी, चपळगाव, नारायणचिंचोली, उपळे दुमाला, करकंब, मोहोळ, मंगळवेढा, धामणगाव, मार्डी, जेऊर, कासेगाव, भंडारकवठे, वरकुटे, कोरवली या सर्व ठिकाणची मंदिरे वास्तुकला, मूर्तिकला आणि पुरातत्त्वीय अवशेष यासाठी आवर्जून पाहावीत अशी असल्याचे डॉ. माया पाटील सांगतात.

अनेक ठिकाणे फक्त स्थानिक लोकांनाच माहीत असतात, पण त्यांना प्रकाशझोतात आणण्याचे काम आता हे विद्यापीठ या माध्यमाने करत आहे. विद्यापीठात आता एक सुंदर संग्रहालय उभारणीचे काम सुरू असून गेल्या तीन वर्षांत त्यांनी केलेल्या उत्खननात सापडलेल्या वस्तू, पाहिलेल्या मंदिराचे शिल्प व वास्तुशास्त्राचे फोटो यांची मांडणी सुरू आहे. एका अत्यंत क्लिष्ट विषयाला सोपे करून समाजासमोर आणण्याचा हा विद्यापीठाचा प्रयत्न स्तुत्यच म्हणायला हवा.


**– भारत गजेंद्रगडकर**

गोकुळ अपार्टमेंट, फ्लॅट नं. जी. ८

समता कॉलनी, उस्मानाबाद ४१३५०१

भ्रमणध्वनी : ९४०४६७६४६१/९०४९७२६६४४

bharat.1946@yahoo.in

# पुलित्झर पुरस्कार आणि वाद

**अपर्णा पाटील**


पत्रकार वॉल्टर ड्युरान्टी

**कलाकारासाठी** ऑस्करचं जितकं महत्त्व, तितकंच लेखकांसाठी पुलित्झर पुरस्काराचं. मग तो लेखक जगाच्या पाठीवर कुठला का असेना. त्या लेखकाचे हक्काचे काही वाचक असतात, त्याहीपेक्षा जास्त वाचक मिळवून देण्याचं काम हे पुरस्कार करत असतात. इतकंच नाही, तर एखाद्याला तोवर कधीही न मिळालेली प्रसिद्धी मिळवून देण्याचं काम हे पुरस्कार करत असतात. नुसत्या लेखकांनाच नाही तर अन्य क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी करणाऱ्यांनाही या पुरस्कारानं गौरवण्यात येतं. त्यांच्यासाठीही हा पुरस्कार म्हणजे त्यांच्या कार्याचा सन्मान, कौतुकाची थाप, विश्वासार्हतेचा ठसा आणि कामाची पोचपावती असते. विशेष म्हणजे पुलित्झर पुरस्काराचं महत्त्व कधीही कमी झालेलं नाही. या पुरस्कारांवर वादंग उठावेत असे प्रसंग कमीच आलेत, त्यामुळेच त्या पुरस्काराचं महत्त्व अबाधित राहिलंय. पण यंदाच्या पुरस्कारांमुळे अमेरिकेत वादाला तोंड फुटलंय. अर्थात अशाप्रकारे पुरस्काराविषयी नाराजी व्यक्त होणं किंवा वाद होणं हे नवं नाही.

यंदाच्या पुलित्झर पुरस्कारांमध्ये 'जनसेवा पत्रकारिता' पुरस्कार 'द वॉशिंग्टन पोस्ट' आणि 'द गार्डियन' या वर्तमानपत्रांना जाहीर झाला. अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षा एजन्सीच्या कारभाराचा जाहीर पंचनामा केल्याबद्दल हा पुरस्कार या दैनिकांना देण्यात आला आहे. राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्या छत्राखाली असलेल्या सुरक्षायंत्रणांनी चालवलेल्या कार्यक्रमांना थेट आव्हान देणारं वार्तांकन या दोन्ही वर्तमानपत्रांनी एकाच वेळी प्रसिद्ध केलं होतं. या दोन्ही वर्तमानपत्रांना हा पुरस्कार देणारी कामगिरी करणारा सूत्रधार मात्र अमेरिकेच्या लेखी राष्ट्रद्रोही ठरला आहे.

एडवर्ड स्नोडेन यानं दिलेल्या माहितीच्या आधारे या दोन्ही वर्तमानपत्रांनी अमेरिकन सरकारच्या टेहेळणी कार्यक्रमाचा पर्दाफाश केला होता. पण पुरस्कार जाहीर होताच मोठ्या वादाला तोंड फुटलंय. त्याची सुरुवात 'द गार्डियन' या वर्तमानपत्रानं या पुरस्कारावरील प्रतिक्रिया देतानाच करून दिली. सुरक्षा आणि गोपनीयता या मुद्द्यांवरून सरकार आणि जनतेतील वादाला तोंड फोडण्यासच मदत केलीय, असं म्हणत पुन्हा एकदा देशाची सुरक्षा महत्त्वाची की पारदर्शक कारभार या प्रश्नाला चर्चेसाठी संधी उपलब्ध करून दिली. पण पुलित्झरच्या इतिहासातला हा पहिलाच वाद नाही. याआधीही अशा घटना घडल्या आहेत.

### स्टॅलिनकाळापासूनचे वाद

पत्रकार वॉल्टर ड्युरान्टी यांनी १९३१मध्ये 'द न्यू यॉर्क टाइम्स'मध्ये लिहिलेल्या तेरा लेखांक मालिकेसाठी त्यांना पुलित्झर जाहीर झाला होता. ड्युरान्टी त्यावेळी त्या दैनिकाचे मॉस्को ब्युरो चीफ म्हणून काम करत होते. जोसेफ स्टॅलिन यांच्या सत्तेच्या अमलाखालील रशिया या विषयावर त्यांनी तेरा भागांत लेख लिहिले होते. ते लेख लिहिले नाहीत, तर स्टॅलिननं जे सांगितलं, त्या

बरहुकूम लिहिले गेले. 'तुम्ही अंडं फोडलं नाही तर ऑम्लेट बनवू शकत नाही', अशा शब्दांत त्यानं स्टॅलिनच्या दुष्कृत्यांची वकिली केली. शिवाय स्टॅलिनच्या धोरणांमुळे युक्रेनमध्ये जो मनुष्यनिर्मित दुष्काळ पडला आणि ज्यात लाखो माणसं ठार झाली, त्यावर पांघरूण घालण्याचं काम ड्युरान्टी यांनी या लेखांमधून केलं गेलं. खरं तर पत्रकारितेतला हा सगळ्यात मोठा खोटारडेपणा होता. त्यामुळे त्याविषयी अत्यंत संतप्त प्रतिक्रिया उमटल्या.



एडिथ व्हॉर्टन

पुलित्झरच्या निवड मंडळानं या पुरस्काराबाबत फेरविचार करण्याचा विचार एकदा नाही तर दोनदा केला, पण पुरस्कार मागे घेतला नाही. पुरस्कार मिळाल्यानंतर लगेचच त्याच्याविषयी वाद झालाच, पण २००३मध्ये युक्रेनियन कॅनेडियन सिव्हिल लिबर्टी असोसिएशनच्या मागणीनुसार पुन्हा एकदा हा पुरस्कार मागे घ्यावा का, असा पेच पुलित्झर मंडळासमोर होता. त्यावेळी पुरस्काराची शान कायम राहण्यासाठी हा पुरस्कार मागे घ्यावा, असा मुद्दा मांडला गेला होता. पण तोही अमान्य झाला.


**खोटेपणाचा कळस...**

जॅनेट कुकेनं जेव्हा 'वॉशिंग्टन पोस्ट'मध्ये जिमीज वर्ल्ड हा लेख लिहिला तेव्हा आपल्याला त्यासाठी पुलित्झर पुरस्कार मिळणार अशी खात्री तिला होती. २८ सप्टेंबर, १९८० रोजी तिनं तो वृत्तांत लिहिला. हा वृत्तांत एका आठ वर्षांच्या मुलाविषयी होता, जो पाचव्या वर्षांपासून अंमली पदार्थांच्या आहारी गेला होता. 'त्या मुलाची नाजूक त्वचा ड्रग्जच्या सुयांच्या छिद्रांनी भरून गेली होती...' अशा वाक्यांनी सुरुवात करत जिमीच्या आयुष्याचं हृदयद्रावक लिखाण जॅनेटनं केलं होतं. ते वाचून वाचकांचं अंतःकरण हेलावलं. त्यामुळेच जॅनेटचं पुलित्झर नक्की झालं.

या वृत्तांतातील संवेदनशील विषय आणि मुलाला शोधून काढण्यासाठीचा जनतेचा दबाव लक्षात घेऊन वॉशिंग्टनचे महापौर मरियन बेरी यांनी जिमीचा शोध घेण्याचा आदेश दिला. जिमीला शोधण्याची मोहीम पोलिसांवर सोपवली पण तो काही सापडलाच नाही. मग एक दिवस जिमी सापडल्याचं जाहीर करण्यात आलं. त्याच्यावर उपचार सुरू असल्याचं बेरी यांनी सांगितलं... त्यानंतर काही दिवसांनी जिमी मरण पावल्याचं! जिमीची कहाणी अशी संपणं हे हळहळ वाटायला लावणारं होतं. प्रत्यक्षात हे सगळं एक थोतांड होतं. जिमी नावाचा कोणी मुलगा नव्हताच. ती जॅनेटच्या मेंदूतून बाहेर आलेली कल्पना होती. बेरीही लोकांच्या वाढत्या दबावाखाली खोटं बोलत होता. अर्थात बेरी हा अत्यंत वादग्रस्त महापौर होता.

या सगळ्याच्या दरम्यान जॅनेटला 'पुलित्झर' जाहीर झाला होता. 'वॉशिंग्टन पोस्ट'चे संपादक बॉब वूडवर्ड यांनी जॅनेटचा वृत्तांत पुलित्झर पुरस्काराच्या नामांकनासाठी पाठवला होता. १३ एप्रिल १९८१ रोजी जॅनेटला पुलित्झर जाहीर झाला. जॅनेट त्यापूर्वी काम करत असलेल्या 'टॉलेडो ब्लेड'च्या संपादकाने या पुरस्कारानंतर तिच्याविषयी आलेली नोंद वाचली. ज्यात त्यांना काहीतरी संशयास्पद असल्याचा वास आला. त्यानंतर तिच्या शैक्षणिक पात्रतेची चौकशी केली. त्यावेळी जॅनेटने आपली खोटी माहिती दिल्याचं आढळून आलं. त्यानंतर 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या संपादकांवर जॅनेटचं सत्य काय ते सांगण्याचा दबाव वाढला, अखेर जॅनेटने दोषी असल्याचं आपणहून कबूल केलं. पुरस्कार वितरण झाल्यानंतर 'वॉशिंग्टन पोस्ट'चे प्रकाशक डोनाल्ड ग्रॅहम यांनी पत्रकार परिषद घेऊन जॅनेटचा वृतांत असत्य असल्याचं सांगितलं. त्यानंतर दुसऱ्याच दिवशीच्या वर्तमानपत्रातून जाहीर माफीही मागितली. त्यानंतर जॅनेटनं आपल्या नोकरीचा राजीनामा दिला आणि पुरस्कारही परत केला.

हॉलिवूडमध्ये शोभून दिसेल, अशा या घटनेला पडद्यावर आणण्याची तयारी करण्यात आली. जॅनेट आणि तिचा माजी प्रियकर माइक सेजर यांनी मोठी रक्कम घेत या कथेचे हक्क ट्राय-



हा पुरस्कार सिनक्लेअर लुईस यांच्याकडे चालत आला. त्यांच्या 'ॲरोस्मिथ' कादंबरीसाठी त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. पण त्यांनी हा पुरस्कार नाकारला, 'ऑल प्राइझेज, लाइक ऑल टाइटल्स, आर डेंजरस', अशा शब्दांत त्यांनी आपला नकार कळवला होता. निवड समितीच्या कादंबरी निवडीच्या निकषांविषयी कडक शब्दांत आक्षेप नोंदवला होता.

'नो वन' हे १९७४मध्ये पुलित्झर मिळालेल्या कादंबरीचं नाव. या कादंबरीची निवड होणं पुलित्झरच्या इतिहासात सगळ्यात जास्त वादग्रस्त ठरलं. थॉमस पिन्शन यांची दुसऱ्या जागतिक महायुद्धावरील 'ग्रॅव्हिटीज रेनबो' ही कादंबरी पुरस्काराच्या शर्यतीत होती. पण त्यातील लैंगिकता, अमली पदार्थांचा उल्लेख पुरस्कार निवड मंडळींच्या पचनी पडलेला नव्हता. त्यामुळे त्यांनी 'नो वन' या कादंबरीची पुरस्कारासाठी निवड केली. पुलित्झर पुरस्कार निवड समितीला 'ग्रॅव्हिटीज रेनबो' हे पुस्तक लायक वाटलं नसलं, तरी पुस्तकाची निवड न झाल्यामुळे वाट्याला आलेली बदनामी मात्र टाळता आली नाही.

स्टार पिक्चरला विकले. पण अद्याप ही कथा पडद्यावर आलेली नाही. अर्थात ती पडद्यावर येणंही रंजक ठरू शकेल. जॅनेटचं प्रकरण पुलित्झर मागे घेऊन संपवण्यात आलं. पण विल्यम लॉरेन्सबाबत अशी भूमिका पुलित्झरच्या निवडसमितीला घेता आली नाही.

विल्यम लॉरेन्स यांना १९४६मध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान हिरोशिमा आणि नागासाकीवर टाकलेल्या हायड्रोजन बॉम्बच्या संदर्भात करण्यात आलेल्या वृत्तांकनासाठी पुलित्झर पुरस्कार देण्यात आला. मात्र २००५मध्ये पत्रकार आणि डेमॉक्रॉसी नाऊ या कार्यक्रमाचे संचालक-सूत्रधार ॲमी गुडमन यांनी विल्यम यांनी केलेल्या कामाबाबत उल्लेख करताना 'ॲटोमिक बिल' नावानं या प्रकरणाचा गौप्यस्फोट केला. त्यांच्या मते, त्यावेळी विल्यम हे गृहमंत्रालयाच्या पे-रोलवर लिखाण करत होते. त्यालाच ॲटोमिक बिल असं संबोधण्यात आलं होतं. त्यामुळे लॉरेन्स यांच्या पुलित्झरवरून निर्माण झालेली नाराजी कधी कमीच झाली नाही.

### पुरस्कारप्राप्त पहिली महिला वादात

पुलित्झर पुरस्कार मिळवणारी एडिथ व्हॉर्टन ही पहिली महिला ठरली. १९२१मध्ये 'द एज ऑफ इनोसन्स' या कादंबरीसाठी हा पुरस्कार मिळाला होता. पुरस्कार निवड समितीच्या या निवडीवरून वाद निर्माण झाला. खरं तर, प्रथमच एखाद्या महिलेला पुलित्झर पुरस्कार मिळणं ही मोठी गोष्ट ठरायला हवी होती, पण प्रत्यक्षात बराच वाद झाला. स्वतः एडिथ नाराज होत्या. कारण त्यावर्षी नामांकनात असलेल्या कादंबऱ्यांमध्ये सिनक्लेअर लुईस यांच्या वादग्रस्त 'मेन स्ट्रीट' या पुस्तकाचाही समावेश होता, पण निवड समितीमधील प्रतिगामी विचारांच्या सदस्यांनी या पुस्तकाला डावलून 'द एज ऑफ इनोसन्स'ची पुरस्कारासाठी निवड केली. अर्थात १९२१मध्ये पुरस्कारानं हुलकावणी दिल्यानंतर पाच वर्षांनी

### फोटो फसवणूक

ज्याप्रमाणे पत्रकार, पुस्तकांच्या पुरस्कारांच्या संदर्भात पुलित्झर समितीनं वाद ओढवून घेतले तसे फोटोग्राफ्सच्या संदर्भातही ते झालेच. जगाच्या आणि विशेष म्हणजे अमेरिकेच्या इतिहासातला एक स्मरणीय क्षण म्हणजे आयवो जिमावर फडकलेला अमेरिकेचा ध्वज. 'हा ध्वज उभारणारे सहा अमेरिकन जवान' हा फोटो माहिती नाही, अशी व्यक्ती विरळाच. हा फोटो जोसेफ रोझेन्थल यांनी काढला होता. १९४५मध्ये त्यांच्या या फोटोसाठी त्यांना पुलित्झर ॲवॉर्ड जाहीर झालं.

जपानच्या आयवोवर अमेरिकन नौसैनिकांनी प्रवेश केल्यानंतर पाच दिवसांनी म्हणजेच २३ फेब्रुवारी, १९४५ रोजी रोझन्थल तिथे पोहोचले होते. खरं तर युद्धाच्या हालचाली, विशेषतः नौदलाची विमानं, तिथे उतरणारे सैनिक कॅमेऱ्यात टिपण्यासाठी रोजच हजेरी लावत होती. पण त्या दिवशी माऊंट सुरीबाचीवर अमेरिकन ध्वज फडकवण्यात येत असल्याची माहिती त्यांना मिळाली. ते आपला कॅमेरा घेत पोचले. त्यापूर्वीच अमेरिकेचा ध्वज उभारण्यात आल्याची बातमी त्यांच्यापर्यंत पोचली तरी ते मागे फिरले नाही, ते त्या दिशेनं निघाले. त्याचवेळी अमेरिकन जवान एका छोट्या ध्वजाजवळ एक उंच ध्वज उभारण्याच्या तयारीत होते. त्यांनी आपल्या कॅमेऱ्यात तो क्षण कैद केला. त्यानंतर तो एपी या वृत्तसंस्थेला पाठवला. हा फोटो अमेरिकेच्या इतिहासातला 'महत्त्वाचा क्षण' म्हणून कायम ओळखला जातो. पण हा फोटो काढण्यात आला नाही, तर ठरवून काढण्यात आला,



असा आरोप झाला. खुद्द रोझन्थल यांनी या आरोपाला खतपाणी घातलं. हा फोटो ठरवून काढण्यात आलाय, त्यावर तुमचं काय म्हणणं आहे, अशी प्रतिक्रिया विचारली असता त्यांनी 'खरंच आहे ते,' असं उत्तर दिलं होतं. खरं तर हा प्रश्न त्यांनी ध्वज उभारल्यानंतर सैनिकांनी केलेल्या जल्लोषाच्या फोटोविषयी असावा, असं गृहीत धरून उत्तर दिलं होतं. फोटोचं महत्त्व अबाधित राहिलं तरी वाद मात्र टळला नाही.

बिलाल हुसेन या फोटोग्राफर आणि त्याच्या फोटोबाबत उठलेला वाद मात्र अधिक तीव्र होता. हुसेन हा एपी या वृत्तसंस्थेचा प्रशिक्षणार्थी फोटोग्राफर होता. त्याच्या वीस फोटोंच्या मालिकेतील एकाची निवड पुलित्झरसाठी झाली होती. पण पुरस्कार प्रदान होण्यापूर्वीच वादाला तोंड फुटलं. २००४मध्ये चार जण फलुजामध्ये बंदुकीच्या फैरी झाडत असल्याचा तो फोटो होता. काही 'ब्लॉग्जमधून, हुसेनला दहशतवादी रॉकेट उडवत आहेत किंवा लोकांना मारत असतानाच त्याला कसे काय हे फोटो काढता आले, अशा घटना तिथे घडत असल्याची माहिती कोणी पुरवली होती का,' असे प्रश्न उपस्थित करण्यात आले.

बिलाल हुसेन हा इराकी फोटोग्राफर, फलुजामध्ये राहून एपी या वृत्तसंस्थेसाठी काम करत होता. हुसेन हा काही मूळचा फोटोग्राफर नव्हताच. तो फलुजामध्ये मोबाइल, कम्प्युटरचं दुकान चालवत होता. केवळ स्थानिक माहिती असल्यामुळे एपी वृत्तसंस्थेनं त्याला त्यांच्यासाठी काम करण्याची संधी दिली होती. त्यासाठी त्याला फोटोग्राफीचं प्रशिक्षण देण्यात आलं. कारण फलुजामधली स्थिती नियंत्रणाबाहेर गेलेली होती. त्यामुळे स्थानिक माणसाची मदत घेण्यावाचून गत्यंतरच नव्हतं. त्याला प्रत्येक फोटोनुसार मानधन द्यायचं ठरलं होतं.

हुसेनने फलुजामधली स्थिती दाखवणारे फोटो काढले होते. मात्र हे अमेरिकन सैन्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे काढल्याचा संशय होताच. त्यामुळे रमादीमध्ये त्याला संयुक्त राष्ट्राच्या दलानं ताब्यात घेतलं होतं. ही घटना आहे, एप्रिल २००६ची. तो घुसखोर असल्याचा संशय होता. मात्र पुराव्याशिवाय हुसेनला अटक केल्यानं जिनेव्हा कराराचं उल्लंघन झाल्याची टीका चोहोबाजूंनी झाली. अखेर २००८मध्ये त्याला सोडण्यात आलं. तरी त्या फोटोवरून निर्माण झालेला वाद कधी शमला नाही.

पुलित्झर पुरस्कार मिळणं ही मोठी भूषणावह गोष्ट असली तरी पिवळं असलेलं सगळंच सोनं नाहीये, त्यात पितळंही असल्याची चर्चा होणं चिंतेचीच बाब ठरली.

**– अपर्णा पाटील**
प्लॉट नं. ६०० (१०१),
गिरिजा अपार्टमेंट, खेर सेक्शन,
अंबरनाथ (पूर्व) ४२१५०१
aparna.patil1@gmail.com

# जग गेलं खड्ड्यात!

## सु.गो. तपस्वी

''**जग** गेलं खड्ड्यात, असं म्हणण्याची हिंमत स्त्रीला यावी लागते; मगच ती बंड करू शकते,'' अशा अर्थाचं विधान एप्रिल २०१४ मध्ये प्रकाशित झालेल्या शब्द रुचीच्या अंकातील मुलाखतीत विद्या बाळ यांनी केल्याचं स्मरतं. अशी हिंमत आल्यावरच एखादी महिला बंड करून उठू शकते हे मान्य करूनही मला असं वाटतं, की हे तत्त्व सर्व मनुष्यजातीला लागू पडावं, फक्त महिलांनाच असं नाही!

प्रत्येक बंडखोरी नेहमी रास्त ठरेल, हा मुद्दासुद्धा वादाचा ठरू शकतो. बंडखोरी करण्याकरता पूर्वतयारी लागते, वेळ येऊन ठेपावी लागते व बंडखोरी टप्प्याटप्प्यानंच करायची असते; पहिला टप्पा यशस्वी ठरल्यानंतरच दुसऱ्या टप्प्याकडे वाटचाल करावी लागते. शिवाय, पठडीनुसार मळलेल्या पाऊलवाटेवरून चालायचं की नवीन वाट निर्माण करायची, हासुद्धा एक जुगार ठरतो. विशेष बुद्धिमत्ता व विचार करण्याची क्षमता लाभलेल्यांनाच ते शक्य होतं. समाजातील सर्वसामान्यांना तो जुगार खेळताच येणार नाही.

दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे बंडखोरी करण्यासाठी त्या त्या व्यक्तीकडे जुगारी मानसिकता असावी लागते.

जुगारातील यशापयश भोवतालातील अनेक गोष्टींवर अवलंबून असतं. त्या त्या घटकाच्या शक्याशक्यतेवर अंतिम घटनेचा परिणाम अवलंबून असतो. खूप विचार करून केलेल्या प्रयत्नांमुळे यश प्राप्त करण्याची शक्यता खूप दाट असली, तरी यश लाभलेच ह्या गोष्टीची कोणीही खात्री देऊ शकत नाही; त्या त्या व्यक्तीला अपयश पचवण्यासाठीही उपाययोजना तयार ठेवावी लागते.

बहुधा, बहुतांश समाजाची प्रश्नानुरूप सांगोपांग विचार करण्याची तयारी नसते; काहींची शैक्षणिक पात्रता नसते तर काहींची कुवतही नसते. शिवाय, त्या त्या विषयाला पुरेसा वेळ देण्याची इच्छाही असावी लागते. बऱ्याचदा संदर्भातील गोष्टीचं महत्त्व त्या व्यक्तीच्या ध्यानात आलेलं नसतं म्हणून सदर गोष्टीला अग्रक्रम दिला जात नाही. प्रस्तुत शेवटच्या मुद्याकरता शिक्षण-प्रशिक्षणाचा व प्रबोधनाचा उपयोग होऊ शकेल. मात्र, तो जुगार खेळायचा की नाही, हे शेवटी त्या त्या व्यक्तीलाच ठरवावं लागतं.

काही वर्षांपूर्वी डॉ. नीलम गोऱ्हे ह्यांच्या मुलाखतीदरम्यान एक मुद्दा मी त्यांच्यासमोर मांडला होता की 'स्त्री-मुक्तीच्या संदर्भात महर्षी कर्वे, र.धों. कर्वे, जोतिबा फुले वगैरे मंडळींचं कार्य खूप महान आहे. त्या मंडळींनी समाजात स्त्री-मुक्तीसाठी जाणीवजागृती केली हे निश्चित; परंतु स्त्रीला खरं स्वातंत्र्य ज्या गोष्टीमुळे लाभलं ती गोष्ट आहे संततिप्रतिबंधक साधनं, कॉन्ट्रासेप्टिव्ह्ज! डॉ. गोऱ्हेंनी तो मुद्दा मान्यही केला होता.

विद्या बाळ ह्यांची मुलाखत वाचल्यावर, त्यातील काही मुद्यांवर मी फोन करून विद्याताईंशी चर्चा केली. माझ्या उपरोक्त मुद्यावर सहमती दर्शवत, महिलांची आजची वैचारिक क्षमता उलगडण्यासाठी त्यांनी एक छान उदाहरण दिलं होतं. ''ताटात सर्व पदार्थ वाढून ताट समोर ठेवलं; तरी जेवायला सुरुवात करायची की नाही, हे कोण ठरवणार?'' हा प्रश्न विचारून पुढे विद्याताई म्हणाल्या होत्या, ''महिलांमध्ये हिंमत येण्याकरताच आमची चळवळ कार्यरत असते, प्रबोधन करत असते.''

विवाहामुळे समाजातील स्त्री-पुरुषांवर काही बंधनं येतात, त्याचबरोबर अनेक सुविधाही त्या त्या दांपत्याला लाभतात. 'शब्द रुची'मधील विद्याताईंच्या प्रकाशित झालेल्या मुलाखतीसोबत 'इंडियन एक्स्प्रेस' ह्या वृत्तपत्रात काही वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेला एक इंग्रजीतील अहवाल दिलेला आहे. त्या अहवालात जगभरातील विवाहरुढीविरुद्ध विद्याताईंनी मत व्यक्त केल्याचा उल्लेख आला होता. विवाहसंस्थेबाबत चर्चा करताना मी विद्याताईंना म्हणालो होतो, की स्त्री-पुरुषाच्या विवाहसंबंधातून निर्माण होणारा एक महत्त्वाचा प्रश्न कायम स्त्रीलाच सतावत असतो आणि शरीरसंबंधातून निर्माण होणाऱ्या प्रजेला बाप लाभावा ह्याकरताच समाजधुरीणांनी विवाहसंस्थेची सुरुवात केली होती.

माझ्या उपरोक्त विधानावर प्रश्न विचारूनच विद्याताईंनी मला निरुत्तर केलं होतं. असा होता विद्याताईंचा प्रश्न, ''किती बाप निर्माण होणाऱ्या मुलांची जबाबदारी वडील म्हणून स्वीकारतात?''

प्रस्तुत प्रश्नावर विचार करताना माझ्या हे लक्षात आलं, की संदर्भातील टक्केवारी समाजातील विविध स्तरांमध्ये वेगवेगळी आहे. वरच्या अतिश्रीमंत व तळातील दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्या विवाहबद्ध जोडप्यांमध्ये जबाबदारी स्वीकारणाऱ्या बापांची टक्केवारी खूपच कमी असावी; जवळजवळ नगण्यच. मात्र, सुशिक्षित

मध्यमवर्गात बाप म्हणून जबाबदारी स्वीकारणाऱ्यांचं प्रमाण ऐंशी टक्क्यांच्या वर असावं!

अतिश्रीमंतांकडे पैशांचा प्रश्न येत नसल्यामुळे जन्माला आलेल्या मुला-मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न तरी येत नसावा, मात्र गरिबांच्या घरांतील बरीच प्रजा देशोधडीला लागलेली आपण बघितलेली असते!

विवाहपूर्व वा विवाहानंतर शरीरसंबंध ठेवायचे का नाहीत हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. विषयवासना ही एक शारीरिक भूक आहे व व्यक्तीनुसार व वयोमानाप्रमाणे ती बदलूही शकते. पोटाच्या भुकेसाठी एखाद्याला एकच पोळी पुरेशी ठरते तर दुसऱ्या व्यक्तीचं पोट चार-पाच पोळ्या खाऊनही भरत नाही. पोटाच्या भुकेवर जसं वैचारिक व मानसिक नियंत्रण ठेवता येतं तसंच ते इतर शारीरिक गरजांवर पण माणसाला ठेवता येऊ शकतं; विवाहसंस्था त्यासाठीही उपयुक्त ठरू शकते. आज तर संततिप्रतिबंधक साधनांमुळे शरीरसंबंधातून निर्माण होणारे बरेच प्रश्न सोडवले जाऊ शकतात.

विवाहसंस्थेमुळे अनेक प्रकारचे सामाजिक, मानसिक व वैयक्तिक प्रश्न दांपत्यांत निर्माण होऊ शकतात; ते नाकारता येत नाहीत. कोणत्या प्रश्नाला व्यक्ती कोणता अग्रक्रम देते व त्या प्रश्नावर कशी मात करते हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे आणि तो त्या व्यक्तीनंच सोडवला पाहिजे.

स्त्री-मुक्ती चळवळींनी महिलांना अशा प्रश्नांवर विचार करण्याकरता प्रबोधन केलं, हे निश्चित! केलेल्या प्रबोधनामुळे काही प्रश्न सुटले, परंतु झालेल्या महिलांच्या प्रबोधनामुळे समाजातील अनेक प्रश्न सुटलेले नाहीत, उलट समाज बिघडलेला भासतो; बलात्कार पूर्वीही होत होते, आज मात्र कारणमीमांसा वेगवेगळी आहे.

मध्यमवर्गाचं समाजातील प्रमाण वाढवणं हा प्रस्तुत समस्येवर एक ठोस उपाय आहे, असं मला वाटतं.

मध्यमवर्गाची दोन प्रमुख लक्षणं आहेत; एक म्हणजे तो वर्ग गरिबीतून बाहेर निघालेला असतो आणि त्या वर्गाकडे शालेय व पुढील शिक्षणाची वानवा नसते; तो सुशिक्षित असतो. प्रबोधनामुळे वा वैचारिक क्षमतेमुळे स्वत: विचार करण्याकडे त्याचा कल असतो आणि त्या वर्गाला विचारानंतर प्रश्नांवर मात करणं शक्य असतं. असा मध्यमवर्ग निर्माण करणं, हा मला वाटतं समाजाच्या विविध समस्यांवर सोयीस्कर उपाय आहे.


सुशिक्षित मध्यमवर्ग निर्माण करण्याची जबाबदारी जशी शासनाची-राजकारण्यांची आहे, तद्वत ती सामाजिक संस्थांची-समाजकारण्यांची सुद्धा आहे. देशात उद्योगधंदे विकसित करून, समाजाला नोकरीयोग्य शिक्षण देऊन गरिबी बऱ्याच प्रमाणात कमी करणं - भौतिक विकास साधणं - हे शासनाच्या हातात आहे, तर समाजाचं गरजेचं प्रबोधन साधून, समाजात अर्वाचीन मूल्यसंस्कृती निर्माण करणं हे समाजधुरीणांचं काम आहे.

स्त्री-मुक्ती संस्थांनी त्यांचं काम तसंच चालू ठेवावं, मात्र त्या व इतर प्रबोधनाच्या कामांकडे पुरुषांना आकर्षित करून, सामील करून घेऊन संस्थांच्या कामाचा आवाका वाढवावा.

जग जाऊ द्या खड्ड्यात, संपूर्ण समाज विकसित केला, तर त्या समाजात महिला येतातच की!

**– सु.गो. तपस्वी**
ए-३/१९, मीनल गार्डन्स,
पटवर्धनबाग, एरंडवणा, पुणे-४११००४
दूरध्वनी : ०२०-२५४१०१४५
suhas@fandsinda.com

ग्रं
था
ली




**मुंबई ते काश्मीर – सायकलसफर**
**अरुण वेढीकर**

जगण्यावर भरभरून प्रेम करणारं एक मन मनमुराद विहरतं. आकाशाच्या नितळतेला स्पर्शून येतं. पानापानांवर ओघळणारं चांदणं टिपून घेतं आणि वाटेतल्या अडी-अडचणींनाच सवंगडी करीत त्यांच्याशीच सुसंवाद साधत थेट हिमवर्षावात चिंब होतं... ते रोमांचित मन लेखणीतून कागदावर ओथंबून येतं, त्या वेळीच हे असं इतकं सुवासिक प्रवासवर्णन व्यक्त होतं. अरुण वेढीकर त्यांच्या सायकल प्रवासातील कण न् कण असा जगले आहेत. विलक्षण आरस्पानी तरलतेनं त्यांनी क्षण न् क्षण काळजात टिपलेला आहे आणि आनंदाचा हा दाटून आलेला अमृतघन अनेक मनांवर बरसावा या ओढीनंच हे प्रवासवर्णन लिहिलं गेलं आहे.
वाचकाला आपल्या भटकंतीत सहजपणे सामावून घेण्याचं व आपले डोळे काही क्षण त्याला देण्याचं कौशल्य असावं लागतं. अरुण वेढीकरांची ही सायकल सफर खरोखर तसा अनुभव देण्याइतकी समर्थ आहे.

**– प्रवीण दवणे**

**मूल्य ४०० रुपये ● सवलतीत २४० रुपये**



# सिक्वेल
## लेखन स्पर्धा

कुतूहल, उत्सुकता या भावना माणसाचं जीवन रोचक करतात. पुढे काय? – या प्रश्नातून या कुतूहलाची सुरुवात होते आणि आपण सगळेच या स्वप्नरंजनात रंगून जातो. एका अर्थाने 'आज' हा 'काल'चा सिक्वेल असतो आणि 'उद्या' नावाच्या 'आज'च्या सिक्वेलविषयी आपल्याला जबरदस्त कुतूहल असते.

**तर यंदाच्या 'साहित्य सूची'च्या दिवाळी अंकाचा विषयच आहे – सिक्वेल !**

साहित्य, चित्रपट, व्यंगचित्रे अशा अनेक माध्यमांतल्या सिक्वेल्सचा वेध घेणाऱ्या या अंकाचे खास आकर्षण आहे विख्यात लेखक भालचंद्र नेमाडे यांच्याशी 'हिंदूचा सिक्वेल' या विषयावर संजय भास्कर जोशी यांची मनमोकळी बातचीत. शिवाय या अंकाचे काही खास मानकरी आहेत – अविनाश सप्रे, गणेश मतकरी, आनंद जोशी, राजन खान, मोनिका गजेंद्रगडकर, सुबोध जावडेकर, नीरजा, प्रज्ञा पवार, श्रीरंग गोडबोले, रविमुकुल, शुभा गोखले, मधुकर धर्मापुरीकर... आणि असे अनेक मान्यवर!... आणि या स्पेशल अंकाचे अतिथी संपादक आहेत – संजय भास्कर जोशी.

**पण अशा मान्यवरांखेरीज इतरांना देखील या अंकात मानाचे स्थान असणार आहे. होय, तुम्ही देखील या भन्नाट कल्पनेत सामील होऊ शकता. त्यासाठी तीनच अटी : तुम्ही वाचनवेडे असायला हवे, लिहायची हौस हवी आणि भन्नाट कल्पनाशक्ती हवी. तर वाचकहो, तुमच्यासाठी एक अफलातून सिक्वेल लेखन स्पर्धा जाहीर करत आहोत...**

## 'साहित्य सूची' आयोजित 'राजहंस प्रकाशन' प्रायोजित सिक्वेल लेखन स्पर्धा

### - खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सिक्वेल लिहा -

**१. भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला'चा सिक्वेल, ज्याचे पहिले वाक्य असेल - 'मी पांडुरंग सांगवीकर. आज उदाहरणार्थ पंचाहत्तर वर्षांचा आहे...'**

**२. 'शाळा' या मिलिंद बोकील यांच्या कादंबरीचा सिक्वेल लिहा.**

**३. जी. ए. कुलकर्णी यांना 'तुती' आणि 'कैरी' या मालिकेतल्या कथांच्यानंतर त्याच मालिकेतली 'केळं' ही सिक्वेल कथा लिहायची होती, तर ती सिक्वेल कथा लिहा.**

- **हा सिक्वेल ३००० ते ३५०० शब्दात असावा.**
- **पहिल्या तीन क्रमांकाच्या सिक्वेल्सना राजहंस प्रकाशन तर्फे अनुक्रमे रु.१०,०००, रु.५,००० आणि रु.३,००० अशी बक्षिसे आणि दोन उत्तेजनार्थ सिक्वेल्सना प्रत्येकी रु.१०००चे पारितोषिक दिले जाईल आणि अर्थातच बक्षिसपात्र सिक्वेल्स दिवाळी अंकात छापले जातील.**
- **आपले सिक्वेल्स दि.१५ जुलै २०१४ पर्यंत खालील पत्त्यावर पाठवावेत किंवा magazine@erasik.com या ई-मेल आयडीवर पीडीएफ फॉरमॅटमध्ये पाठवावेत.**

संपर्क : 'साहित्य सूची' द्वारा

रसिक साहित्य प्रा.लि. अप्पा बळवंत चौक, पुणे २. ☎ : ०२०२४४५११२९

राजहंस प्रकाशन यांच्या सहयोगाने

# धारपमॅडम

## श्रीकांत पेटकर



विद्या धारप यांचा सत्कार करताना श्रीकांत पेटकर

**कल्याण!** एक इतिहासप्रसिद्ध शहर. रेल्वेमुळे वा मुंबई जवळ असल्यामुळे आधुनिकतेकडे वेगाने जाणारे शहर. तसे आजकाल प्रत्येकच उपनगर वेगाने वाढत आहे, मात्र ते फक्त गृहसंकुलाच्या संख्येने. त्यासोबत येणारे प्रश्न, जसे रस्ता, बगिचा, मैदाने, स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन, कचऱ्याचे ढीग आदी गोष्टींकडे काणाडोळा होत असतो. मुंबईत नोकरी असल्याने व तिथे घरे महाग असल्याने उपनगरात राहण्याशिवाय पर्याय उरत नसतो. दिवसभर कार्यालयात वा कारखान्यात काम करणे व रात्रीला विश्रांतीसाठी घरी येणे असाच दिनक्रम बहुतेकांचा झाला आहे.

गृहसंकुले वाढली तसा वाहतुकीचा प्रश्न वाढला. पाणीप्रश्न निर्माण झाला. त्याचप्रमाणे घराघरातील तयार होणारा कचरा वाढला. या कचऱ्याची विल्हेवाट कशी करावी याचा प्रश्न वाढला. कल्याणमध्ये शहरातील सर्व कचरा गणेशघाट वा दुर्गाडी किल्ल्याच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत टाकणे सुरू झाले. दोन-तीन वर्षांतच तेथे कचऱ्याचे डोंगर तयार झाले. नागरिकांना सायंकाळी फिरण्याचे ठिकाण म्हणून खाडीकिनारी गणेशघाट विकसित करण्यात आला, पण या डंपिंगच्या वासामुळे इथे येणे लोक टाळतात. लालचौकी व त्या जवळच्या परिसरात सायंकाळी तुम्ही फिराल तर तेथील रहिवासी कसे राहतात याचे तुम्हाला नवल वाटेल. सततची दुर्गंधी घेऊन त्यांची ज्ञानेंद्रिये बधीर तर झाली नाहीत ना! नाकावरील रूमाल सुटतच नाही. एक दिवस तेथे फिरायला गेलात तर पुन्हा जाणे मुश्किलच!

डम्पिंग ग्राऊंडवर सतत काहीना काही पेटलेले वा पेटवलेले दिसत असते.

अरविंद आगाशे. CPWD मधून सेवानिवृत्त झालेले अधिकारी. ८ वर्षे झालीत त्यांना निवृत्त होऊन. विविध विषयांवरील अभ्यास बघून त्यांचे व्याख्यान आमच्या 'सम्यक् संकल्प सामाजिक संस्थे'द्वारे ठेवण्यात आले. त्यांच्या व्याख्यानातून त्यांच्या कार्याची ओळख झाली, तशी कल्याण शहराच्या काळ्या बाजूचीही माहिती मिळाली.

आधारवाडीच्या डंपिंग ग्राऊंडच्या म्हणजेच टेकडीच्या दुसऱ्या बाजूला २५०-३०० कुटुंबे राहतात हे कळले. त्या कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी आगाशे प्रयत्न करतात. त्यांच्या व्याख्यानाने आमच्या संस्थेच्या सभासदांनी त्या जागी जाण्याचे ठरवले. अन् कल्याणमधील भयावह वास्तव पाहिले. कोणत्याही आधुनिक शहरात असेही असू शकते याचा आम्हाला अनुभव आला.

अण्णाभाऊ साठेनगर नावाच्या वस्तीत आम्ही गेलो. डंपिंग टेकडीच्या पायथ्याशी सुरुवातीला भंगार विकत घेणाऱ्या दलालांची दुकाने व नंतर अरुंद रस्त्याच्या बाजूला रहिवाशांच्या झोपड्यांची गर्दी.

ही २५० ते ३०० कुटुंबे आली तरी कुठून? १९७२ साली महाराष्ट्रात दुष्काळ पडला होता. लातूर जिल्ह्यातील मातंग, महार समाजाची कुटुंबे काम शोधत कल्याणात आली. लालचौकीतील गणेशमंदिरामागे ती स्थायिक झाली. नगरसेवकाच्या वा इतरांच्या प्रयत्नाने त्यांना तिथून हुसकावण्यात आले. तोपर्यंत कचऱ्याच्या



**आंबेडकर जयंतीनिमित्त कार्यक्रमात साठेनगरच्या मुली**

ढिगावर या लोकांना काम मिळू लागले. कचऱ्यातील कागद, प्लॅस्टिक, भंगार इत्यादी वस्तू निवडायच्या, त्या वेगळ्या करायच्या, भंगाराच्या दलालाला विकायच्या असे करून त्यांचा रोजंदारीचा प्रश्न आता सुटला होता. डंपिंग ढिगाऱ्यांच्या बाजूलाच झोपड्याही उभ्या राहिल्या. राहण्याचाही आता प्रश्न सुटला.

लातूर भागातून आलेल्या- विशेषत: मातंग समाजातील - या लोकांनी तिथे साठेनगरच उभे केले. अण्णाभाऊ साठे यांचा पुतळाही तिथे आहे.

दिवसभर ढिगाऱ्यावर फिरून, भंगार वस्तू जमा करून, हातात पैसा येऊ लागला. पण पैशामुळेच दारूचे प्रमाण वाढले. नवरा-बायको व मुले सर्वजण भंगारातून प्रत्येकी दोनशे ते तीनशे दिवसाला कमावतात. हा पैसा जुगार वा दारूतच रोजच्या रोज उडवला जातो. या कामामुळे वस्तीत शाळेत जाणाऱ्या मुलामुलींचे प्रमाण अत्यल्प आहे. आठ-दहा वर्षे झाली तरी मुलामुलींच्या अंगावर कपडे नाहीत. वयात आलेल्या मुलींचा प्रश्न. तर तो सोडवला जातो बालविवाहाने. तेथलीच मुलगी तिथल्याच कुठल्याशा मुलासोबत लग्न करून राहणार. नाहीतर अंगात 'देवी' आली असे सांगून लातूरकडच्या बुवाबाबाकडून मार दिला जाणार. हे सगळे मी ऐकत होतो. मार्च २०१४ मधील हा अनुभव.

२०२० मध्ये भारत महासत्ता बनणार ह्या वल्गना करणाऱ्या या देशात २०१४ साली मुंबई महानगरीजवळ ही परिस्थिती आहे!

या वस्तीतच एक तात्पुरती खोली व त्या खोलीत पंधरा ते वीस मुलेमुली अभ्यास वा काहीतरी मोठ्याने वाचत असल्याचे दिसले. दुर्गंधी, नग्न मुलेमुली, दारूडे नवरे अशाही वातावरणात हा वर्ग चालत होता. आगाशेंनी त्या वर्गात सर्वांना नेले. अन् तिथे भेट झाली, विद्या धारपमॅडमची!

नावाप्रमाणेच त्या या नरकात विद्यावाटपाचे कार्य करत होत्या. त्यांच्यासोबत, तेथील मुलामुलींसोबत आम्ही फोटो काढला. काही मुलांनी कविता म्हटल्या. तालासुरात गाणी म्हटली. येणारे-जाणारे विद्याताईंशी आदराने बोलत होते. त्याही हक्काने 'तुमच्या मुलीला का पाठवलं नाही वर्गात?' वगैरे विचारत होत्या.

सगळे कसे भारावल्यासारखे. एकीकडे गुंडांची, वांड मुलांची हिरोगिरी, झोपड्या बांधणे, विकणे यात येथील दलालांची कमाई. येथील मुलांनी हेच काम करावे, मुलींनी बालविवाहच करावे अशा प्रवृत्तीची येथील मानसिकता असताना, धारपबाईंनी गेल्या दहा वर्षांपासून इथे वर्ग चालवले आहेत.

दहा वर्षांपूर्वी शाळेचे वा शिक्षणाचे नाव नव्हते. पंधरा-सोळा वर्षांच्या मुली नग्न राहायच्या हे ऐकून शिसारीच आली.

विद्या धारप या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) या बँकेतून अधिकारी म्हणून १२ वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झाल्या. दोन मुले. मुलगी परदेशात उच्चपदावर तर मुलगा मुंबईत मोठ्या पदावर. कल्याणमधील एका सुखवस्तू गृहसंकुलात त्या राहतात. दहा वर्षांपूर्वी त्यांनी येथील अवस्था बघितली अन् रोज इथे येणे सुरू केले. मुलामुलींना महानगरपालिकेच्या शाळेत टाकणे सुरू केले.

शाळेतील अभ्यास पक्का करण्यासाठी त्यांनी त्या वस्तीत वर्ग घेणे सुरू केले. भाषा, इंग्रजी, गणित व इतर सर्वच त्या शिकवू लागल्या. ज्या वस्तीत तुम्हीआम्ही नाक दाबूनच फिरतो त्या वस्तीत त्या रोज दु. ३ ते ७ या वेळेत वर्ग घेत आहेत. सुरुवातीला तेथील गुंडाचा त्रास झाला, पण धारपमॅडम शिक्षण वा अंधश्रद्धानिर्मूलन या व्यतिरिक्त इतर काही करत नाहीत म्हणून गुंडांनी मॅडमना त्रास देणे सोडून दिले.

मॅडमच्या मेहनतीला फळही आले. आता मुलेमुली नग्न फिरताना दिसत नाहीत. बालविवाहाचे प्रमाणही कमी झाले आहे. मागच्या वर्षी घुले नावाचा मुलगा दहावी पास झाला. हा या वस्तीतील पहिला दहावी उत्तीर्ण विद्यार्थी. त्याच्यासोबत आम्ही फोटो काढले. पुढे काय



**साठेनगरमधील दहावी पास झालेला पहिला मुलगा घुले (उजवीकडून चौथा)**

करणार, असे विचारले तर जवळच्या कॉलेजात शिकून M.P.S.C. देणार असल्याचे त्याने सांगितले. इतर मुलांनाही शिक्षणात मदत करत असल्याचे सांगितले. धारपमॅडममुळे तेथील मुलामुलींत आत्मविश्वास वा पुढचे ध्येय दिसून येत होते.

धारपमॅडम आपल्या निवृत्तीवेतनाच्या एकतृतीयांश हिस्सा या वस्तीतील मुलांच्या वर्गावर खर्च करतात. दरमहा मुलामुलींना एखादा विषय कठीण जात असेल तर त्याची तयारी करून घ्यायला स्वत:च्या घरी येऊन जातात. त्यांची ही चोवीस तासांची तळमळ कुणालाही थक्क करेल अशी आहे. दुर्गंधीतून आलेल्या अस्वच्छ मुलामुलींना घ्याल तुम्ही घरात? धारप त्यांना घरात आणतात.



साठेनगरमधील मुले आणि पालकांसह अरविंद आगाशे आणि विद्या धारप

'सम्यक् संकल्प सामाजिक संस्थे'ने या वर्षाची डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती वेगळ्या पद्धतीने साजरी करण्याचे ठरवले. दरवेळेस वक्ते बोलावून काहीतरी ऐकायचे, दुसऱ्यावर टीका करायची, त्यापेक्षा तेथील मुलामुलींना शालेय वस्तू, गणवेश, पुस्तके, वह्या यांचे वाटप करण्याचे ठरवले. दरवर्षी होते त्याऐवजी ही जयंती 'सर्वोदय मॉल' या वातानुकूलित हॉलमध्ये करण्याचे ठरले. झोपडपट्टीतील मुलांना एक दिवस झगमगाटात आणायचे, त्यांना त्यांच्या वस्तीशिवायही उजेडाचे जग दाखवायचे हा उद्देश.

या कार्यक्रमाला मनसे तसेच हॉलच्या मालकांनी सूट दिली. साठेनगरमधील मुलींची गाणी तिथे झाली. नृत्य झाले. विद्या धारपमॅडमचा सत्कार झाला. कार्यक्रमाला हजर प्रेक्षकांतून देणग्या सुरू झाल्या. मुलींना दत्तक घेण्याची प्रपोजल आलीत.

मार्च अखेरीपासून १४ एप्रिल २०१४ पर्यंत पंधरा-वीस दिवसांत आम्ही काही करू शकलो याचे समाधान आम्हाला मिळाले. भविष्यात आपला पैसा, देणगी कुठे जायला हवी याचे भान आम्हाला आले.

धारपमॅडम जे कार्य करत आहेत, त्यापुढे आपली देणगी क्षुल्लक आहे. आपणही असा विचार करावा.

त्यांचा संपर्क
विद्या धारप ९८२०११७१५९
अरविंद आगाशे ९९३०९६३४२९

– **श्रीकांत पेटकर**
सुकृती सुरूल आर्ट्स, ए ९/३०२, चिनार बिल्डिंग,
लोकउद्यान, कल्याण (प) ४२१३०१
भ्रमणध्वनी : ९७६९२१३९१३
shrikantpetkar@yahoo.com

**तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन**

**रविवार, १५ जून २०१४ रोजी**
**डहाणूकर महाविद्यालय, विलेपार्ले (पूर्व) येथे, सायं. ६**




**हुमान**
**संगीता उत्तम धायगुडे**

**नियतीनं घातलेली हुमानं**
**सोडवत स्वत:ला सिद्ध**
**करणाऱ्या स्त्रीचे आत्मकथन**

**मूळ किंमत ३५० रु. ● सवलतीत २०० रु.**

**तिसरी सुधारित आवृत्ती**




**मे आय**
**कम इन...?**
**कु. तन्वी दिनेश डोके**

**अपंगत्वावर मात करणाऱ्या**
**एका मुलीचे अनुभवकथन**

**मूळ किंमत १२५ रु. ● सवलतीत ७५ रु.**

## ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

'ग्रामीण बोलीचा शब्दकोश' हा नुकताच हाताशी आलेला नवीन शब्दकोश. शब्दकोश म्हटला की त्याचे मनापासून स्वागत! नवीन शब्द, नवीन अर्थ, नवीन संदर्भ या अर्थाने त्याचे मोल अधिक, म्हणून त्याचे स्वागत अगत्यपूर्वक! परंतु त्यात आलेला 'ग्रामीण हा शब्द आणखी जवळीक साधणारा, आपला वाटणारा, कुतूहलाने आकृष्ट करणारा. तशी मराठीत शब्दकोशांची संख्या आता चांगलीच बाळसं धरू लागलेली आहे. ज्ञानकोश, विश्वकोश किंवा अभिनव मराठी शब्दकोश इतकीच मर्यादित ही संख्या राहिलेली नाही. शासनस्तरावर होणारे प्रयत्न स्वागतशील म्हटले तरी अनेक नामवंत प्रकाशन संस्था याबाबत आग्रही आणि आघाडीवर आहेत. परिणामी, शब्दकोशांचे भांडार समृद्ध होत असल्याचे दिसत आहे. ही भाषा वृद्धी आणि संमृद्धीची नांदी म्हणायला हरकत नाही. नुकताच 'ग्रंथाली'च्या 'संकल्पना कोशा'चा पाच खंडांत प्रकाशन समारंभ झालेला आहे आणि आता ग्रामीण शब्दकोशाची त्यात भर पडली आहे. त्यामुळे वाचक आणि अभ्यासक त्याचे स्वागत नक्कीच करतील.




खरे तर लेखकांच्या समोर नसलेली तरीही काही मूठभरांना वाटणारी चिंता आज अनेकदा कानावर येते, ती म्हणजे त्याने वापरायची भाषा कोणती असावी? प्रमाण असावी की बोली? मूळ प्रश्न खरा चिंताजनक आहे तो, लेखकाने वापरलेली भाषा किती खणखणीत आहे याचा. ग्रामीण भाषेचाच विचार केला तरी, त्या मातीचा गंध घेऊन आलेले शब्द किती आहेत आणि बोलण्याचा ढंग किंवा ढब किती जोपासली आहे, हा विषय संशोधनाचा होऊ शकेल. हा मुद्दा उपस्थित करण्याचे कारण, आज अनेक अस्सल ग्रामीण शब्द कल्हई लावल्यासारखे झाले आहेत किंवा तांब्यापितळेच्या भांड्यासारखे मोडीत निघालेले आहेत. त्याबाबत सर्वच स्तरावर उदासीनपणा दिसून येतो. तो उदासीनपणा झटकला, आपल्याच मातीच्या शब्दांचे सोने खोदून पाहिले तर डोळे दिपून जावेत असा खजिना महाराष्ट्राच्या बोलीभाषेत सापडेल. सरोजिनी बाबर, दुर्गा भागवत, शांता शेळके यांच्यासारख्यांनी हा धांडोळा घेतला, आणखीही काहीजण घेताना दिसतात. परंतु त्यांच्या हाताला जे लागत आहे त्यापेक्षा मातीआड जाणाऱ्या शब्दांची संख्या प्रचंड आहे. आणि त्यावर परकीय भाषेची माती आपणच आपल्या हाताने ढकलीत असल्याने दोष तरी कुणाला द्यायचा? अशा प्रसंगी अशा शब्दकोशाचे अप्रूप वाटले नाही तरच नवल!

डॉ. द.ता. भोसले हे मराठी साहित्यात मानाचे स्थान असलेले व्यक्तिमत्त्व. ग्रामीण भाषा चंद्रभागेच्या नितळ आणि पवित्र पाण्यासारखी नसानसात भिनलेली. याचा प्रत्यय त्यांच्या पहिल्याच कादंबरीत, 'मी आणि माझा बाप'मध्ये आला होता. पुढे त्यांनी या क्षेत्रात केलेल्या दमदार लेखनवाऱ्या आणि केलेली प्रवचने याची नोंद चोखंदळ वाचकानी कधीच घेतलेली. आता त्यांनी समृद्ध केलेला कोश ही त्याची पुढची पायरी म्हणायला हवी. भाषेविषयीचं प्रेम म्हणायला हवे. भाषा टिकावी यासाठीची आंतरिक तळमळ म्हणायला हवी.

हा कोश साकार करण्याचा ध्यास आणि त्यापायी घेतलेले परिश्रम याबाबत त्यांचे मत अतिशय जिव्हाळ्याचे दिसून येते. आपल्या मातीत असलेले हे अस्सल बावनकशी सोने आपण का मातीआड जाऊ द्यायचे? भाषा समृद्ध करायची तर तिचा शब्दसंग्रह विपुल असायला हवा, त्याच्या वापरासाठी आपण आग्रही असले पाहिजे, ज्ञानभाषा म्हणून तिचा समाजाला उपयोग झाला पाहिजे, त्या भाषेविषयीची अस्मिता आणि आत्मीयता ती भाषा बोलणाऱ्या मंडळींकडे असली पाहिजे, आणि त्या भाषेत उत्कृष्ट दर्जाची साहित्यनिर्मिती झाली पाहिजे. डॉ. द.ता. भोसले यांची किती साधी तरीही रास्त अपेक्षा भाषेच्या वृद्धीच्या तळमळीतून व्यक्त झाली आहे.

हा कोश साकारण्यासाठी द.ता. यांनी ज्या साहित्य आणि साहित्यकारांचा मागोवा घेलेला आहे त्यांचा आणि आपला परिचय नाही असे नाही, परंतु आपण डोळसपणे त्यांची दखल घेतली नाही असेच म्हणावे लागेल. ज्ञानेश्वर माउली, संतकवी एकनाथ, तुकाराम, संत निळोबा, रामदास, मोरोपंत, वामन पंडित, मुक्तेश्वर, होनाजी बाळा, शाहीर प्रभाकर, शाहीर रामजोशी, सरोजिनी बाबर यासारखी थोर मंडळी ज्यांनी या अस्सलतेचा पाया रचलेला आहे. आपल्या साहित्यात आवर्जून त्याचा उपयोग केला आहे. डॉ. भोसले यांनी जागृत आणि जागरूकपणे या पायापर्यंत जाण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. सारेच या ग्रंथात सामावलेले आहे असा दावा ते करीत नाहीत, परंतु जे आहे त्याचे मोल कमी नाही. एक शब्द घेतला आणि त्याचा अर्थ सांगितला, असे या कोशाचे स्वरूप नाही. सोबत ते त्याची उत्पत्ती स्पष्ट करतात. त्याची व्याप्ती काय आहे तेही सांगतात. त्यामुळे त्याचे स्वरूपसंदर्भ कोशासारखे झाले आहे. हे कष्ट सोपे नाहीत. हा संशोधनाचा विषय आहे. दतांनी चिकाटीने हे संशोधन केले आहे. संस्कृत, कानडी, पारशी यांचा जिथेजिथे स्पर्श झाला आहे तिथे तिथे त्यांचीही माहिती दिली आहे, तीही वृथा अभिमानाचे सोवळे न बाळगता.

या कोशात आलेले शब्द हे शेती, शेतकरी, चलन, गावगाडा, नाती, संस्कृती, रूढी आणि परंपरा यांच्याची असलेले दृढ नाते सांगतात. बरेच शब्द आपल्याही कानावरून जातात, या ना त्या कारणाने. जसे मराठा आरक्षणात 'कुणबी', भाववाढीच्या कारणावरून कांदा म्हणजे 'कृष्णावळ', घाईगर्दीत लग्न उरकून घेताना मागे पडलेले 'बोहले', खेकटे, घोरडदेव, चांगभले, जोहार, यळकोट, उजवणे, कलगीतुरा, तिरसिंगराव, धटिंगण, पदरमोड, बाशिंग, मलिदा, रामप्रहर असे आणखी बरेच शब्द. ज्यांची या संग्रहाने नोंद घेतली आहे. आपल्याला समृद्ध करायचे तर नुसता चाळून नव्हे तर संग्रही असावा असा हा संग्रह आहे.

अस्सल सोन्याची नाणी मुखपृष्ठावर दाखवून या कोशाची तुलना त्या खजिन्याशी केलेली आहे. ही कल्पकता कोशाइतकीच सुंदर म्हणायला हवी. यासाठी चित्रकार सतीश भावसार यांचे अभिनंदन

- **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

''वीरभोग्याः वसुंधरा' हे आहे सैनिकांचं एक वाक्य.''

''कठीण' असा शब्दच सैनिकासमोर नसतो. असतो फक्त आखलेला मार्ग आणि त्यावरून पुढे जाणं.''

''सैनिक होण्यामागची पहिली भावना आहे प्रेम. मनात अपार प्रेम असल्याशिवाय खरा सैनिक होता येत नाही. आधी प्रेम देशावर, मग आपल्या साथीदारावर, मग स्वतःवर. हे सैनिकी ट्रेनिंगचं ब्रीदवाक्य आहे.''

''स्वतःला सर्वात मागे ठेवणं म्हणजे सैनिक होणं.''




कादंबरीच्या नावाशी आपलं नातं सांगणारी ही वाक्ये आपल्या भेटीला येतात ती तिचे वाचन करीत असताना. अशा अनेक वाक्यांशी आपला परिचय होत जातो. सैनिक नावाशी जोडलेली कर्तव्ये आणि भावना यांचा गोफ उलगडत जातो. सैनिक होण्यातली प्रेरणा वाचकाच्या मनाला आवाहन करीत जाते. मुळातच सैनिकी जीवनाविषयी वाटणारे कुतूहल हे दोन स्तरांवर जाणवत राहते. देशाची सुरक्षा राखण्याचे इमान पार पाडताना सर्वस्वाला बंदुकीच्या अग्रावर टांगलेला गणवेषातील सैनिक आणि त्याचे शिस्तीतले जगणे. तर दुसरे असते, एक व्यक्ती म्हणून. जी असते भाव भावनांनी भारलेली, कुटुंबवत्सल व्यक्ती. त्या कुतूहलापोटी वाचावी अशी ही कादंबरी म्हणजे 'सोल्जर इन मी.'

ही कादंबरी आहे कॅप्टन भास्कर नावाच्या सैनिकाची. ज्याच्या ध्येयाच्या शब्दकोषात 'कठीण' हा शब्द नाही. तो नुसताच सैनिक नाही, तर सैनिक घडविण्यातही पुढाकार घेणारा सैनिक आहे. अहोरात्र सीमेवर दक्ष असणारा सैनिक सुटीच्या काळात तरुणांना प्रेरणा देण्याचे कार्य करण्यात स्वतःला झोकून देतो. आपल्यापरीने तरुणांना पुढे नेण्याचे, पर्यायाने समाज सुधारण्याचे कार्य करीत राहतो. यासाठी त्याला साथ आहे ती खंबीर मन आणि अतूट जिद्द यांची. माझ्या देशातील मागास राहिलेल्या घटकाला स्वतःविषयी जागृत करणे हे मला माझे कर्तव्य वाटते, हे त्याचे ध्येय. ही कादंबरी आहे कॅ. भास्करच्या सहवासात आलेल्या आणि नंतर भास्करमय झालेल्या अदितीची. सैनिकाची पत्नी म्हणून मिरविताना स्वतः सैनिकाच्या पात्रतेला सिद्ध ठरलेल्या अदितीची. सुखवस्तू आयुष्याला ठोकर मारणारी, फसलेल्या क्षणातून फिनिक्स पक्ष्याप्रमाणे भरारी घेणारी अदिती भास्करच्या कार्याला पुढे नेण्याचेच बळ दाखवत राहते, त्याच्यासोबत आणि अनुपस्थितीतही. 'भास्करच्या मार्गावरून चालण्यासाठी अनेक निष्ठावान सैनिकांची आवश्यकता होती पण आधी स्वतः एक सैनिक होणं खूप आवश्यक होतं,' याचे भान जपणारी अदिती सैनिकाप्रमाणेच निष्ठेने शिबीरातून, बालसुधारगृहातून परिवर्तनाचे काम पुढे घेऊन जाताना दिसते. त्यामुळे सैनिक म्हणून कॅ. भास्कर हे प्रभावी व्यक्तिमत्त्व आहे, तरी कादंबरीत नायिका ठरते ती अदिती. आणि कथनकाची नाळ जोडली जाते ती तिच्यात निर्माण झालेल्या सैनिकाशी. ज्यामुळे ग्रंथाच्या शीर्षकाला अर्थ प्राप्त होतो. तिच्यासोबत आहे रूपा. सामान्य परिस्थितीला बुद्धीच्या जोरावर झुकवणारी रूपा. घरकाम करणारी रूपा डॉक्टरकीपर्यंत मजल मारते. भास्करच्या कार्याने प्रेरीत होते आणि पुढे त्याचे ध्येय आपले जीवनाचे ईप्सित मानून समाजकार्यात स्वतःला झोकून देते, अगदी कठीण प्रसंगातही न डगमगता कार्य करीत राहते. ही असते तिच्यात निर्माण झालेली एका सैनिकाची निरपेक्ष निष्ठा. सैनिकी दवाखान्यात, विशेषतः युद्धकाळात अहोरात्र सेवेचा ट्रे हातात घेऊन तळमळीने कर्तव्य बजावणारी नर्स इथे आपल्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देते. तिचे नाव आहे सॅली. जीवनाला कसे सामोरे जायचे याचा पाठ ती आपल्या वागण्यातून इतराना देते.

कादंबरीचा आवाका हा सैनिकीबाण्याशी जोडलेला आहे. युद्ध, युद्धात जखमी वा शहीद होणारे जवान, सैनिकी दवाखाना यांची वर्णने सुरुवातीला येतात. तशी बाह्य जगतात वावरणारी माणसे, त्यांची भौतिकतेकडे पाहण्याची मानसिकता, परस्परांना छेद देणारे स्वभाव यांचीही वर्णने चपखलपणे यात आलेली आहेत.

'मित्रमैत्रिणी सारी पाखरं फांदीवरून उडावी तितक्या सहजपणे उडून गेली.'

'मनुष्याची योग्यता त्याच्या पूर्व आयुष्यावरून ठरत नसते, तर ती ठरत असते त्याच्या मनाच्या खरेपणावर आणि आयुष्य आकाराला येत असतं मेहनत घेण्याच्या तयारीवर.'

यासारखी वाक्ये सहजपणे कथानकाच्या धाग्याची पकड घट्ट करीत जातात.

या कादंबरीच्या मुखपृष्ठावर तिरंग्याचे ठळकपण अधोरेखित केलेले असून त्याचे एक बोधचिन्ह वाटावे असा साकारलेला सशस्त्र सैनिक. त्याच्या पावलांकडे लागलेले त्या सैनिकाचे भाग्यलेणे ल्यालेले आश्वासक नयन आणि कादंबरीचे अंतरंग उलगडून सांगणारे एक इंग्रजीतले वाक्य,' इन्स्पिरेशन फ्रॉम द रीअल हिरोज.' ते साकारले आहे, भाग्यश्री फाउंडेशनने, ज्याची स्थापना स्वतः लेखिकेने पती डॉ. जितेंद्र यांच्या मदतीने केलेली आहे. शक्ती, चातुर्य, शिक्षण व सहकार्य या चतुःसूत्रीवर या फाउडेशनची उभारणी आहे. सदर कादंबरीची जडणघडण ही त्याच सूत्राला अनुसरूनच झालेली दिसून येते. 'सोल्जर इन मी' ही लेखिकेची दुसरी कादंबरी आहे. पहिल्या कादंबरीचे नाव आहे, 'सत्यमेव जयते.' या दोन्ही नावांतील ठळकपणा लक्षात घेता लेखिकेची भूमिका अधोरेखित होते. आणि डॉ. नागनाथ कोतापल्ले यांनी हेच तर म्हटले आहे, 'लेखकाने लेखन करताना निश्चित अशी भूमिका घेतली पाहिजे.'

**● मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

**॥ग्रंथाली॥**

## संकल्पनाकोशला मिळालेले पुरस्कार

- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
  ना.गो. कालेलकर पुरस्कार २०११
  *संकल्पनाकोश खंड १*
- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
  नरहर कुरुंदकर पुरस्कार २०१३
  *संकल्पनाकोश खंड २ ते ५*
- मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई
  केशव भिकाजी ढवळे २०१३
  *संकल्पनाकोश खंड १ ते ५*
- सार्वजनिक वाचनालय, नाशिक
  डॉ. वि.म. गोगटे पुरस्कार २०१३-१४
  *संकल्पनाकोश खंड २ ते ५*

मूळ किंमत ३२०० रुपये     सवलतीत २४०० रु.
टपालखर्च २०० रु.

## इंग्रजी थिसॉरसच्या धर्तीवर प्रथमच...

**सुरेश वाघे**

लिखित

**संकल्पनाकोश**

**खंड १ ते ५**














**बऱ्याच काळानंतर... नवी आवृत्ती...**




वाघ-वन्य प्राणी-निसर्ग यांकडे पाहाण्याचा मुठभर सुशिक्षितांचा दृष्टिकोन गेल्या काही वर्षांत बदलत आहे. पण त्यामुळे वाघ किंवा त्याचे शेजारी-आदिवासी-यांचे प्रश्न सुटत नाहीत. कारण या प्रश्नांच्या मुळाशी आहे माणसाने निर्माण केलेली आणि अवाढव्य, राक्षसी बनत गेलेली आजची उत्पादन व्यवस्था...

**मूळ किंमत २५० रु. • सवलतीत १५० रु.**

**शुक्रवार, १३ जून २०१४ रोजी**
**दादर-माटुंगा कल्चरल सेंटर येथे सायं. ६.३० वा.**
**प्रकाशन होत आहे.**




या पुस्तकातील लेख सर्वसामान्य माणसांच्या मनातील वेगवेगळ्या विचारांना प्रकट करणारे आहेत. ज्यांना विचार महत्त्वाचे वाटतात, पण ते नीटसे अभिव्यक्त करता येत नाहीत, त्यांची प्रातिनिधिक कैफियत असे हे लेख आहेत. त्यांतील विचार, उदाहरणं ही प्रत्येक वाचकाला अंतर्मुख व्हायला लावणारी आहेत, काही वेळा धक्का देणारी आहेत.

**मूळ किंमत २५० रु. • सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

चकाकणारे सारे सोनेच असते असे नाही, कधी कधी ते सापाचे डोळेही असू शकतात. अशी म्हण इलेक्ट्रॉनिक दृश्य प्रसारमाध्यमाच्या बाबतही लागू करायला हरकत नसावी. सत्याच्या नावाखाली जगाचा चेहरा फाडून दाखविणारे हे माध्यम. लोकशाहीचा चौथा स्तंभ. प्रचंड ताकदीचे अनभिषिक्त सिंहासनधारी पहारेदार. याचा चेहरा मात्र प्रत्यक्षात मुखवटा घातलेला असतो, शुद्धतेचा आक्रोश करणारे अंतरंग गढूळही असते, याचा प्रत्यय देणारी कांदबरी नुकतीच 'ग्रंथाली'ने प्रकाशित केली आहे. तिचे नाव आहे 'चॅनल 4 लाईव्ह'. लेखक आहेत समीरण वाळवेकर. दूरदर्शनच्या अनेक वाहिन्यांवर विविध कार्यक्रमांतून वाळवेकरांना आपण अनेक वर्षे पाहत आलो आहोत. त्यांचा नादमधूर आवाज आपल्या कानात अजूनही निनादतो आहे. मात्र त्यांच्या धारदार लेखणीतून उतरलेली कहाणी मनाला सून्न करणारी आहे. वरवर कल्पित वाटणारी परंतु वास्तवाला भिडणारी कादंबरी म्हणजे 'चॅनल 4 लाईव्ह'. 'सिंहासन', 'मुंबई दिनांक' या अरुण साधूंच्या कादंबऱ्यांची आठवण ताजी व्हावी अशी कादंबरी.

चॅनल 4 लाईव्ह
समीरण वाळवेकर




ही कहाणी गुंफलेली आहे चॅनल फोरचा प्रसिद्ध पत्रकार सलील देसाई आणि त्याच्यासोबत अँकर, प्रोड्युसर म्हणून काम करणारी रावी यांच्या प्रेमसंबंधाच्या कोषाभोवती. आघाडीवर राहून पहिली बातमी आपल्या चॅनलवर झळकवण्यासाठी सलीलची धडपड आणि जिद्द. त्यासाठी मुख्यमंत्री, विरोधीपक्ष नेता आणि इतर राजकारण्यांशी चातुर्याने जोडलेले संबंध. त्याच्या जोरावर मिळविलेली हुकमी यशाच्या पावती. परंतु एका निर्णायक टप्प्यावर स्वतःच्या स्वार्थासाठी त्याने त्याच्यावर जीव ओवाळून टाकणाऱ्या रावीची केलेली फसवणूक. वरवर ढोबळमानाचे वाटावे असे मात्र हे वास्तव नाही. बुद्धिबळाच्या पटावर असावेत असे अनेक प्यादे, घोडा, हत्ती, उंट व वजीर येथे आपापली चाल खेळताना दिसतात. चॅनलला स्पर्धेत अग्रेसर ठेवण्यासाठी वाटेल ती किंमत मोजायची तयारी असलेला चॅनलचा आग्रही मालक कन्हैयालाल मोदी आहे. चॅनलरूममध्ये वेळेशी स्पर्धा करणारे आणि आपसात एकमेकावर कुरघोडी करणारे न्यूज एडिटर चंकी, एक्झिक्युटिव्ह प्रोड्युसर मिताली, प्रोड्युसर नताशा, कॅमेरामन संदीप यांसारखे सहकारी आहेत. तर दुसऱ्या बाजूला राजकारण. प्रसारमाध्यमाच्या फ्लोअरसाठी सर्वात जवळचा आखाडा. प्रसार माध्यमाला हाताशी धरणारे आणि माध्यमाच्या आहारी गेलेले राजकारणी. यात आघाडीवर आहेत मुख्यमंत्री, मदन पाटील. आपल्या इशाऱ्यावर प्रत्येकाला नाचवू पाहणारे, खुर्चीशी स्पर्धा करणाऱ्या मंत्र्यांना चूप करण्याचे राजकारण खेळणारे मुख्यमंत्री. दुसरी महत्त्वाची जबाबदार राजकारणी म्हणजे विरोधी पक्षनेते दादा सामंत, गडगंज संपत्ती असलेले. अलीकडे तयार झालेली प्रतिमा जपणारे सामाजिक कार्यकर्ते तात्या, आणि त्यांच्या जोडीला आलेले डी.के. जैन. मंत्रालय आणि राजकारणी यांच्यात सहज वावर असणारा, हिकमतीने प्रत्येकाला आपला वाटावा असा धनंजय. महसूलमंत्री आणि अर्थमंत्री, या सगळ्यांची राजकारणे व त्यापायी टोकाला जाण्याची भूमिका ही या कादंबरीची दुसरी बाजू. आणि दहा टक्क्यांमधून घर दिले नाही याचा खुन्नस म्हणून मुख्यमंत्र्याच्या खुर्चीलाच सुरुंग लावणारा महसूलखात्याचा सतीश परब. ही सगळी मंडळी कादंबरीच्या पटावर इतक्या बेमालूमपणे आपापली चाल खेळताना दिसतात, की बुद्धिबळाचा पट अपुरा वाटावा. प्रत्येकाची चाल ही स्वार्थ, मतलब, हुकूमत, अस्तित्व यांसाठीची जणू लढाईच. या सगळ्यांचे वागणे, बोलणे आणि त्याप्रमाणे कृती करणे, सारेच थक्क करणारे आहे. त्यांच्याकडे पाहताना ही पात्रे काल्पनिक वाटत नाहीत. दोन स्तरांवरील वावरणारी म्हणून वेगळी पण प्रत्यक्ष एकाच नाण्याच्या दोन बाजू वाटाव्यात इतकी अस्सल, जिवंत व्यक्तिमत्त्वे आपल्यासमोर साकारलेली दिसतात.

माध्यमाच्या निमित्ताने न्यूज बुलेटिन, न्यूजरूम, ब्रेकिंग न्यूज, फ्लोअर, रेकॉर्डिंग, अँकर, ओबी व्हॅन, सॅटेलाईट सिग्नल, फ्रिक्वेन्सी अपलिंक, डाऊन लिंक, पॅनल, कांऊट डाऊन असे शब्द सहजपणे आलेले आहेत. तर त्याचवेळी सरावाचा भाग वाटावी अशी माध्यमात वापरली जाणारी आणि राजकारण्यांना अपरिचित नसलेली भाषा सराईतपणे संवादाच्या रूपात वाचकाच्या भेटीला येते. वातावरणाचा गडदपणा अधिक गडद होत जातो. वास्तवाच्या रूपाने 'बोल्ड' तरी अपरिहार्य वाटावी अशी, रांगडेपणाला जवळची वाटावी अशी भाषा. तरी ती अनाठायी वाटत नाही. लेखकाने ओढूनताणून तिला कोंबण्याचा प्रयत्न केला आहे असे वाटत नाही. राजकारणातला रांगडेपणा आणि रंगेलपणा, तसा माध्यमात पसरलेला उथळपणा, ही त्या त्या ठिकाणची जीवनशैली लेखकाने जवळून पाहिली आहे, अनुभवली आहे याचाही प्रत्यय हे लेखन वाचत असताना येतो. काही ठिकाणी तर आपल्या भाबड्या समजुतींना धक्काही बसतो. सारे विश्व घराघरात पोहोचविणाऱ्या माध्यमाचे कुतूहल प्रत्येकालाच आहे. हे अंतर्गत विश्व वाचल्यानंतर ते नक्की शमेल असा विश्वास ही कादंबरी देते. लेखकाने कुठेही कादंबरीचा प्रवाहीपणा खंडीत होणार नाही याची काळजी घेतलेली आहे. आपण वाचन करीत असताना एखादा बोलपट पाहत आहोत तशी प्रसंगांची गुंफण केलेली आहे. प्रकरणांना क्रमांक दिलेले आहेत. या कादंबरीवर प्रत्यक्षात बोलपट काढावयाचा ठरविल्यास संवाद आणि पटकथा वेगळे लिहिण्याची गरज भासणार नाही.

खुर्ची आणि माणूस हे मुखपृष्ठावरील चंद्रमोहन कुलकर्णी यांचे चित्र विषयाच्या शीर्षकाला साजेसे झाले आहे. मान कलम झाली तरी चालेल पण खुर्ची सोडणार नाही! चॅनलची वेळ, तत्परता आणि अग्रक्रम हेच महत्त्वाचे आहे, त्यासाठी तुम्हाला स्वतःला मोडून त्या फ्रेममध्ये बसविले पाहिजे असेच यातून स्पष्ट होते.

● **मूल्य ४०० रु. सवलतीत २४० रु.**

||ग्रंथाली||

# ग्रंथपान

## Netक्या कविता

मिलिंद लांजेवार




संगणकाचे युग सुरू झाले तेव्हा आपण कुठे पोहोचणार आहोत याचा काही आपल्याला पत्ता नव्हता. परंतु संगणकाने विळखा घातला, जग मुठ्ठीमें आले, आणि भान आले, आता आपण आपले राहिलेलो नाही. मुक्त छंदाने पारंपरिक छंद-वृत्तातील कवितेला आपल्या साच्यात बसविले, तेव्हाही असेच वाटत होते, हे कितीसे चालणार? परंतु अंदाज खोटे ठरले. तिचाच दबदबा पुढे निर्माण झाला. दिवसेंदिवस तिच्यात बदल होत आहेत. नवनवी परिमाणे लाभत आहेत. शब्दांची कळा बदलत आहे. मराठीच्या अंगणात बहूभाषा खेळायला आल्या. आणि आता तर त्या इथंच नादावलेल्या दिसू लागल्या. बदलत्या युगाची चाहूल आणि कवितेची बदलती रूपे एकमेकांच्या सोबतीने पावले टाकू लागली आहेत. या नव्या प्रारंभाचे स्वागत करणारा एक कवितासंग्रह 'ग्रंथाली'ने प्रकाशित केला आहे. त्याचे नाव आहे 'नेटक्या कविता.' यातला नेट हा शब्द इंटरनेटचे प्रतिनिधित्व करतो आहे. थोडक्यात या नेटच्या जगातल्या कविता आहेत असे म्हणायला हरकत नसावी. त्याचे कवी आहेत मिलिंद लांजेवार.

कवी हा कवी असतो. तरीही तो माणूस असतो. माणूस म्हणून जगताना तो सभोवताल आपल्यासोबत घेऊन चालत असतो. नव्हे, सभोवतालचे वास्तव त्याला आपल्या कवेत वागवत असते. त्याच्याशी एकरूप झालेले असते. याचा प्रत्यय लांजेवारांच्या कवितांमधून येतो. 'मी हळहळत राहिलो' या २६/११ च्या हल्ल्यावरील कवितेत कवी म्हणतात,

*किडलेल्या राजकारण्यांना ब्लॉगवर शिव्या हासडल्या*
*'मुंबई कुछ कर' हा एसएमएस सर्वांना फॉरवर्ड केला*

तर 'टेररिस्ट' या कवितेत आश्वासक बळ देतात,

*टिफीन बॉक्स उघडा करून दाखवत ते पुटपुटले*
*साब दाढी बढानेवाला हर आदमी टेररिस्ट नहीं होता*

पावसाला टाळून कुठलाच कवि पुढे जाऊ शकत नाही. लांजेवारही त्याला अपवाद नाहीत. पावसाविषयीच्या अनेक कविता या संग्रहात आहेत. त्याचे ते वर्णन करतात,

१) *मी माझा आयडी विसरलो नाही*
*तुझाच हिरवा पासवर्ड डिलीट होत चालला.*

२) *म्हणून तर तू इएमआयसारखा*
*इन्स्टॉलमेंटमध्ये पडत आहेस*

कवीचे हळवे मन इतरांच्या दुःखाकडे पाहताना अंतर्मुख होते. स्त्रीच्या मनाचा शोध घेताना ते स्वःतच्या मनाला 'मनात राम आहे?' या कवितेतून विचारतात,

*पण कागदावर असते माझीच सही*
*हे घर तिचे की हा आसराच आहे?*

कवी संगणकीय युगात वावरत आहे. बोलण्यात, व्यवहारात, संगणक-नेटशी संबंधित शब्दांचा वापर अपरिहार्य आहे. त्याचा प्रत्यय अनेक कवितांमधून येतो. हे इंग्रजी शब्द आता आपलेच वाटू लागले आहेत. परंतु 'मराठी soup song' ही संपूर्ण कविता जवळपास इंग्रजीतून आहे. तशाच काही कवितांमधून हिंदी ओळी आल्या आहेत. परंतु 'जिंदगी इस तरह गुजारते रहे' ही कविता पूर्णपणे हिंदीतून उतरली आहे.

गुलजार या हिंदी कवीच्या 'त्रिवेणी' या काव्यप्रकाराला समोर ठेवून लांजेवार यांनी लिहिलेल्या काही कविता या संग्रहात आहेत. शिरीष पै यांच्याप्रमाणे काही हायकू सादर केलेले आहेत. चंद्रशेखर गोखले यांच्या चारोळ्यांप्रमाणे काही चार ओळींच्या कविता आहेत. तर काही कोलाजच्या कविता. काही गझल आहेत, त्या अलिकडच्या ए.के. शेख, चंद्रशेखर सानेकर यांची आठवण जागी करतात. काही कविता गद्यमय पद्धतीने आपला कथाभाव दाखवत उलगडत जातात. असा हा बहुपेडी कवितासंग्रह आहे. मुखपृष्ठावर नेटचे चिन्ह दाखवून आशय आणि शीर्षक यांच्याशी सहभाव व्यक्त केला आहे. काव्यप्रांतात या नव्या प्रणालीचे स्वागत करायला हवे.

**• मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**

ग्रंथाली
द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग,
माटुंगा (प.), मुंबई-४०००१६ दूरध्वनी : २४३०६६२४/२४२१६०५०
● granthali01@gmail.com, granthali02@gmail.com ● वेळ : सकाळी ११ ते ६

# दोन ग्रंथसंच योजना सूची

**सोबतच्या यादीतील सुटी पुस्तके हवी असल्यास ४०% सवलतीत मिळतील.**
**चेक/डी.डी./म.ऑ. 'ग्रंथाली' नावे पाठवावा.**

## १९७ पुसतके संच क्रमांक १ मूळ किंमत २८१५५ सवलतीत संचाची किंमत १३००० रु.

१. **खेळ साडेतीन टक्क्यांचा**
लक्ष्मण माने ● १६० रु.
२. **राजकीय पक्षनिष्ठा मानसिक-बौद्धिक गुलामी**
दि. म. संत ● ८० रु.
३. **अंधश्रद्धा निर्मूलन-प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम**
संदीप जावळे ● १२० रु.
४. **प्रर्वतन**
संदीप जावळे ● १२० रु.
५. **विचारवेध**
डॉ. विजय/जयश्री जोशी ● १८० रु.
६. **विचारवेध : भाग ३**
डॉ. विजय/जयश्री जोशी ● २५० रु.
७. **अर्वाचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान-अनुभववाद**
दि.य. देशपांडे ● २०० रु.
८. **अर्वाचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान प्रज्ञावाद**
दि.य. देशपांडे ● १८० रु.
९. **अर्वाचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान-कांट**
दि.य. देशपांडे ● १२० रु.
१०. **विवेकवाद**
दि.य. देशपांडे ● १०० रु.
११. **रिल्केची दहा पत्रे**
अनिल कुसुरकर ● १०० रु.
१२. **मी हिंदू झालो!**
डॉ. रविन थत्ते ● १०० रु.
१३. **विज्ञानाचे तत्त्वज्ञान**
संपादक : शरद देशपांडे, प्रदीप गोखले, सदानंद मोरे ● ३०० रु.
१४. **नेगल - (भाग १)**
विलास मनोहर ● १२० रु.
१५. **नेगल -(भाग २) हेलकशाचे सांगाती**
विलास मनोहर ● १२० रु.
१६. **एक पूर्ण-अपूर्ण**
नीला सत्यनारायण ● १२५ रु.
१७. **सत्तरीचे बोल...**
डॉ. पी. एस. रामाणी ● १०० रु.
१८. **पथदर्शी**
भारत गजेंद्रगडकर ● १०० रु.
१९. **जे देखिले...**
भारत गजेंद्रगडकर ● १०० रु.
२०. **एक दिवस (जी)वनातला**
नीला सत्यनाराण ● २०० रु.
२१. **ध्यास आणि प्रवास**
सुलभा वर्दे ● २०० रु.
२२. **माझ्या वकिलीची पन्नासी**
एस.आर. चिटणीस ● १६० रु.
२३. **आमचा बान आन् आम्ही - स्वरूप आणि समीक्षा**
संपा. शैलेश त्रिभुवन ● ४०० रु.
२४. **झपाटलेली झाडे**
सरोज जोशी ● २५० रु.
२५. **चिं.त्र्यं. खानोलकर**
(ललित चरित्र)
दीपक घारे ● १८० रु.
२६. **व्हिन्सेंट व्हॅन गॉच्या आठवणी**
अनिल कुसुरकर ● १२५ रु.
२७. **गुन्हेगारांच्या मागावर**
यशवंत व्हटकर ● १५० रु.
२८. **सद्रक्षणाय खलनिग्रहणाय**
यशवंत व्हटकर ● २५० रु.
२९. **नृत्यसौदामिनी दमयंती जोशी**
प्रा. सुहासिनी पटवर्धन ● १०० रु.
३०. **पालावरचं जग**
लक्ष्मण माने ● १४० रु.
३१. **बंद दरवाजा**
लक्ष्मण माने ● १८० रु.
३२. **उद्ध्वस्त**
लक्ष्मण माने ● १०० रु.
३३. **भटक्याचं भारूड**
लक्ष्मण माने ● १५० रु.
३४. **नियतीशी करार**
संदीप जावळे ● ३०० रु.
३५. **घटना नारायणपूरची**
शशी देशपांडे, अनु. मोहिनी दातार ● १०० रु.
३६. **हॅरिसबाई**
कृ.ना. कुडाळकर ● १२० रु.
३७. **स्वदेश**
भूषण केळकर ● १६० रु.
३८. **टकिला टकाटक**
भूषण केळकर ● ३०० रु.
३९. **संघर्ष नागरी निवाऱ्याचा**
संपा. जयंत धर्माधिकारी, अमरेंद्र धनेशर ● १२५ रु.
४०. **विकासाची रूपरेषा-परिसंवादांच्या अनुभवातून**
सु.गो.तपस्वी ● ३०० रु.
४१. **क्षितिजावरील शलाका**
शारदा साठे ● २०० रु.
४२. **मुलगी झाली हो...**
ज्योति म्हापसेकर ● ६० रु.
४३. **ही आपलीच माणसं**
मंगला खाडिलकर, गजानन सबनीस ● २५० रु.
४४. **कोहम् धाबा**
अनुवाद
संजीव दहिवदकर ● १०० रु.
४५. **पैलूंविना हिरकणी**
सुधा सोनाळकर ● ८० रु.
४६. **जग जनुकांचे**
डॉ. हेमा पुरंदरे ● १०० रु.

४७. **वृद्धत्वाची शान**
पद्माकर नागपूरकर ● १२५ रु.
४८. **मनातलं काहीसं**
सुधा सोमण ● १२० रु.
४९. **पानीकम**
संजय पवार ● १०० रु.
५०. **वारस होऊ अभिमन्यूचे**
अनुराधा गोरे ● ३०० रु.
५१. **न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा**
(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सहकार्याने) ● ४०० रु.
५२. **सोन्याच्या धुराचे ठसके**
डॉ. उज्ज्वला दळवी ● २७५ रु.
५३. **सौदीच्या अंतरंगात**
पद्मा कऱ्हाडे ● २०० रु.
५४. **मौन होई बोलके**
रोहिणी लिमये ● २०० रु.
५५. **गांगल ७० ग्रंथाली ३५**
संपादन सुदेश हिंगलासपूरकर ● ३०० रु.
५६. **संकल्प**
संपादन संजीव खांडेकर ● ३०० रु.
५७. **भिडू**
भगवान इंगळे ● २५० रु.
५८. **पंखाविना भरारी**
प्रसादची आई (शरयू घाडी) ● २०० रु.
५९. **स्वास्थ्यवृत्त**
डॉ. शरदिनी डहाणूकर ● १०० रु.
६०. **कानोसा**
डॉ. राणी बंग ● २५० रु.
६१. **आयुर्वेदातील स्त्रीविज्ञान**
शुभदा वेलणकर ● ४०० रु.
६२. **अंगणातले आभाळ**
यशवंत पाठक ● ३०० रु.
६३. **आभाळ माझं**
विमल कुलकर्णी ● १०० रु.
६४. **गोष्ट झऱ्याची**
सुधा वर्दे ● १५० रु.
६५. **कोल्हाट्याचं पोर**
किशोर शांताबाई काळे ● १०० रु.
६६. **आमचा बाप आन् आम्ही**
(१६१ आवृत्ती)
नरेंद्र जाधव ● १२० रु.
६७. **बलुतं**
दया पवार ● १०० रु.
६८. **उपरा**
लक्ष्मण माने ● १०० रु.
६९. **आयदान**
उर्मिला पवार ● २२० रु.
७०. **हृदयस्थ**
डॉ. अलका मांडके ● २५० रु.
७१. **ताठ कणा**
डॉ. पी.एस. रामाणी ● २५० रु.
७२. **मैत्र जीवाचे**
विदुर महाजन ● २०० रु.
७३. **पाचट**
योगीराज बागूल ● २५० रु.
७४. **जगायचंय प्रत्येक सेकंद**
मंगला केवळे ● ८० रु.
७५. **वन फॉर सॉरो**
अनुराधा कुलकर्णी ● १२५ रु.
७६. **उदई**
प्रकाश चव्हाण ● १६० रु.
७७. **जय हो**
कमल देसाई ● ३०० रु.
७८. **क्लोरोफॉर्म**
डॉ. अरुण लिमये ● २०० रु.
७९. **असुरेंद्र**
ना.बा. रणसिंग ● ४०० रु.
८०. **फोडणी**
रामदास फुटाणे ● १०० रु.
८१. **एका शहराच्या खुंटीवर**
चंद्रशेखर सानेकर ● ७५ रु.
८२. **पाऊस**
अरुण शेवते ● ६० रु.
८३. **शोधवर्तन**
नरेंद्र बोडके ● ८० रु.
८४. **बावनकशी**
हॅमेलिआ ● ६० रु.
८५. **सफिया बेगम**
अरुण शेवते ● १०० रु.
८६. **सत्ता**
चंद्रशेखर भुयार ● ७५ रु.
८७. **एका ऊन्हाची कैफियत**
चंद्रशेखर सानेकर ● ६० रु.
८८. **कॉमन मॅन**
हेरंब कुलकर्णी ● ८० रु.
८९. **स्वत:तील अवकाश**
ज्ञानेशर मुळे ● १२५ रु.
९०. **निरंतर**
उषा मेहता ● २०० रु.
९१. **संशयास्पद टिपणे आणि इतर कविता**
संजीव खांडेकर ● ६० रु.
९२. **चॅनेल : डी–स्टॅ्रयरी**
श्रीधर तिळवे ● १२५ रु.
९३. **काही अनुभव काही आठवणी...**
रणजीत शहा ● ५० रु.
९४. **शांती अवेदना...**
पुष्पाग्रज ● ८० रु.
९५. **बदलत गेलेली सही...**
अंजली कुलकर्णी ● १२० रु.
९६. **उरल्यासुरल्या जगण्याचं रिमिक्स**
गोविंद काजरेकर ● ७५ रु.
९७. **या दशकाचा सातबारा कोराच राहील**
शंकरराव दिघे ● ८० रु.
९८. **आईच्या कविता**
अरुण शेवते ● ७० रु.
९९. **...माझ्या काळाचा अनुवाद**
चंद्रशेखर सानेकर ● ८० रु.
१००. **कवितेच्या कविता**
अरुण शेवते ● ७० रु.
१०१. **वाटेवरच्या कविता**
अशोक नायगावकर ● ५० रु.
१०२. **सैतानाची खुशी**
राकेश भडंग ● ८० रु.
१०३. **बाईच्या कविता**
किरण येले ● ८० रु.
१०४. **प्रत्ययपर्व**
मनोहर जाधव ● ७० रु.
१०५. **सुगंध उरले, सुगंध उरले**
अरुणा ढेरे ● १६० रु.
१०६. **गारुड गझलचे**
सदानंद डबीर ● १२० रु.
१०७. **अन्वय**
उषा मेहता ● १०० रु.
१०८. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने–२००५**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
१०९. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने–२००८**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
११०. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने–२००९**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
१११. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने–२०१०**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
११२. **उर्मिला**
डॉ. वसंत वऱ्हाडपांडे ● १०० रु.
११३. **धमधोकार**
प्रकाश पेठे ● १२० रु.
११४. **हाक/प्रतिसाद**
निदा फाजली,
अनुवाद–इब्राहीम अफगाण ● २०० रु.
११५. **काचेपाठचा समुद्र**
स्मिता भागवत ● १६० रु.
११६. **निशाणी – डावा अंगठा**
रमेश इंगळे–उत्रादकर ● ३०० रु.

११७. **रानभूल**
प्रल्हाद जाधव ● १२५ रु.
११८. **विवेकीजनीं ह्या मज जागविलें**
प्र.ब. कुळकर्णी ● २०० रु.
११९. **सिंहासन**
अरुण साधू ● २५० रु.
१२०. **मोरपिस**
अनुराधा गानू ● १६० रु.
१२१. **प्रकाशवाट**
वंदना करंबेळकर ● १२५ रु.
१२२. **संचिताची कोजागिरी**
यशवंत पाठक ● ३०० रु.
१२३. **लोकोत्तर गाडगेबाबा : जीवन आणि कार्य**
प्रा. द.ता. भोसले ● ३०० रु.
१२४. **विज्ञान विशारदा**
वसुमती धुरू ● १२५ रु.
१२५. **भारतातील स्टेनलेस स्टील संस्कृतीचे जनक**
संकलन-संपादन
शरयू ठाकूर, दिनकर गांगल ● २५० रु.
१२६. **महारूद्र** (आंतरराष्ट्रीय फूटबॉलमधला मराठमोळा झंझावात!)
जी.बी. देशमुख ● १२० रु.
१२७. **गांधी**
नलिनी पंडित ● २०० रु.
१२८. **लालबाग**
आदिनाथ हरवंदे ● ४०० रु.
१२९. **विज्ञानशिक्षण – नव्या वाटा**
डॉ. हेमचंद्र प्रधान ● १६० रु.
१३०. **का कराचं शिकून?**
लक्ष्मण माने ● ५० रु.
१३१. **शिक्षण : आनंदक्षण**
रमेश पानसे ● २०० रु.
१३२. **शिक्षणातील लावण्य**
लीला पाटील ● १०० रु.
१३३. **बालकहक्क**
लीला पाटील ● २२५ रु.
१३४. **शाळा आहे शिक्षण नाही**
हेरंब कुलकर्णी ● १०० रु.
१३५. **सुरवंटाचे फुलपाखरू**
डॉ. लक्ष्मण नारायण गोडबोले ● १२० रु.
१३६. **कळी उमलताना**
अनुराधा गोरे ● २०० रु.
१३७. **आजीच्या गोष्टी (भाग १)**
कै. सीताबाई दातार ● ६० रु.
१३८. **आजीच्या गोष्टी (भाग २)**
कै. सीताबाई दातार ● ६० रु.
१३९. **टेलिफोन ते मोबाईल**
चिन्मय थत्ते ● ६० रु.
१४०. **गोईण**
राणी बंग ● १६० रु.
१४१. **शीळ**
सरोज जोशी ● १५० रु.
१४२. **वाहतूक ठप्प**
अशोक दातार ● १२० रु.
१४३. **हत्या**
राकेश भडंग ● ३५० रु.
१४४. **संत तुकोबाची रोजनिशी**
रवींद्र पाटील ● ४०० रु.
१४५. **आभरान**
पार्थ पोळके ● २०० रु.
१४६. **असाही एक महाराष्ट्र**
संदेश भंडारे ● ३५० रु.
१४७. **आरोग्याचा अर्थ**
डॉ. आनंद नाडकर्णी ● २०० रु.
१४८. **धुंद-स्वच्छंद**
वसंत वसंत लिमये ● ६० रु.
१४९. **ध्येयनिष्ठ कर्मयोगी**
अरविंद पोतनीस ● २५० रु.
१५०. **जगप्रसिद्ध पुलांच्या कहाण्या**
सुधीर शं. कुलकर्णी ● १५० रु.
१५१. **मनोहारी**
विठ्ठल देशपांडे ● १२५ रु.
१५२. **आठवणीतले बाबासाहेब**
योगीराज बागूल ● ३०० रु.
१५३. **चंदनाची पाखर**
यशवंत पाठक ● २०० रु.
१५४. **आभाळाचे अनुष्ठान**
यशवंत पाठक ● २०० रु.
१५५. **येणे बोधे आम्हा**
यशवंत पाठक ● २०० रु.
१५६. **खेळ मांडला**
विभावरी दांडेकर ● १५० रु.
१५७. **देवांसि जीवे मारिले**
लक्ष्मण लोंढे
चिंतामणी देशमुख ● २०० रु.

## ग्रंथाली-ज्ञानयज्ञ पुस्तके

१५८. **पहिला भारतीय वैमानिक**
रत्नाकर वाशीकर,
आ.रा. मराठे ● ४५ रु.
१५९. **सदानंद!**
डॉ. सुरेश नाडकर्णी ● ५० रु.
१६०. **आजची समाजरचना, तिचे स्वरूप व पुनर्बांधणी**
भवरलाल जैन ● ४५ रु.
१६१. **परराष्ट्रधोरण : भारत व जागतिक संबंध**
ना.य. डोळे ● ४५ रु.
१६२. **परराष्ट्रधोरण : आपले शेजारी**
ना.य. डोळे ● ४५ रु.
१६३. **सागर-महासागर**
शैलजा सांगळे ● ४५ रु.
१६४. **लहरी हवामान**
डॉ. कुमार कुलकर्णी ● ४५ रु.
१६५. **वेळंब**
डॉ. कमलाकर देवधर ● ४५ रु.
१६६. **पिंपरी-चिंचवड : जुनं-नवं**
मीरा जोशी ● ४५ रु.
१६७. **संख्यादर्शन**
स. पां. देशपांडे ● ४५ रु.
१६८. **कांगारूंचे मराठी आप्त**
कमलिनी काटदरे
निरंजन उजगरे ● ४५ रु.
१६९. **फळांचा राजा**
स्मिता देवधर ● ५० रु.
१७०. **एक आटपाट लोकमान्य नगर**
दिलीप काटदरे ● ५० रु.
१७१. **सहनैसर्गिक जीवनशैली**
डॉ. श्याम जोशी ● ५० रु.
१७२. **क्षुधाशांती ते मॅकडोनाल्ड**
सु.गो. तपस्वी ● ५० रु.
१७३. **प्रगती पुलांची**
सुधीर शं. कुलकर्णी ● ५० रु.
१७४. **प्रार्थनाविचार**
माधवी कवी/घनश्याम कवी ● ५० रु.
१७५. **सुशेगाद् गोवा**
नंदिनी महाडेश्वर ● ५० रु.
१७६. **पुस मॉथ ते डॅश-४००**
रत्नाकर महाजन ● ५० रु.
१७७. **एड्स-कथा आणि व्यथा**
डॉ. दीप्ती डोणगावकर ● ५० रु.
१७८. **इस्रायलची मराठी लेकरे**
संध्या जोशी ● ५० रु.
१७९. **आकाशगामी**
रत्नाकर महाजन ● ५० रु.
१८०. **देव जाणिला कुणी?**
प्रेमला काळे ● ५० रु.
१८१. **आधुनिक एकलव्य**
डॉ. सुरेश नाडकर्णी ● ५० रु.
१८२. **स्वीय शेती**
गो. ह. दंडवते ● ५० रु.
१८३. **नेवासे**
संजय बोरुडे ● ५० रु.
१८४. **नाटळ**
मनोहर सावंते ● ५० रु.

१८५. **आधुनिक अर्थशास्त्राचे निर्माते**
यशवंत पंडितराव ● १०० रु.
१८६. **बालकल्याण ते बालहक्क**
माधुरी भिडे ● ५० रु.
१८७. **इराण**
पद्मा कऱ्हाडे/
पुरुषोत्तम कऱ्हाडे ● ५० रु.
१८८. **चांगलं मरण**
डॉ. कमलाकर देवधरे ● ५० रु.
१८९. **वृद्धत्वः देशोदेशी**
पी. के. मुत्तगी/
पद्माकर नागपूरकर ● ५० रु.

१९०. **चित्रसंवाद**
संदीप देवल ● ८० रु.
१९१. **कऱ्हाड**
विजय माळी ● १०० रु.
१९२. **रँग्लरचं ग्लॅमर**
स.पां. देशपांडे ● ४५ रु.
१९३. **मनाचे मनोगत**
साधना कामत ● ५० रु.
१९४. **स्वप्नांची बाग**
डॉ. उषा हरदास ● ८० रु.

## मातृभूमी सेवा ट्रस्ट पुस्तके

१९५. **ओऽ कॅनडा!**
स्मिता भागवत ● १२० रु.
१९६. **स्थानभ्रष्ट**
डॉ. शांतिलाल धनिक,
शब्दांकन : स्मिता भागवत ● ३०० रु.
१९७. **पहिला स्वातंत्र्यसंग्राम आणि तात्या टोपे**
स्मिता भागवत ● ६० रु.

## १६७ पुस्तके संच क्रमांक २ मूळ किंमत ३४,१५० रु. सवलतीत संचाची किंमत १६००० रु.

१. **शांताराम व्यक्ती आणि वाङ्मय**
सुरेखा सबनीस ● २५० रु.
२. **दिवस असे की...**
प्रवीण बर्दापूरकर ● २२५ रु.
३. **नोंदी डायरीनंतरच्या**
प्रवीण बर्दापूरकर ● २०० रु.
४. **टिळक ते गांधी मार्गेखाडिलकर**
मुकुंद वझे ● १२० रु.
५. **मराठी भाषेतीलअसभ्य म्हणी आणि वाक्प्रचार**
अ.द. मराठे ● २५० रु.
६. **अहिराणी लोकपरंपरा**
डॉ. सुधीर देवरे ● १५० रु.
७. **आठवणींची साठवण**
डॉ. सुरेश नाडकर्णी ● १८० रु.
८. **माझ्या मनाचा मुरांबा**
वसुमती धुरू ● २७५ रु.
९. **संवादने**
विद्या हर्डीकर-सप्रे ● १५० रु.
१०. **परक्या भूमीवर घर**
स्मिता भागवत ● १५० रु.
११. **तेजस्विनी**
स्मिता भागवत ● १५० रु.
१२. **मनातल्या वावटळी**
प्रगती कोळगे ● १०० रु.
१३. **आकार**
सदाशिव साठे ● २५० रु.
१४. **तमाशा : विठाबाईच्या आयुष्याचा**
योगीराज बागूल ● २५० रु.

१५. **आचंद्र-सूर्य नांदो**
अनुराधा गोरे ● १६० रु.
१६. **गाऊ त्यांना आरती**
अनुराधा गोरे ● ३०० रु.
१७. **बाळाची चाहूल**
अनुराधा गांगल ● ६० रु.
१८. **भारतीय सृष्टी**
अनुराधा गांगल ● १२० रु.
१९. **संस्कार**
अनुराधा गांगल ● ६० रु.
२०. **रांगोळी**
अनुराधा गांगल ● १८० रु.
२१. **महाराष्ट्राची सुवर्णगाथा**
वसंत देशपांडे ● १८० रु.
२२. **मी विंदा बोलतेय**
जयमाला देसाई ● १२० रु.
२३. **शांबरिका खरोलिक**
श्रीकांत पेटकर ● ६० रु.
२४. **प्रेरक संघर्षाचा अमृतमयी ठेवा**
बाबासाहेब पाटील ● १८० रु.
२५. **आनंदाकार**
प्रकाश पेठे ● १०० रु.
२६. **हवा, पानी और...**
भारत गजेंद्रगडकर ● ७५ रु.
२७. **एका पत्रकाराची दुनिया**
भारत गजेंद्रगडकर ● १५० रु.
२८. **भयशून्य चित्त जेथ...**
अनुवाद व संपादन
डॉ. नरेंद्र जाधव ● ५०० रु.

२९. **आठवणींच्या जगात : जर्मनीतील तीन तपांचा अनुभव**
निरुपमा सोनाळकर ● ३०० रु.
३०. **ईश्वरविरहित जीवन (खंड १)**
शरद बेडेकर ● १८० रु.
३१. **ईश्वरविरहित जीवन (खंड २)**
शरद बेडेकर ● २०० रु.
३२. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने-२०११**
सुधीर-नंदिनी थत्ते ● ८० रु.
३३. **अस्फुट आवाजांचा प्रदेश**
डॉ. जयश्री गोडसे ● १८० रु.
३४. **अजब सहवास**
गो.आ. भट ● १०० रु.
३५. **सव्वाशे बोधकथा**
दिलीप पांढरपट्टे ● १२० रु.
३६. **यशवंतराव चव्हाण : माणूस आणि लेखक**
डॉ. प्रकाश दुकळे ● २५० रु.
३७. **वेचक व्हिएतनामी लोककथा**
प्रभा पुरोहित ● ७५ रु.
३८. **कथा जगप्रसिद्ध पुलांच्या**
सुधीर कुलकर्णी ● ३५० रु.
३९. **विचारवंतांचा विवेकविशेष**
शरद बेडेकर ● १०० रु.
४०. **उंबरठ्यावरचे दिवस**
भाऊ गावंडे ● ५०० रु.
४१. **आठवा चिरंजीव**
डॉ. प्रतिभा मुडगेरीकर ● १५० रु.

४२. **वडोदरा**
प्रकाश पेठे ● ८० रु.
४३. **दीपस्तंभ**
दीपक घारे/रंजन र. जोशी ● ३५० रु.
४४. **आधुनिक युगातील विचारसरणी**
डॉ. विजय/जयश्री जोशी ● १०० रु.
४५. **साहित्य : आस्वाद आणि अनुभव**
डॉ. द.ता. भोसले ● २०० रु.
४६. **मनस्वी**
बाबूराव चंदावार ● ५०० रु.
४७. **झुंज आणि झेप**
गो.मा. वाघमारे (गुरुजी) ● १०० रु.
४८. **एका कवीचे जीवनगाणे वामन कर्डक यांची चरित्रकथा**
बबन लोंढे ● १६० रु.
४९. **आठवणीतील पाऊले**
डॉ. मो.शि. तथा बापुसाहेब रेगे ● ३०० रु.
५०. **अखेर न्याय मिळाला**
नीलिमा कानेटकर ● ३५० रु.
५१. **नाझी नरसंहार**
कुमार नवाथे ● १५० रु.
५२. **डायरी**
प्रवीण बर्दापूरकर ● १८० रु.
५३. **लॉक ग्रिफिन**
वसंत वसंत लिमये ● ५०० रु.
५४. **दि मॅन इन ऑलिव्ह ग्रीन्स**
कर्नल सुधीर नाफडे ● २२५ रु.
५५. **पश्चिम घाट बचाओ मोहीम**
जगदीश गोडबोले ● २०० रु.
५६. **जीवन आणि स्वास्थ्य**
डॉ. प्रेमानंद रामाणी ● ८० रु.
५७. **जेनेटिक्स कशाशी खातात?**
डॉ. उज्ज्वला दळवी ● २५० रु.
५८. **नाही चिरा नाही पणती**
स्मिता भागवत ● २०० रु.
५९. **वानुळा**
साहेबराव चवरे ● १०० रु.
६०. **आत्मा हा भ्रम, परमात्मा हा महाभ्रम, तर मग अध्यात्म ते काय?**
शरद बेडेकर ● १२० रु.
६१. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१२**
सुधीर-नंदिनी थत्ते ● ८० रु.
६२. **पहाटसरी**
यशवंत पाठक ● ३५० रु.
६३. **अंतरीचे धावे**
यशवंत पाठक ● १५० रु.
६४. **वेगळा विदर्भ**
श्रीपाद जोशी ● २०० रु.
६५. **तिचं अवकाश**
नीलिमा कानेटकर ● ३०० रु.
६६. **हुंदके टाळण्यासाठी**
नीलिमा कानेटकर ● २०० रु.
६७. **शोध**
डॉ. बी.जी. शेखर ● १५० रु.
६८. **कालिदास : एका गुराख्याचे महाकाव्य**
मयूर देवल ● १०० रु.
६९. **देश, परदेश आणि मी**
गजानन सबनीस ● २०० रु.
७०. **समाजरंग**
ज्ञान मयूर
अनिता कुलकर्णी ● २५० रु.
७१. **माझा देहूरोड बॉम्बस्फोट खटला, १९४३**
नारायण आठवले ● २२५ रु.
७२. **रंग दे बसंती चोला**
स्मिता भागवत ● २०० रु.
७३. **कथा इन्सुलिनच्या शोधाची**
विजय आजगांवकर ● १५० रु.
७४. **ॲबसर्ड थिएटर**
माणिक कानेड ● १६० रु.
७५. **नगरमंथन**
प्रकाश पेठे ● २०० रु.
७६. **घडत गेलेली गोष्ट**
विजया राजाध्यक्ष ● २२५ रु.
७७. **माझं साहित्यिक खटलं**
ॲड. यशवंत हडप ● २२५ रु.
७८. **दत्तकवेणा**
प्रगती कोळगे ● १५० रु.
७९. **क्षितिज पश्चिमेचे**
विनता कुलकर्णी ● २५० रु.
८०. **यशवंतराव चव्हाण : आठवणी-आख्यायिका**
लक्ष्मण माने ● २५० रु.
८१. **तांडव हरवताना**
रवी परांजपे ● २५० रु.
८२. **लसावि**
डॉ. नरेंद्र जाधव ● ४०० रु.
८३. **सारांश शून्य**
संजय कळमकर ● ३०० रु.
८४. **मनाचे कवडसे**
विश्वास काकडे ● १०० रु.
८५. **१९७१चा रणसंग्राम**
अनुराधा गोरे ● ३५० रु.
८६. **अंतरंग**
विजया राजाध्यक्ष ● १२५ रु.
८७. **ओंजळ काव्यफुलांची**
सुभाषचंद्र मयेकर ● १२५ रु.
८८. **प्रिय आयुष्यास सप्रेम नमस्कार**
संगीता धायगुडे ● ८० रु.
८९. **कवडसे**
महेश केळुस्कर ● ७० रु.
९०. **वर्तुळ पुसून टाकताना...**
शारदा नवले ● ८० रु.
९१. **ओळखीची वाट**
नीला सत्यनारायण ● १५० रु.
९२. **दुःख माझे कोवळे**
प्रतिभा सराफ ● ६० रु.
९३. **मनोमनी**
जयश्री भिसे ● ७५ रु.
९४. **अरूपाचे रूप**
माणिक गुट्टे ● १२५ रु.
९५. **एक अजब कोलाहल**
चंद्रशेखर सानेकर ● ८० रु.
९६. **काळिजगुंफा**
सदानंद डबीर ● ७५ रु.
९७. **कवितेची वही**
सलोनी धुरी ● ८० रु.
९८. **फुलवेडी**
अरुण शेवते ● ६० रु.
९९. **शब्द तर कुली आहेत**
राजेंद्र काटदरे ● १०० रु.
१००. **तृष्णाकाठ**
वैभव देशमुख ● १०० रु.
१०१. **रवींद्रनाथ टागोर : युगनिर्माता विश्वमानव**
डॉ. नरेंद्र जाधव ● ४०० रु.
१०२. **रवींद्रनाथ टागोर : समग्र साहित्यदर्शन**
डॉ. नरेंद्र जाधव ● ३०० रु.
१०३. **बोल महामानवाचे भाग १**
डॉ. नरेंद्र जाधव ● २५० रु.
१०४. **बोल महामानवाचे भाग २**
डॉ. नरेंद्र जाधव ● ६०० रु.
१०५. **बोल महामानवाचे भाग ३**
डॉ. नरेंद्र जाधव ● ३५० रु.

१०६. **प्रज्ञा महामानवाचे भाग १**
डॉ. नरेंद्र जाधव ● ३५० रु.

१०७. **प्रज्ञा महामानवाचे भाग २**
डॉ. नरेंद्र जाधव ● २०० रु.

१०८. **प्रज्ञा महामानवाचे भाग ३**
डॉ. नरेंद्र जाधव ● २२५ रु.

१०९. **प्रज्ञा महामानवाचे भाग ४**
डॉ. नरेंद्र जाधव ● ७५ रु.

११०. **आंबेडकरी विचारधारा**
बबन लोंढे ● ६०० रु.
सुधाकर गायकवाड

१११. **काळोखगर्भ**
बबन लोंढे ● २५० रु.
सुधाकर गायकवाड

११२. **निर्णायक युद्धानंतर**
बबन लोंढे ● १२५ रु.
सुधाकर गायकवाड

११३. **संकल्पना कोश भाग १**
सुरेश वाघे ● ६०० रु.

११४. **संकल्पना कोश भाग २**
सुरेश वाघे ● ७५० रु.

११५. **संकल्पना कोश भाग ३**
सुरेश वाघे ● ५५० रु.

११६. **संकल्पना कोश भाग ४**
सुरेश वाघे ● ५५० रु.

११७. **संकल्पना कोश भाग ५**
सुरेश वाघे ● ७५० रु.

११८. **जीवनदान**
राजीव जोशी ● १०० रु.

११९. **मी मवाली तुझ्या हवाली**
सुभाषचंद्र मयेकर ● १२० रु.

१२०. **निरन्वय**
नीरजा ● १०० रु.

१२१. **स्त्रीगणेशा**
नीरजा ● १०० रु.

१२२. **बुद्ध परंपरा आणि बोधीवृक्ष**
हेमा साने ● १५० रु.

१२३. **जॅक ऑफ ऑल**
अनुराधा गोरे ● १३० रु.

१२४. **परिक्षेची भीती कशाला?**
अनुराधा गोरे ● २५० रु.

१२५. **ताबंट**
प्रल्हाद जाधव ● १५० रु.

१२६. **जिद्द**
सरोज जोशी ● ८० रु.

१२७. **फिदा स्वत:वर**
सरोज जोशी ● ८० रु.

१२८. **भारतीय बौद्धिक संपदेचा उद्गाता**
**डॉ. रघुनाथ माशेलकर**
अ.पां. देशपांडे ● २२५ रु.

१२९. **जैतापूरचे अणुमंथन**
राजा पटवर्धन ● ३०० रु.

१३०. **हुमान**
संगीता धायगुडे ● ३५० रु.

१३१. **शापित भूमी**
उमेश कदम ● २५० रु.

१३२. **मला समजलेले पाच हिंदू धर्म**
शरद बेडेकर ● १६० रु.

१३३. **सव्वाशे बोधकथा भाग २**
दिलीप पांढरपट्टे ● १५० रु.

१३४. **नोबेलनगरी नवलस्वप्ने २०१३**
सुधीर/नंदिनी थत्ते ● ८० रु.

१३५. **गुलजारांच्या कविता**
रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ
अनुराधा मोहनी ● १२५ रु.

१३६. **स्पर्श हरवलेले**
डॉ. सुलभा कोरे ● १०० रु.

१३७. **पंजाबराव देशमुख**
**जीवनकालपट**
डॉ. रमेश अंधारे ● १२० रु.

१३८. **झोके अमेरिकेतले**
डॉ. अनंत लाभसेटवार ● २५० रु.

१३९. **विकासाचे निष्कर्ष**
सु.गो. तपस्वी ● ३०० रु.

१४०. **संस्कारहीन**
निर्मला डांगे ● १०० रु.

१४१. **ॲबगेल ॲडम्स**
माणिक कानेड ● ८० रु.

१४२. **महाराष्ट्राचा लेखाजोखा**
संकलन : दिलीप चावरे ● १६० रु.

१४३. **संवाद**
डॉ. नीना सावंत ● १०० रु.

१४४. **साकुरा**
पूजा मलुष्टे ● २०० रु.

१४५. **बोलावें ते आम्ही**
श्रीकांत देशमुख ● १८० रु.

**दोन्ही संच**
**एकत्रित घेतल्यास**
**२८००० रुपयांत!**

१४६. **मे आय कम इन**
कु. तन्वी दिनेश डोके ● १२५ रु.

१४७. **बी.एन.**
भारत गजेंद्रगडकर ● १०० रु.

१४८. **ग्रामीण बोलीचा शब्दकोश**
डॉ. द.ता. भोसले ● २०० रु.

१४९. **हाँगकाँग सफारी**
पद्मा कऱ्हाडे ● १२० रु.

१५०. **वैश्विक उपचार**
विपिन मेहता
अनुवाद-विजया बापट
संपादन : अपर्णा वेलणकर ● १८० रु.

१५१. **चॅनेल 4 लाईव्ह**
समीरण वाळवेकर ● ४०० रु.

१५२. **आस्तिकता नास्तिकता**
**दोन्ही अंधश्रद्धा**
दि.म. संत ● १२५ रु.

१५३. **पडघम**
अरुण साधू ● १२५ रु.

१५४. **सोल्जर इन मी**
शिल्पा जितेंद्र खेर ● २५० रु.

१५५. **सत्यकथा**
नीला सत्यनारायण ● १२५ रु.

१५६. **तसा मी.. असा मी**
डॉ. बाळ खरे ● २५० रु.

१५७. **ढोर**
भगवान इंगळे ● ३०० रु.

१५८. **काही तरी सांगायचंय म्हणून**
प्रकाश हरी कार्लेकर ● १२५ रु.

१५९. **नेटक्या कविता**
मिलिंद लांजेवार ● १०० रु.

१६०. **मंदिर-शिल्पे**
डॉ. माया पाटील ● ३०० रु.

१६१. **माझ्या काळजाची गोष्ट**
सुनीता संगवई ● १५० रु.

१६२. **हरित वसईचा लढा**
मार्कुस डाबरे ● १५० रु.

१६३. **सनद**
नारायण सुर्वे ● १०० रु.

१६४. **हृदयसंवाद**
अलका मांडके ● २२५ रु.

१६५. **हृदयबंध**
अलका मांडके ● १६० रु.

१६६. **मुंबई ते काश्मीर**
अरुण वेढीकर ● ४०० रु.

१६७. **एका शिक्षिकेची शिदोरी**
सुधा देसाई ● २५० रु.





ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

वार्षिक वर्गणी १०० रुपये
तीन वर्षासाठी २५० रुपये

आजच्या काळातील सामाजिक–सांस्कृतिक प्रश्नांचा मागोवा घेणारे माहितीपर विचारप्रवर्तक व मनोवेधक मासिक.
चाळीस वर्षांची अखंड परंपरा

द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई–४०००१६
दूरध्वनी : २४३०६६२४/२४२१६०५० granthali01@gmail.com

ग्रं था ली

## भिडू भगवान इंगळे



आयुष्याच्या विविध टप्प्यांवर भेटलेल्या, भयाण आयुष्य जगलेल्या भिडूंची ही जीवनकहाणी.

मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.

## ढोर भगवान इंगळे



ढोर समाजातील एक गट शिकला आणि स्थिर झाला. अशा एका तरुणाची प्रातिनिधिक कहाणी.

मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.

## नेटक्या कविता मिलिंद लांजेवार




इंटरनेट हे माध्यम बहरले आहे. 'नेटक्या कवितांचा एक एल्गारच येऊ घातला आहे आणि त्यातील भरीव शब्द आहे मिलिंद लांजेवार यांचा

मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.

ग्रं था ली

## चॅनल 4 Live

समीरण वाळवेकर




टीव्ही, न्यूज चॅनेल्सचं वेगवान, धावणारं जग या माध्यमांच्या पार्श्वभूमीवर घडणारी, अस्वस्थ करणारी बेधडक कादंबरी...

मूल्य ४०० रु.
सवलतीत २४० रु.

## सोल्जर इन मी

शिल्पा जितेंद्र खेर



ही कादंबरी आजच्या तरुण पिढीमध्ये राष्ट्रप्रेम जागवणारी, जीवनसंघर्षात सफल होण्यासाठी लिहिलेली आधुनिक 'भगवत्‌गीता' आहे.

मूल्य २५० रु.
सवलतीत १५० रु.

## जेनेटिक्स कशाशी खातात?


डॉ. उज्ज्वला दळवी



एकविसाव्या शतकात जनुकशास्त्र अफाट विस्तारलं आहे. या शास्त्राची सोपी तत्त्वं उमजून घेऊन शास्त्रीय जाणीव वाढवणारं सुबोध कथन

मूल्य २५० रु.
सवलतीत १५० रु.

RNI No. MAHMAR/2013/50137
Postal Registration No. MCW/310/2013-2015
Published on 10th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.




'पुणे नगर वाचन मंदिर' या प्रतिष्ठित संस्थेने चित्रकार रवी परांजपे यांच्या 'तांडव हरवताना' या 'ग्रंथाली' प्रकाशित वैचारिक आत्मकथनास 'कै. श्री. ना. बनहट्टी पुरस्कार' देऊन गौरवले. त्यावेळी पुरस्कार समारंभाचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर बर्वे, चित्रकार रवी परांजपे आणि पुणे नगर वाचन मंदिर या संस्थेचे अध्यक्ष प्रा. माधव सोमण



'ग्रंथाली' प्रकाशित 'हमान' या आत्मकथनाच्या लेखिका संगीता उत्तम धायगुडे यांना २१ मे २०१४ रोजी, पंढरपूर येथे विजय कुवळेकर यांच्या हस्ते 'द.ता. भोसले साहित्य सेवा पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. त्याप्रसंगी डॉ. द.ता. भोसले आणि संगीता उत्तम धायगुडे




पैज फ्रेंड्स लायब्ररी यांच्या २८ व्या वर्धापनदिनानिमित्त कार्यक्रमात 'ग्रंथाली' प्रकाशित 'लॉक ग्रिफिन' कादंबरीचे लेखक वसंत वसंत लिमये यांची मुलाखत घेताना 'ग्रंथाली'चे विश्वस्त प्रभाकर भिडे

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.